REGISTERED N. No. 4

आकोल्यांतील लोकांस ..................१ रु.
बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ रु
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंका ........................।२

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........।१।०६
दुसरे खेपेस.... .....।१

Town ... ... ... ... I Rs.
Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......8 as
Repetition Per line .. 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 6 JULY 1903 NO 26

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख ६ माहे जुलै सन १९०३ इ० अंक २६

दिवाणी दावा नंबर ४ क्लास २१

१९०३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याजला कर्ज वसूल करण्या बद्दल सरटीफिकीट देण्याचा कायदा आक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वयें नोटीस.

विद्यमान— विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब बाहादूर सिव्हील जडज्य आकोले याचे कोर्टांत.

अर्जदार— लक्ष्मण पांडुरंग पाळखे मुक्त्यार माऊ आबाजी राहणार खामगांव.

सर्वांस या नोटिशीनें कळविण्यात येते कीं, वरिल अर्जदार यानें मैत नारायण लक्ष्मण याचे ओरिएंटल गव्हरमेंट सिक्युरिटी लाईफ इन्शुरन्स व कंपनी मुंबई यांजकडेस विम्याबद्दल व्याजासह येणें असलेली रक्कम रुपये ६२६. याचे कर्ज वसूल करण्या करितां सरटिफिकीट मिळावें म्हणून तारीख २९ माहे जून सन १९०३ इसवी रोजीं अर्ज केला आहे. व त्या अर्जाचे चौकशीची तारीख २६ माहे जुलई सन १९०३ इसवी रोजी मुकर केली आहे तर सदर्हू दिवशीं १० वाजतां तुह्मी आपले दस्तऐवज वगैरे सुद्धां आमचे कोर्टांत अर्जदार याजला कां सरटीफिकीट देऊं नये याचें कारण दाखविण्या करितां हजर व्हावें. माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशी ही नोटीस देण्यात आली आहे. आज तारीख २९ माहे जून सन १९०३ इसवी.

V. N. Dandekar
सिव्हील जड्ज आकोला.

---

दिवाणी किरकोळ मु० नंबर १

१९०३

क्लास १८

सन १८९० चा आक्ट ८ कलम ११ अन्वये नोटीस.

वि० विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब बहादर सिव्हिल जडज्य आकोले यांचे कोर्टांत.

अर्जदार— बापु रामजी गठपाळे वस्ती कारंजे तालुके मूर्तिजापूर.

अज्ञान—व्यंकट भाईजी दुंडे वस्ती जळगांव तालुके मजकूर,

अज्ञान व्यंकट भाईजी राहणार जळगांव तालुके मजकूर याचे स्वतःचे किंवा इस्टेटीचे किंवा दोहोचें संरक्षण करण्या करितां पालनकर्ता नेमण्या विषयीं अगर ठरविण्या विषयींचा अर्ज.

सदरहू अर्जदार यानें आज्ञानाचे शरीराचे अगर इस्टेटीचें अगर दोहोचे पालन करण्यास आपणांस पालनकर्ता नेमण्या बद्दल अगर, ठरविण्या बद्दल अर्ज केल्यावरून सदरहू अर्जाची चौकशीची तारीख २६ माहे जुलई सन १९०३ इसवीची नेमिली आहे तर या नोटिशीनें सर्वांस असे कळविण्यांत येते कीं अर्जदारा शिवाय जे इतर नातलग मित्र आप्त किंवा सदर्हू आज्ञानाचे बरे व्हावें अशी ज्याची इच्छा असेल अगर जे अज्ञानाचे शरीराचे अगर इस्टेटीचे अगर दोहोचे पालनकर्ता नेमण्या बद्दल अगर ठरविण्या बद्दल इच्छित असतील त्यांनीं खुद्द ह्या कोर्टांत आमचे समोर अकोले येथें सदर्हू तारखेस हजर व्हावें आपणास पालनकर्ता कां नेमावे किंवा ठरविले जावें याजबद्दल जे कांहीं दस्तऐवज अगर तोंडी पुरावे असतील ते हजर करण्या करितां तयार ठेवावे.

ही नोटीस आज तारीख २७ माहे जून सन १९०३ इसवी रोजीं आमच्या सहीनिशी व कोर्टाचें शिक्यानिशी दिली.

V. N. Dandekar
सिव्हील जडज्य आकोला.

---

## नोटीस

रा. रा. मानाजी वा. जानजी मोसे व रामु वल्लद सोनाजी उभयतां राहणार वसाडी तालुके मलकापूर यासी खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा बाप नामे सोनाजी वा. जानजी मोसे यांचे स्वतः मालकीचे वडिलोपार्जित दोन शेते मौजे वसाडी तालुके मलकापूर येथें आहेत ती आजपावेतों माझे बापानें वसाडी येथील साठे सावकाराचे कर्जांच फेडींत दिलीं होतीं तीं सालमजकुरी त्याचे कर्जातून खुली झालीं आहेत आणि आतां मी तेथें येऊन ताबा द्यावा तर तुह्मी शेताचा ताबा देत नाहीं तर ही नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत शेत आमचे ताब्यांत देणें जर न दिलीं तर आह्मी तुमचेवर दिवाणी कोर्टात दावा करून शेत आमचे ताब्यांत नोटिसीचे खर्चा समेत व कोर्ट खर्चा समेत घेऊं ही नोटीस दिली सही. कळावें तारीख ४।७।०३ इ.

सही
पुंडलीक वा सोनाजी मोसे अ. पा.
क. आजी जानकाबाई मर्द नारायण
मारके राहणार दहीगांव
तालुके मलकापूर जि.
बुलढाणे. नि. बांगडी असे

---

## नोटीस

रा० रा० भोजराव माधवराव देशमुख कसबे हिवरखेड तालुके आकोट, यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं सालीम शेतीचे खाते वडील म्हणून तुमचे बापाचे नावांनें होते ते मैत झाल्या नंतर तुमचे नावानें झालें आणि आजपर्यंत सर्व मिळून त्या जमिनीचा उपभोग घेत आलों. आतां तुमच्या मर्जींत कांहीं फरक दिसतो ह्यामुळें आमचे हिशा प्रमाणें जी जमीन येते तिचे खाते ही नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसाचे आंत बदलून द्यावें न दिल्यास दिवाणींत फिर्याद करून जो खर्च लागेल त्या खर्चा सुद्धां सर्व खर्च भरून घेतला जाईल. खर्चाची तक्रार केल्यास ऐकली जाणार नाहीं. कळावें तारीख २९ माहे जून सन १९०३ इ.

सही.
रामराव कृष्णराव देशमुख
दस्तुर खुद्द.
शंकरराव विठ्ठलराव देशमुख
दस्तुर खुद्द.

---

## नोटीस

रा० रा० गंगाराम वल्लद मारोती लोहार राहणार चिखलगांव तालुके बाळापूर. यांस.

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून लग्न झाल्यास आज सुमारे १५ वर्षें झालीं. तुह्मास ७।८ वर्षां पासून रक्तपिताचा आजार झाला आहे तुह्मी औषध घेऊन दुरुस्त व्हाल व प्रपंचाचे उपयोगी पडाल ह्मणून आपली बरेच दिवस वाट पाहिली. परंतु तुह्मी आतांपर्यंत दुरुस्त झाला नाहींत. व रोग बरा होण्याचा रंगही दिसत नाहीं. मागे तुह्मास वऱ्हाडसमाचारांतून तारीख ४।११।०१ च्या ४३ साव्या अंकांत नोटीस दिली होती कीं, खावटी बद्दल १५५ रुपये सावकाराचें कर्ज झाले ते देऊन टाकावें परंतु त्याप्रमाणें तुह्मी व्यवस्था कांहींच केली नाहीं ह्मणून मुद्दाम ही नोटीस देणें भाग झाले तर या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं मागें दिलेल्या नोटीशीत लिहिलेले खावटीबद्दल १५५ रु० व तेव्हां पासून आतां पर्यंत झालेले सावकाराचे कर्ज ४५ रुपये एकूण २०० रुपये सावकाराचे देऊन टाकावे व मला फारकत देऊन आपले कबज्यांतून मोकळे करावें विनाकारण माझे प्रपंचाची नासाडी करूं नये असे माझें आपल्यास विनयपूर्वक सांगणें आहे. या उपर आपण नोटीस पावल्या पासून १५ दिवसांत असें न केल्यास मी, ही नोटीस फारकत समजून दुसरा घरठाव करीन मग तुमचा नवरेपणाचा हक्क मजवर राहणार नाहीं. या नोटिसीचा खर्च तुमचेवर असे कळावें. ता० ४।७।०३ इ०

सही
पुतळी मर्द गंगाराम लोहार राहणार
शेंबे तालुके मलकापूर नि० खुद
हातची बांगडी.

---

## नोटीस

मुल्ला हाजी इसुफअली शेख व्याकरजी जिनींग फ्याक्टरीचे मालक खामगांव वा बऱ्हाणपूर यासी खालीं सही करणार यांजकडून नोटीसीनें कळविलें जाते कीं तुमची तारीख २२।६।१९०३ इसवीचे वऱ्हाड समाचार पत्रांत जी आमचे नावानें नोटीस दिली त्याचे उत्तरः—

खामगांव येथील तुमचे जिनिंग फ्याक्टरीचे उत्तरेस जो खुले जागेचा नंबर आहे तो आज तीस वर्षां पासून आमचे ताब्यांत असून त्यावर मालकीहि आमची आहे आणि सदर्हू नंबर आज वीस वर्षांपासून आह्मी तुह्मास भाड्यानें दिला असून त्याजबद्दल वेळोवेळीं तुह्मी आह्माला भाडेपट्टे लिहून दिलें ते नें दून दिलेंच आहेत त्या प्रमाणें हल्लींहि तुह्मीच भाड्यानें घेतला आहे. आतां सदर्हू नंबरापैकीं एक हिस्सा तुह्मी खेतसीदास सिवलाल याजपासून खरिदी घेतों ह्मणून आह्मास कळवितां तर सदर्हू नंबरांत खेतसीदास सिवलाल याचा कोणतेच प्रकारचा हक्क संबंध नाहीं व खेतसीदास सिवलाल हे मयत झाले असुन यांचा जवळचा वारीसही कोणी नाहीं. हल्लीं सदर्हू हिसा आमचे आपसाने वटवाडामध्यें मानमल आहे. हाल, दुकान आकोलें मालक सांगिदास नंदलाल याचे हिशास गेला आहे. सबब हल्लीं सदर्हू नंबरापैकीं एक हिशावर सांगिदास नंदलाल यांची मालकी आहे. आतां जर तुह्मी विनाकारण आमचे विरुद्ध खोटे तंटे उपस्थीत कराल तर आह्मी तुमचे जवळ असलेला सदरहू नंबर हा परत घेऊन दुसरे कोणास तरी भाड्यानें देऊं हे खास समजावें. तुह्मी जर इतकेही करून खरिदी घ्याल तर तें खरिदीखत निरर्थक होईल. कळावें मित्ती आषाढ शुद्ध ६ समत १९५९ तारीख ३० माहे ६ सन १९०३ इसवी.

सही.
जसराज श्रीराम दुकान खामगांव
मालक इंद्रसिंग जसराज दस्तुर
गोविंद पंढरीनाथ कु. मु.
खामगांव.

---

## जाहिरात

सर्वत्र साहु सावकार व इतर लोक यांस जाहिर करण्यात येतें कीं माझा मुलगा नामें सुलतानखा हा माझ्या कहे बाहेर गेला आहे. तो लफंगेपणाच्या गोष्टी करितो. मी त्याला घराबाहेर काढून दिले आहे. माझ्या संबंधानें कोणताही व्यवहार किंवा देवघेव करण्याचा त्याला अधिकार नाहीं; आणि जो कोणी त्याच्याशीं व्यवहार करील तो फसेल. आणि माझ्या मुलानें केलेला व्यवहार माझ्या इस्टेटीला बांधू शकणार नाहीं. सुलतानखा जवळ इस्टेट वगैरे कांहीं नाहीं. सर्वांच्या माहिती करितां आणि कोणी त्याच्या थापीने फसूं नये ह्मणून मी जाहीर खबर दिली आहे. कळावें. ता. ३ जुलई १९०३ इसवी.

सही ( उर्दूत )
चिरागखा वल्लद घुडेखा वेद
वस्ती ताजनापेठ आकोला

## नोटीस

रा. रा. विठु वलद वनसिंग नाईकवाडी आडनांव जाधव राहाणार कुऱ्हा यांस.

खाली सही करणार इनकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे व माझे लग्न झाले पासून अज्ञानपणांत बरेच वेळां तुमचे घरीं जात येत गेली परंतु मी शहाणी झाल्यावर तुमचे येथें राहिली असतां तुह्माला बायकोची किंवा प्रपंचाची गरजच दिसत नाहीं. तुह्मी माझे आईचे घरी पोहचते केलें. आज सुमारे ९ वर्षे झाली तुह्माकडून संसार होऊंच शकत नाहीं आतां वाट पाहण्यांत हांशील नाहीं. मला दुसरा घरठाव करणें आहे. करितां या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावताच ८ दिवसांत आजपर्यंत झालेलें खावटीबद्दल सावकाराचें कर्ज रुपये २०० झाले ते देऊन मला फारकत देऊन माझा निकाल लावावा. असें मुदतशीर न केल्यास हीच नोटीस फारकती समजून दुसरा गंधर्वांचा नवरा करीन मग तुमचा नवरेपणाचा हक्क माझेवर राहणार नाहीं व या नोटिशीचा खर्च आणि खावटीबद्दल खर्च फिर्याद करून भरून घेतला जाईल. कळावे. तारीख ९।७।१९०३ इसवी.

सही.

चंद्रभागा मर्द विठु नाईकवाडी राहणार मोर्तिजापूर निशाणी बांगडी.

---

वऱ्हाडसमाचार

---

मिति आषाढ शुद्ध १२ शके १८२५

---

## स्थानिक सरकार व लोकनियुक्त सभा.

वरील विषयावर देन आठवड्यामागें आह्मी जो लेख लिहिला होता, त्यांत लोकनियुक्त संस्थांवरील सरकाराची नजर अलीकडे बरीच करडी होत चालली आहे असें मत आह्मी प्रदर्शित केलें होतें; व आमच्या पुष्ट्यर्थ अलिकडील दोन तीन ठळक प्रसंगांचा उल्लेख केला होता. आजच्या लेखांत डिस्ट्रिक्ट बोर्डावरील खर्चाचा बोजा सरकार हळूं हळूं कसा वाढवीत चाललें आहे या गोष्टीचा विचार करण्याचें आह्मी योजिलें आहे. वऱ्हाडांत डिस्ट्रिक्ट बोर्डाची स्थापना झाली त्यावेळेस इमारतींची दुरुस्ती व नवीन इमारती बांधणें ह्या कामा पैकीं २०० च्या आंतील कामें तालुक्यानिहाय नेमलेल्या सब ओव्हरसिअर मार्फत करवून घेऊं लागले; व रुपये २०० पासून रुपये १०००पर्यंतचीं कामें जिल्हा बोर्डाचे ओव्हरसिअर ह्यांच्या मार्फत करवून घेऊं लागले; व रु० १००० च्या वरील कामें सरकारच्या पब्लिक वर्कस खात्या मार्फत करवून घेतल्यास त्या कामांवर-ज्या किंमतीच्या मानानें शेंकडा १९ रु० सरकारी अधिकाऱ्यांच्या देखरेखी बद्दल व रु० १॥ हत्यारांच्या उपयोगा बद्दल ह्मणून रक्कम सरकार बोर्डाकडून घेऊं लागले. परंतु ह्या व्यवस्थेस अनुसरून रु० १००० वरील कामें पब्लिक वर्कस खात्याकडें सोंपविण्यांत यावीं किंवा येऊं नयेत ही गोष्ट आपल्या खुषीवर आहे असा आग्रह एका डिस्ट्रिक्ट बोर्डानें धरला व त्यास अनुसरून आपलीं सर्व कामें तें बोर्ड आपल्या ओव्हरसिअर मार्फतच करवून घेऊं लागलें; परंतु इतर बोर्डांतून व्यवस्था निराळीच सुरू राहिली ह्मणजे रु० १००० वरील सर्व कामें पब्लिक वर्कस खात्यांकडून करवून घेण्याची पद्धति सुरूं राहिली. परंतु अलिकडे ह्या बाबतींत एकाच सरकारच्या अंमला खालीं निरनिराळ्या बोर्डांतून चालूं राहिलेली निरनिराळी पद्धत सरकारच्या लक्ष्यांत येऊन रु० १००० वरील सर्व कामें पब्लिक वर्कस खात्याकडूनच करवून घेतलीं पाहिजेत अशा आशयाचा हुकूम सर्व बोर्डांस सोडण्यांत आला! ह्या योगानें आपले ओव्हरसिअर सदर्हू कामें करवून घेण्यास लायक असले तरी तीं त्यांच्या देखरेखी खालीं करवून घेण्याचा अधिकार बोर्डांस राहिला नाहीं. परंतु अलिकडे ओव्हरसिअर, सब ओव्हरसिअर ह्यांच्यावर बरीच जबाबदारीचीं कामें टाकण्यांत येतात ह्मणून त्यांचे पगार वाढविण्यांत आले आहेत व अकोलें जिल्ह्या करितां जिल्हा ओव्हरसिअर ह्याना मदतनीस ह्मणून एक ॲडिशनल ओव्हरसिअर देण्यांत आला आहे. सब ओव्हरसिअर व ओव्हरसिअर ह्याना जास्त पगार दिल्यानें त्या जागीं चांगले वाकबगार व प्रामाणिक लोक मिळण्याचा संभव आहे; तेव्हां ही व्यवस्था अंमलांत आणल्या पासून त्यांकडे जास्त जबाबदारीचीं कामें सोंपविण्यांत यावीं असें सहजच वाटेल; परंतु ह्याच्या उलट प्रकार अंमलांत असलेला दिसून येत आहे; ह्मणजे हल्लीं बोर्डांस आपल्या हाता खालील नोकरास जास्त पगार द्यावा लागत आहे व रु० १००० वरील कामें पब्लिक वर्कस खात्याकडे सोंपवावीं लागत असल्यानें त्यावर एका प्रकारचा करच ह्मणून शेंकडा रु० १६॥ प्रमाणें रक्कम द्यावी लागत आहे. ह्या योगानें बोर्डांचे अधिकार नियंत्रित करून बोर्डाचे नोकर वरील कामें करण्यास नालायक आहेत अशा आशयाचें सर्टिफिकेट सरकारानें अनायासेंच बोर्डांस दिलें आहे! तथापि अलिकडे ह्या बाबतींत जास्त बोजा बोर्डांवर घालण्याचा सरकारचा इरादा असल्याचें आमच्या ऐकिवांत ह्मणजे वरील कामांवर शेंकडा रु० १६॥ ऐवजी रु० २४॥ प्रमाणें रक्कम पब्लिक वर्कस खातें बोर्डावर आकारणार आहे असें आह्मी ऐकतों. असें करण्या पासून सरकारचें कोणते इष्ट हेतु साध्य होतील ह्याची आह्मांस शंका आहे. पोलिस खात्यांतील नोकरास कमी पगार असल्यामुळें त्या खात्यांत हुशार व प्रामाणिक लोक सहसा शिरत नाहींत अशी सार्वजनिक ओरड आहे. परंतु अशाच तऱ्हेची ओरड सरकारी पब्लिक वर्कस खात्या संबंधानें असल्याचें आमच्या ऐकिवांत नाहीं. मग खरोखरच त्या खात्यांतील नोकरांचे व अधिकाऱ्यांचे पगार वाढविण्याची गोष्ट लांबच राहिली! तेव्हां अशा तऱ्हेचा जास्त खर्चाचा बोजा अंगिकारण्याचा सरकारचा इरादा नसून बोर्डा सारख्या संस्थेवरच तो कां वाढवावा ह्याबद्दल सयुक्तिक कारण निदान आह्मांस तरी सुचत नाहीं! किंवा अशाबद्दलचें कारण सरकारांकडून अद्याप दर्शविण्यांत आलेलें नाहीं. लॉर्ड रिपन साहेबांनीं स्थानिक स्वराज्याचें रोप हिंदुस्थानांत लावून आह्मां हिंदी प्रजेवर महदुपकार केले तें रोप आमच्या देशास व त्याच्या गत इतिहासास केवळ अपरिचित असें नाहीं. ह्यामुळें त्याच्या वाढीस स्वतः आमच्या कडून अवरोध होण्याचा सहसा संभव नाहीं. सदर्हू रोपास परिपोषक द्रव्यें घालून त्याची योग्य जोपासना करणें हें काम लोकांचें व त्याच प्रमाणें लॉर्ड रिपन साहेबांच्या मागून राज्यसूत्रें ज्या उदारधी अधिकाऱ्याकडे आलीं त्यांचे व त्यांचे हुकूम ज्यांना शिरसावंद्य असले पाहिजेत अशा स्थानिक सरकारचें ही आहे. परंतु सदर्हू अधिकारी नवीन परिपोषक द्रव्यें घालून त्या रोपाची जोपासना करण्या ऐवजीं ते जमिनींतील सात्विक द्रव्येंच घेऊं लागले तर तें रोप जीव कसा धरणार! सबब ह्याप्रमाणें स्थानिक स्वराज्याचा बीमोड करण्याच्या अनिष्ट हेतूनें सरकारचे वरील प्रयत्न चालले असावेत अशी अनुदार कल्पना आमच्या मनांत कदापिही येत नाहीं तथापि सदर्हू प्रयत्नांचा परिणाम ( सरकारची तशी इच्छा नसूनही ) वर दर्शविल्या प्रमाणें होईल अशी भीति आह्मांस वाटत असल्यामुळें सरकारास वेळींच विनंती करून आमच्या विषयाची तूर्त आह्मी रजा घेतों.

---

## सुधारक आणि पुराणप्रिय यांचे तंटे !

( जय-दत्त याजकडून )

सुधारक ह्मणजे स्वेच्छाचार करणारी व्यक्ति असें ठाम मत झालेले पुराणप्रिय अगर पुराणप्रिय ह्मणजे दुराग्रहाचा मूर्तिमंत अवतार अशी मनाशीं पूर्ण गांठ बांधणारे सुधारक; अशा दोन्ही व्यक्तींमध्यें हरहमेश होणाऱ्या तंट्यांत पडण्याची आमची इच्छा नाहीं. अशांच्या तंट्याची योग्यता मर रस्त्यांत विकारवश होऊन परस्परांवर तोंडसुख घेणाऱ्या अडाणी लोकांपेक्षां अधिक असेल असें आह्मांस वाटत नाहीं. मात्र प्रामाणिकपणें विचारदृष्ट्या उत्तम वाटतें तें सद्बुद्धीनें प्रचलीत करणारे वा प्रचलीत व्हावें अशी अंतःकरणपूर्वक इच्छिणारे आणि अनेक वर्षांपासून चालत आलेल्या आचारांत केवळ लोककल्याणार्थच फेरबद्दल करणें इष्ट नाहीं वा कालानुरोधानें हळू हळू मात्र करावा असें सद्धेतूनें समजणारे अशा दोन्ही समाज हितैषींमध्यें जे तंटे होतात त्याबद्दलच काय ते दोन शब्द लिहिण्याचा आमचा मानस आहे. ज्यांची दोघांची हि इच्छा समाज कल्याण व राष्ट्रहित व्हावें अशी असून दोन्ही पक्ष केवळ शब्दवाद वाढवून परस्पराबद्दल गैरसमज करून घेत आहेत, त्यामुळें परस्परांतील बंधुप्रेम कमी होऊन सहानुभूति आणि प्रेमभाव यांस अजिबात फांटा मिळून मुख्य मुद्दा अजिबात बाजूस राहून मतभेदाचें पर्यवसान तंट्यांत होऊन व्यक्तिविषयक कलहास अवकाश मिळत आहे ही अत्यंत शोचनीय गोष्ट होय. दोन्ही पक्षांतील वंद्य व्यक्तींनीं दोघांचेहि मनांत एकच उदात्त हेतु आहे यांचें विस्मरण पडूं दिलें नाहीं तर क्षुल्लक गोष्टीवरून मतभेद होतांच दृष्टीस पडणारा प्रेमाचा अभाव नव्हे तर परस्परांत होणारें आजन्म वैर पूर्णपणें नाहींसें होईल. दोघांनींहि आपण एकच एकाच समाजाचे घटकावयव हें पूर्णपणें मनांत वागवून वर्तनक्रम ठेवला तर शेवटीं कांहींच निष्पन्न न होतां केवळ व्यक्तिद्वेष वाढविणाऱ्या शब्दवादास कोठेंच थारा मिळणार नाहीं. तत्वबोध काढण्या करतां होणाऱ्या वादाचे वेळीं प्राणांतिक शत्रु प्रमाणें जरी दोन्ही पक्ष एकमेकांवर तुटून पडले तरी मतभेद असण्याचें कारण नाहीं. अशा अनेक संबंधांत पूर्ण प्रेमानें उत्तेजित होऊन एकाचें दुःख तेंच आपलें असें दुसऱ्यास वाटूं लागेल आणि सर्व खया स्वतःच घट्ट करणाऱ्या मांजरास न्यायधिश करण्याचा अगर निव्वळ तिऱ्हाईतास मिळून आपल्याच बांधवास व पर्यायें करून स्वतःसहि संकटांत लोटण्याचा प्रसंग येणार नाहीं आणि इतकी संस्कृत वृत्ती नसेलच तर निदान दुष्टबुद्धि, संकुचित वृत्ति, परोत्कर्षमत्सर, यांचा अवलंब न करतां अनास्था वृत्ति पत्करणें तरी खरोखरच उचित व अवश्य आहे. तथापि असेंहि बहुतक व्यक्तींकडून होत नाहीं. तें का? कां यांचें उत्तर अर्थात खऱ्या खऱ्या बंधुप्रेमाची वानवा. पूर्वकालीन महाकवींच्या उक्तींबद्दल नुस्ती शब्दाची वळवळ, हितकर गोष्टी प्रचलीत करण्याची नुसती शब्दाची आवड, स्वार्थाची परवा न ठेवतां परहित करणें अत्युत्तम इतकें दुसऱ्यास सांगण्याची मात्र होस! परंतु इतकी उदात्तवृत्ति सर्वांतच असणें शक्य नसलें तरी अगर स्वार्था करतां परहिताची पायमल्ली करण्यावाचून गत्यंतर नसेल तर निदान स्वार्थ नसतांना तरी दुसऱ्याचें अहित करण्याची जी दोन्ही पक्षांतील कित्येकांस प्रबल इच्छा असते तिचें निर्मूलन झाल्यास किती तरी फायदे होतील! पूर्वजांच्या अनेक उदात्त विचारांची योग्यता कळून वागल्याचें श्रेय येईल, समाजांत निष्कारण बंधुप्रेमाची पायमल्ली करणारे प्रकार थंड पडतील. प्राचीन ग्रंथांचीं पारायणें वा अर्वाचिन ग्रंथांचें परिशीलन ह्मणजे नेत्र, कर्ण वा बुद्धि यांचा दुरुपयोग न केल्या सारखें होईल. परंतु धर्माभिमानानें सत्कर्मे करण्याची स्फूर्ति होत नसेल आणि सुधारणाभिमानें उदात्तकृति होत नसतील तर तो लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकणारा धर्माभिमान आणि परोपकाराच्या मदारीवर होणारा स्वेच्छाचार दोन्हीहि निंद्य, अत्यंत निंद्य, समाजहितास हरताळ लावणारे व आपल्याच मुखास आपणच ग्रहण लावणारे होत. सारांश दोन्हीं पक्षांतील व्यक्ति प्रामाणिकपणें आपआपल्या मतांचा प्रसार करण्याच्या सद्धेतूनें खटपट करतील, पक्षाभिमानानें धुंद होऊन विचारास धाब्यावर न बसवतील आणि प्रत्येक वादाचे प्रसंगीं मुख्य वाद काय इकडे लक्ष्य पुरवून बंधुप्रेमानें उत्तेजित होऊनच आचरण ठेवतील तर दोघांचेंही अनेक दृष्ट्या हित होईल हें निःसंशयें खरें आहे. मात्र दोन्ही पक्षांतील लोकांनीं

असें होण्यास विकारवश न होतां पक्षाभिमान, दुराग्रह, लोकेषणा, लोकप्रियता इत्यादिकांस राम राम ठोकला पाहिजे. निरिच्छवृत्तीनें करावयाचें तें केलें पाहिजे. अल्पायुष्याची खरी योग्यता किती हे नेहमीं मनांत बाळगून वागलें पाहिजे. मानव जन्माचे सार्थक्य ह्मणजे सत्याची आवड; त्याचा प्रसार करण्या करितां होईल ती खटपट केली तर मानवजन्मास आल्याचें साफल्य. तो आहे तोंपर्यंत तो असण्याचा उपयोग. तशांत सत्य प्रसारार्थ निरिच्छ श्रम करण्यामध्यें जे अनंत मानसिक सुख आहे तें अतुल व अनिर्वचनीय होय. कोणत्याहि बाजूकडे फाजील न झुकतां स्थैर्यवृत्ति व दूरदृष्टी ठेवून वर्तन करणें हाच प्रत्येक विचारी व्यक्तीचा सतत प्रयत्न पाहिजे. मात्र दूरदृष्टी ह्मणजे मतलबास महत्व देऊन सध्यां दृष्टीस पडणारी कृतिशून्यता नव्हे. कर्तव्यकर्मांत अडथळे उत्पन्न करणारें फाजील व्यवहारिक ज्ञान नव्हे. दुष्कृतींचें, आचार शून्यतेचें, मंडन करणाऱ्या सबबी नव्हेत. दुर्गुणाकडे प्रवृत्ति वळून सद्गुणापासून अज्ञजनास परावृत्त करणारा कावेबाजपणा नव्हे. निदान ज्याचे वर्तनावर जनतेची सतत दृष्टी असते अशांनीं कोणतीहि कृति करितांना फार विचार करून पाऊल टाकलें पाहिजे. आपले वर्तनांत निंद्य भाग अगदीं न ठेवण्याची फार खबरदारी घेतली पाहिजे, अनेक गुणामुळें जनतेस आराधनीय वाटणारांचे अवगुण दृष्टीस भुरळ पाडतात व त्या अवगुणांचेंही अनुकरण होण्याची फार भीति असतें हें नेहमी लक्षांत बाळगणें इष्ट आहे. तेव्हां आकाश पाताळ एक झालें तर सत्यावलंबन हाच बाणा ठेविला पाहिजे कारण कोणत्याहि राष्ट्राची अवनति होते याचें मुख्य कारण स्वताची सोय व स्वार्थबुद्धि यांस फाजील किंमत देणें व सत्पथाभिमानास दुय्यम स्थळ देणे हेंच होय. कोणत्याही व्यक्तीस वा हितीस सामाजिक वा धार्मिक या संबंधांत होणार क्षणिक गैरसोयी दूर सारणारे प्रमाद कितीहि सुखप्रद झाले तरी प्रगतीला असे प्रमाद विघातक असून तिची गति व अक्षय सुखाची वृद्धि यांस ते कुंठित करितात. मग सत्याची पायमल्ली कोणत्याहि हेतूनें होवो त्यामुळें राष्ट्रोत्कर्षांस प्रतिबंध झालाच पाहिजे. क्षणैक सुखास भाळून खऱ्या खऱ्या सुखाला मुकावयाचे नसेल तर सत्यावलंबन अवश्य आहे. खरें ज्ञान व खरें सुख यांची लालसा असेल तर त्याचे जनन स्थान सत्यच आहे हें नेहमीं डोळ्यापुढें ठेवलें पाहिजे. आपणच आपल्याला फसवणारा आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ खेळत बसणें यांतच अवनीतीची परमावधि आहे. आपणांस अज्ञानाशीं झुंजावयाचे आहे आणि सुविचार, पवित्र आचार वगैरेस अवरोध करणें ह्मणजे मानव जनाची विटंबना करणें होय. स्वकर्तव्यानुबंधास्तव पवित्र विचारांस चिरडणें, असत्याकडे क्षम दृष्टीनें पाहणें, कर्तव्यपराङ्मुख होण्यास क्षुल्लक सोय गैरसोय पुरेशी वाटणें अशी वृत्ति ठेवणारे उदात्त वृत्ति दाखवतील, समाजहित करतील, राष्ट्राचा उदय करतील अशी अपेक्षा करणें; विषवृक्षाखालीं बसून अमृतपानाचीच इच्छा धरणें आहे. सारांश सर्वांनीं परस्पराबद्दल प्रेमबुद्धि ठेवून पवित्र विचारानुरूप आचार केल्यास सर्व तंटे बंद पडून सर्वांचेंच कल्याणहोणार आहे.

## पाऊसपाणी

पुनर्वसु नक्षत्र लागलें पण अजून पावसासंबंधानें चांगलीशी स्थिरस्थावरता झालेली नाहीं. पुनर्वसु नक्षत्रा मध्यें पृथ्वी आपल्या नूतन वनस्पतींनीं हिरवीगार व रमणीय दिसावयाला पाहिजे. या नक्षत्रांत उद्भिज्ज द्रव्यें पृथ्वी बाहेर आपलीं डोकीं काढूं लागतात आणि सर्वत्र हिरवा गालीचा पसरून मोठी शोभा आणित असतात. मृग नक्षत्रांत जे नानाविध बी पेरतात त्याला आर्द्रा नक्षत्रांचें पाणी मिळून त्या बियाचा उद्गम पुनर्वसु नक्षत्रांत होत असतो परंतु यंदाचें ऋतुमान कांहीं निराळेंच दिसतें. रोहिणी नक्षत्रांतच एक दोन पाऊस चांगले पडले. हे पाऊस आमच्या प्रांताला फारसे नको असतात. मृग नक्षत्रांत मोठा भरंवसा नसतो तथापि आर्द्रा नक्षत्रांत कापूस ज्वारी वगैरे खरीपाचे पेरे साधावेच लागतात. या सालीं या दोन्ही नक्षत्रांनीं मोठी निराशा केली. मामूल वहीवाटी प्रमाणें लोकांनीं थोड्याशा पावसांत पेरणी चालूं केली आणि या आठवड्यांतील पावसानें कपाशीची पेरणी नीट साधली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. गेल्या गुरुवारा पासून पावसाचीं चिन्हें समाधानकारक आहेत. सध्यां आग्नेय बाजू कडून पाऊस विशेष येत असतो. सध्यां पश्चिम वऱ्हाडापेक्षां पूर्व वऱ्हाडांत पाण्याची सुबत्ता अधीक आहे. पश्चिम वऱ्हाडांत देखील पाऊस पडूं लागला आहे आणि दररोज होत असलेल्या उकाड्यामुळें तो चांगला सापडेल असें अनुमान आहे. कसेंही असो, अजून, पावसाला असावा तितका जोर नाहीं. उमरावती कडे चार साडेचार इंच एकंदर पाऊस झाला तर आकोल्यास फक्त अडीच इंचा पर्यंतच मजल पोंचली आहे. पाऊस चांगला जोरदार पडावयाला पाहिजे आणि उमेद आहे कीं पुनर्वसु नक्षत्र सर्वत्र गारीगार करून सोडील व आपल्या नूतन पल्लवादिकांनीं पृथ्वीला अलंकृत करील.

बंगाला, ब्रह्मदेश, व आसाम या भागाकडे पाऊस बरा पडला आहे. आणि तूर्त तिकडेच पाऊस चांगला जोरदार होईल असा संभव आहे. पश्चिम किनाऱ्या वरील पावसाला जोर दिसत नाहीं. त्याची गती हल्लीं मंद आहे पण रंग असा दिसतो कीं आरबी समुद्रांत वादळें होत असून जलद वेगाचा व सोसाट्याच्या धारांचा पाऊस लवकरच पडूं लागेल. पंजाबांतील अमृतसर, हिस्सार, मूलतान, दिल्ली वगैरे भागाकडे अजून इंच सव्वा इंच देखील पाऊस नाहीं. वायव्य प्रांतांत पावसाची मोठीच ओरड आहे. पाणी न पडल्यामुळें पेरणीही बंद पडली. आहे. पावसा संबंधानें चिंताच पडली आहे. रजपुतान्यांत पावसा विषयीं सारखीच रड आहे. खानदेश, भडोच इत्यादि भागांत पेरणीला व इतर शेतीचीं कामें चालूं ठेवण्या पुरता पाऊस झाला आहे. अमदाबाद, वढवान, ढोलारा, भावनगर वगैरे कडे पाऊस चांगला न झाल्यामुळें पेरणीच बंद पडली आहे. तिकडील लोकांचे डोळे आकाशाकडे लागले आहेत. बारशी, सोलापूर इत्यादि भागाला पाऊस नामी झाला आहे. सोलापूराला पावसा संबंधानें नेहमी रड असावयाची पण यंदाचा चमत्कार उलटाच आहे. अहमद नगराची गोष्टही अशीच समाधान कारक आहे. कर्नाटकांत पाऊस पाहिजे ह्मणून लोकांची हाकाटी आहे. मद्रास इलाख्यांतील लोकही पावसाची मार्गप्रतीक्षा करीत बसले आहेत. वर्षाकालाला प्रारंभ उशीरानें झाला आहे तथापि या पुढील नक्षत्रांत सर्वत्र अबादानी होईल अशी पक्की उमेद आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY JULY 6 1903

Bitter words spoil even a good cause. This is the moral which some of our valued well-wishers tried to impress at a private interview. It has been pointed out to us that the tone of the Native press is often times trenchant when there is an occasion to find fault with one thing or another in the Anglo—Indians amongst whom our lot is cast. The other day we quoted a para from an important publication in which there was a sweeping generalization in the terms of the late Mr. Parnell. "Never trust an Englishman." We know that such an expression of thought is most unpalatable to the other party. We also do not like a criticism in which the main stand is not based on a friendly spirit. The growth of estrangement that makes a freer and a more social intercourse between the Natives and the Anglo—Indians one of the most difficult tasks of the day is due to the result of an unkind word spoken or an ungenerous thought expressed on either side in the heat of a discussion. We deplore the gradual decline of nobler and nicer sentiments of heart that drew together in the good old days both the rulers and the ruled people in bonds of harmony and benevolence. The steam engine and the telegraph that have annihilated all ideas of distance and space have done us the greatest disservice of making an Anglo—Indian a *pucca* sojourner in India. The keen competition for Government posts has also estranged the good relations of the first days of the British rule. With the growing stability of the British empire there has not yet come the golden day of prosperity on which the might of the victors will no lord over the rights of a British subject to which we conquerred Indians aspire and hope to reach in no distant time. The feeling of sympathy is at discount and we want to cultivate that feeling. We hope to succeed in this work provided we make it worth while for our Anglo—Indian friends to court our company for the independent tone of our life. Friendliness begets friendliness; and let us do our best to avoid the conflicts of interests that push each one aside and let us see whether a real feeling of sympathy will join together the English and the Native races in the work of building one nationality irrespective of differences in race, creed, and color.

—:0:—

We were vary anxious that the soldier who happened to kill a *Kunabi* in one of the fie'ds of the village Manegao in Jalgaon Taluka, should be put on his trial before a tribunal. Our firm belief is that in cases of deaths on a shooting occasion the people wish the unfortunate Shikari to prove his guilt or innocence in the course of a judicial trial. There is also a great reason as to why such a feeling prevails in the minds of the masses. Deaths that are the results of an accident, require a patient and searching inquiry about the fact that the Shikari has taken the utmost of human precaution to avoid such a fatality. This is an imperative necessity in order to make sure that similar accidents will no longer recur in future and to make as wide and public as possible that the person who lifts his gun for a shikar runs the greatest risk of losing his own life. In referring to the fatal accident at Manegao we tried to give an expression to the public sentiments in this connection. In doing so we happened to remark that the case has been some how *hushed* up. We are not justified in making this sweeping observation. Upon further inquiries into this matter we came to know that our district officers have made a special inquiry and have come to the conclusion that the death was a matter of pure accident. In the face of an open inquiry with the men on the spot, and in view of their statements about the way in which the Kunabi dies, we do not think that there is any—the least—effort to hush up the case. Whether the whole incident amounts to an accident or indicates some negligent or rash conduct on the part of the Shikari, is still a question of facts and there is every likelihood of a difference of opinion in the interpretation of the facts themselves. There is however no space for harbouring a doubt for a moment. The case stops at the point where it is now in consequence of a conscientious decision of a proper authority and it can never be said that a difference in opinion lends a support to the hushing up of a case. We are sorry for such a hasty remark as has crept into our columns though our very writing will itself point out that we meant to ascribe no motives whatever.

---

## वऱ्हाड

अपघात — बारशीटाकळीच्या पूर्वेकडील फरशीवर गेल्या गुरवारीं तिसरे प्रहरीं पावसाच्या पाण्याचा पुर आला तेव्हां शेतांतून गांवाकडे येत असतांना फरशीवर शेख महिबूब नांवाचा शिकलीकर पाय घसरून काट्यांत सांपडून मरण पावला. त्याच दिवशीं या पुरांत तीन बैलही मरण पावले.

मे. हेअर साहेब कमिशनर हे किरकोळ रजेवर मुंबईला गेले होते ते गेल्या गुरुवारीं परत आले.

रा. रा. बंधुजी जनार्दन चौबळ एक्स्ट्रा असि० कमिशनर वर्ग १ ला हे उद्यां पासून पेनशनी वर जाणार आहेत.

मे० ब्याटन साहेब जुडिशिअल कमिशीनर हे तारीख १८ पासून हैदराबादेला जाणार असून तिकडील कामाचा निकाल एका आठवड्याच्या मुदतींत करितील.

मि. एफ. डब्ल्यू. प्रीडो साहेब यांनीं आणखी तीन महिने रजा वाढविल्यामुळें व शिमच्या डिपुटी कमिशनरच्या जागीं मेजर माडवी साहेब यांस उमरावतीहून बदलून मि० गाडविन आस्टीन यांस वाशिमाहून उमरावतीच्या डिपुटी कमिशनरच्या जागीं बदलण्यांत आलें.

रा० रा० बाळ गंगाधर टिळक हे कमिशनचें काम पुरें करून गेल्या शनिवारीं परत औरंगाबादेकडे रवाना झाली, सर्वत्र त्यांचा बहुत आदरसत्कार झाला, हजारो लोक यांचें दर्शन घेतांना त्यांच्या त्या सशक्त व श्यामल मूर्तीवरील काळजीची छटा पाहून मनांत मोठे कष्टी व श्रमी होत असत, इश्वर करो व त्यांस सुखसंपन्न देवो !

---

वर्तमानसार

हायस्कुलांत धार्मिक शिक्षण— धुळें हायस्कूलचे हेडमास्तर रा. रा. हरी गणेश गोडबोले यांनीं वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांच्या संमतीनें हायस्कुलांत धार्मिक व नैतिक शिक्षण देण्याची तजवीज केली आहे, ही गोष्ट आम्हांला अत्यंत भुषणास्पद आहे.

उत्कृष्ट ठराव—ब्रह्मदेशांतील ब्रिटिश अधिकारी ब्रह्मी स्त्रियांशीं लग्नाव्यतिरिक्त संबंध ठेवील तर त्याचें प्रमोशन बंद होईल असा बंगालच्या ले. गव्हर्नरनी ठराव केला आहे.

बेगम साहेबांनीं ठरविलें— संस्थानांत अनीति वाढूं नये म्हणून शहरांतील सर्व अनीतिवान स्त्रियांनीं अमुक मुदतींत लग्नें केलीं पाहिजेत असा भोपाळच्या बेगम साहेबांनी कायदा करितांच एका दिवसांत ७५ लग्नें झालीं.

शिसपेनसिलीपासून मृत्यु— सिंध हैद्राबाद येथें एका विद्यार्थ्यानें तोंडांत सिसपेनसिलीचा तुकडा धरून तो गिळल्यामुळें त्यांस मरण आलें तोंडांत पेनसिली धरणारांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवावी

विजयदुर्ग येथील देशी बटणांचा कारखाना स्वरूपास येण्याची चिन्हें दिसत आहेत.

---


## खरेदी करा !

### रास्कोपची थेट व खरी पेटंट वॉचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका.

रेलवेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वाचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. यासकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉन्ट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वाच घेणें विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची स्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व त्या बद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

**राल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९लाईन ओपनफेस ....................४०
१९ „ हंटिग....................५०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ „ हंटिंग, नकशीचे ..........१५०

**मेटलचें तीन वर्ष ग्यारंटीचें.**

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ „ सेकंद कांट्यासह...........२०
१९ „ मध्यभागी सेकंद काटा असलेले ...............२१
१९ „ हाफ हंटिंगचें...............२०
१९ „ हंटिंगचें ...................२०
१४ „ रिस्ट वॉच ...............९

**इनगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१९ लाईन ओपनफेस ............२०
१९ „ हंटिग.....................२०
१४ „ रिस्टवॉच....................२०

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ „ हंटिंग...........................३५
१८ व १९ „ ओपनफेस ............३०
१९ „ सेकंद कांट्यासह...........३२
१९ „ मध्यभागीं सेकंद काटा असलेलें ..............३५
१९ „ ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ „ हंटिंग ..................४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेटगोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

सी. हिनीगर आणि कंपनी.
ओरिजनल निनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.


---


ॐ नमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक. मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर त्या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसं, कोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खरजीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी. वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः—

३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु०
११५ गो० ३ रु० १६५ गो० ४ रु०
२७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रु०

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंतस्थ रसायनें धातूचीं मस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाच मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—अलिकडे २।३। वर्षें आंजर्लें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी



## ORIENTAL GOVERNMENT SECURITY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED

Established 1874.
Head Office.—BOMBAY.
*Chief Agency for C.P. Berar & Khandesh*
Head—quarters—Nagpur, C. P.
—:0:—

FUNDS EXCEED TWO CRORES AND TEN LAKHS
Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount du under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security.*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh*

REGISTERED N. No. 4

आकोल्यांतील लोकांस................ १ ८
बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ ८
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंका.....................................
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस............ ०।१ ०१
दुसरे खेपेस.............. ०।

Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid in advance,
Single copy ......................... 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 3 as
Repetition Per line ... 2 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 13 JULY 1903 NO 27

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख १३ माहे जुलै सन १९०३ इ० अंक २७

## शेक्सपिअर व त्याची नाट्यकला.

( रा. रा. लक्ष्मण चिंतामण काळे बी. ए. यांनीं लिहिलेला निबंध. )

कवि आणि नाटककार शेक्सपीअर यांचे पूर्वज १४ व्या शतकापासून वारविक परगण्यांत राहत होते परंतु व्युलियम शेक्सपीअरचा बाप जॉन हा सरासरी २५५१ च्या सुमारास Stratford on Avon येथें राहूं लागला. हा शेतकरी आणि खाटिक असून शिवाय धान्य, लोकर, व कातडी यांचा व्यापार करीत असे. याची पत्नी ह्मणजे व्युलियमची आई लवळच असणाऱ्या विल्मकोट येथील प्रसिद्ध आरडेन कुटुंबांतील होती. मेरी आरडेन व जॉन शे- यांचें लग्न १५५७ मध्यें झालें. यांस ४ मुलगे व ४ मुली अशीं ८ अपत्यें झालीं, त्यांत विल्यिम शेक्सपीअर हा सर्वांत वडील असून याचा जन्म ता. २३ एप्रिल १५६४ रोजीं झाला असें पुष्कळ ग्रंथकारांचें ह्मणणें आहे. आणि त्यास धर्मदीक्षा ता. २६ रोजीं दिली, त्याबद्दल पुरावा आहे. त्याचा बाप १६०१ मध्यें वारला व आई १६०८ मध्यें वारली. स्ट्राटफर्ड येथील शाळेंत त्याचें प्राथमिक शिक्षण झालें. तेथेंच त्यास लॅटिन, ग्रीक ह्या पुराण भाषांचा ओनामा मिळाला व पुढें त्यानें आपलें त्या भाषाचें ज्ञान वाचनानें वाढविलें असावें कारण त्यांस विश्वविद्यालयांतील शिक्षण मिळालें नाहीं. त्याच्या पुराणभाषांतील कोविदत्वाबद्दल बहुतेक ग्रंथकारांचा मतभेद आहे. याच्या बापाची गरिबी असल्यामुळें यास शिक्षण क्रम लवकर सोडावा लागला आणि वडिलांचा धंदा शिकावा लागला असें कांहीं ह्मणतात. त्याचा समकालीन कवि Ben Jonson याने शेक्सपीअरच्या मरणा नंतर याचा मृत्युलेख लिहिला तो या लेखांत त्याच्या भाषाकोविदत्वा बद्दल "Small Latin and less Greek" असें ह्मणतो यावरून व शेक्सपीअर स्वतः आपल्या एका स्फूट पद्यांत आपल्या अज्ञानत्वाबद्दल स्पष्ट उल्लेख करितो, यावरून त्याचें शिक्षण पुरेसें झालें नाहीं असें वाटतें. तरी पण याच्या ग्रंथाच्या अंतःपरिक्षेवरून असेंच असेल असें वाटत नाहीं. १८ व्या शतकांतील कांहीं ग्रंथकार त्याच्या ग्रंथांत इतिहास भूगोल ज्ञानाच्या आणि अशाच कांहीं इतर चुका झाल्या आहेत ह्मणून यास अज्ञानांधकारांत लोटून देतात. परंतु १९व्या शतकांतील मर्मज्ञ लेखकांस याबद्दल फार अभिमान वाटतो आणि तो विशेषज्ञ होता असा पुरावा त्याच्या ग्रंथांतूनच ते काढून देतात. याच्या ग्रंथांच्या अंतःपरीक्षेवरून यास बायबलचें व जुन्या इतिहासाचें पूर्ण ज्ञान होतें. त्यास अरिस्टाटलच्या नाट्यविषयक व इतर ग्रंथाची चांगली माहिती होती फार तर काय ! परंतु तो व बेकन हा दोन भिन्न व्यक्तीच नव्हत्या असें ठरविण्याचाही प्रयत्न झाला. असो, या दोन्ही बाजूकडेही त्याची ओढाताण न करितां, सामान्यतः पाहिलें तरी, त्याला लॅटिन व ग्रीक ह्या दोन पुराण भाषांचें व या वेळच्या बराचश्या प्रचलित भाषांचें चांगलें ज्ञान होतें असें दिसतें. त्यावेळेस ऊर्जित दशेस आलेल्या इटालियन नाट्यकलेची याला बरीच ओळख झाली होती. त्याच्या ग्रंथांतून लॅटिन भाषेंतील शब्दसमुच्चय, लॅटिन तऱ्हेवर केलेले प्रयोग आणि लॅटिन भाषेंतून अर्थ बदलून इंग्रजी भाषेंत आलेले शब्द यांच्या मूळच्या अर्थानें उपयोग केलेले आढळतात. शिवाय त्यानें जीं २ काव्यें लिहिलीं त्यांचे विषय लॅटिन पुराण ग्रंथांतीलच आहेत. या वेळीं इतिहास ह्मणजे केवळ बखरीच्या रूपानें असे आणि भूगोल हा विषय शाळांतून शिकविण्यांत येत नसे, या गोष्टीकडे लक्ष दिलें तर अशा क्षुल्लक चुकावरून त्यास ज्ञान पर्वता वरून खालीं ढकलून देणें हें अमानुष कृत्य होईल. बाकी तो कांहीं विश्वविद्यालयांतून शिकून आलेला नव्हता. तरी त्यांतून पदवी घेऊन बाहेर पडलेल्या मार्लो सारख्या नाट्य ग्रंथलेखकाबरोबर त्यानें टक्कर मारिली या वरून तो चांगलाच भाषाज्ञानपटु असला पाहिजे.

शेक्सपीयर १४ वर्षांचा झाला तेव्हां त्याच्या बापाची स्थिति खालावत चालली होती. त्याचा व्यापार बसला, व याचा जमीन जुमला, घरदार, वगैरे सर्व स्थावर मिळकत जाऊन तो कर्जबाजारी झाला. बापाची अशी स्थिति असतांना व्युलियम हा वाईट लोकांच्या संगतीनें बराच बिघडला होता. १९ वर्षांचा असतांना यानें लहानशी चोरीही केली, व याजवर याबद्दल खटला करण्यांत आला होता असें ह्मणतात. त्याच सुमारास याच्या दुर्वर्तना संबंधानें आणखीही विशेष पुरावा आहे. तो एका वाईट चालीच्या स्त्रीच्या नादीं लागला होता. याच्या स्फूट पद्यामध्यें ही गोष्ट यानें उघडपणें लिहिली आहे. याच्या कांहीं चरित्र लेखकांना ही गोष्ट कांहीं पसंत पडत नाहीं. आपल्या चरित्राचा नायक असा बदफैली असावा ही गोष्ट यांना आवडत नाहीं. तो केवळ साधु असावा असें यांना वाटतें. परंतु वस्तुस्थिति तशी नसल्यास विनाकारण याबद्दल हळहळ करण्यांत अर्थ नाहीं. त्या वेळची इंग्लिश समाजाची आणि त्यांतल्या त्यांत स्ट्राटफर्ड शहरची स्थितीच बिघडली होती. बहुतेक तरुण मंडळी असल्या फंदांत पडलेली होती. आणि तत्कालीन ग्रंथकार मार्लो, ग्रीन वगैरे सर्व कांहींना कांहीं तरी फंदात होते अशी त्यांच्या बद्दल प्रसिद्धी आहे. मग एकट्या शेक्सपीअरलाच साधु कोटींत नेऊन बसविण्याचा वृथा प्रयत्न कां करावा हें समजत नाहीं.

शेक्सपीअरनें आपल्या वयाच्या १९ व्या वर्षी ॲनहाथावे या नांवाच्या स्त्रीशीं लग्न केलें. ही बाई वयानें त्याच्या पक्षीं ७।८ वर्षांनीं वडील होती. ही फारशी चांगली श्रीमंत होती. यावरून या लग्नामध्यें प्रीतीचा भाग कितीसा होता याचा संशय आहे. शिवाय शेक्सपीअरला या लग्नापासून सुख मिळालें नाहीं. तो पुढें लंडन मध्यें असतांना त्याची बायको स्ट्राटफर्ड येथेच असे. तसेंच त्यानें आपल्या मृत्युपत्रांत तिला व तिच्या नातेवाईकांना कांहीं दिलें नाहीं. शिवाय याच्या स्फूट पद्यांत ही त्याला वैवाहिक सुख मिळालें नाहीं अशी कुरकुर त्यानें केली आहे.

तो १५८७ त स्ट्राटफर्ड सोडून लंडन येथें गेला. तेथें जाण्याचा त्याचा हेतु कोणता होता हें निश्चित करितां येत नाहीं. कुटुंबाच्या दरिद्री स्थितींत त्यांस कांहीं मदत करावी ह्मणून, अगर काव्य व नाटककला याची गोडी लागली ह्मणून, अगर वर निर्दिष्ट केलेल्या चोरीच्या अपराधाची चौकशी टाळण्या करितां ह्मणून अगर ह्या तिन्हींहि कारणां करितां ह्मणून तो लंडन येथें गेला अशी कल्पना आहे. तो लहान होता तेव्हां पासुनच ह्मणजे १५६९ पासूनच त्याच्या गांवीं निरनिराळी नाटककार मंडळी वारंवार येऊन खेळ करीत असत तेव्हां पासून त्यास काव्य नाटकाची गोडी लागली. या मंडळींत खुद्द वॉरिक परगण्यांतील पुष्कळ नट होते. स्वॅपकायरस् मधील पहिलें नाटकगृह बांधणारा प्रसिद्ध जेम्स बरबेज, मार्लो, ग्रीन, ॲकरमन वगैरे प्रसिद्ध नट व नाटककार स्ट्राटफर्डच्या जवळ पास चेच राहणार होते. तो लंडनमध्यें गेल्यावर पहिल्यानें जेम्स बरबेजच्या मंडळींत शिरून नटाचें काम करूं लागला. त्याच वेळीं तो नाटक रचनाही करूं लागला. १५९१ च्या सुमारास यानें आपली काव्यें लिहिलीं. त्यामुळें व त्याच्या धंद्यामुळें त्याला चांगल पैसा मिळूं लागला व त्यानें आपल्या बापास मदत करून त्याची गहाण पडलेली सगळी मालमत्ता परत मिळविली. १५९८ च्या सुमारास तो चांगलाच पुढें सरसावला व श्रीमंत लोकांत मोडूं लागला. १६०१ मध्यें त्याचें वार्षिक उत्पन्न ४४० पौंड होतें व पुढें तो स्ट्राटफर्ड येथें राहण्यास आल्यावर त्याचें उत्पन्न सालीना १००० पौंड पर्यंत वाढलें होतें त्यानें १६०४ पर्यंत नटाचें काम केलें. पुढें ता लंडन मध्यें केवळ ग्रंथरचना करी. १६१२ मध्यें त्यानें लंडन शहर सोडलें व तो स्ट्राटफर्ड येथें राहण्यास गेला, तेथें गेल्यावर त्यानें ग्रंथरचना केली नाहीं.

तो आपल्या वयाच्या ४९ व्या वर्षी ह्मणजे १६१६ एप्रील महिन्याच्या २३ व्या तारखेस ह्मणजे जन्माच्या तारखेलाच मरण पावला तो मरणापूर्वीं बरेच दिवस आजारी होता. त्यानें मृत्युपत्र करून ठेविलें होतें. त्याच्या मरणानंतर स्ट्राटफर्ड येथील लोकांनीं तेथील स्मशानांत त्याचा पुतळा उभा करून स्मारक केलें. गेल्या शतकामध्यें लंडन येथील प्रसिद्ध स्मशानांत–वेस्ट मिनिस्टर ॲबेमध्यें. कवी करितां राखून ठेवलेल्या कोंपऱ्यांत ( Poets' Corner) त्याचा दुसरा पुतळा उभा केला.

यांस मरण कालीं २ मुली होत्या. त्यांचीं लग्नें त्याच्या हयातींतच झालीं होतीं. यानें नातूही पाहिला होता. येथपर्यंत शेक्सपीरचे त्रोटक चरित्र झालें. आतां त्याच्या काव्याबद्दल व नाटकांबद्दल विचार करूं.

शेक्सपीअरचीं दोन काव्यें– Venus and Adonis आणि Lucrece हीं अनुक्रमें १५९३—१५९४ वर्षी प्रसिद्ध झालीं. हीं दोन्हीं काव्यें अर्ल–आफ् सोथम्प्टन् यांस अर्पण केली होतीं. ही दोन्ही काव्यें शृंगार रसपूर्ण असल्यामुळें हीं तारुणमदामध्यें लिहिलीं आहेत हें स्पष्ट होतें. यांतील विषय जुन्या रोमन पुराण ग्रंथांतले आहेत. यांत अश्लील वर्णन बरेंच आहे. तरी पण त्यांची रचना आणि काव्यमाधुर्य असें आहे कीं हीं दोन काव्यें आणि स्फुट पद्यें इतकीच या कवीची कविता जरी आज प्रसिद्ध असती तरी त्यावेळचे प्रसिद्ध कवि Spencer, Drayton वगैरे प्रमाणें त्याचें नाव हयात असतें. त्यावेळच्या लोकांना इटालियन काव्यें वाचण्याची गोडी लागली होती आणि शेक्सपीअरच्या या काव्यांतील विषयही इटालियन व रचनाही इटालियन पद्धतीची असल्यामुळें हीं लोकांस फार आवडलीं. व त्यामुळें कवीस कीर्ति व धन याचा चांगलाच लाभ झाला.

शेक्सपीअरनें १५४ स्फुट पद्यें Sonnets लिहिलीं सानेट हें १४ ओळींचें वृत्त आहे. ही पद्यें त्यानें १५९२–१६०८ निरनिराळ्या काळीं लिहिलीं. ह्या पद्या पासून शेक्सपीअरचा स्वभाव, त्याची गृहस्थिति, त्याचे मनोविकार व त्या काळांतील त्याचा आयुष्यक्रम ह्या संबंधानें बरीच माहिती मिळते. हीं पद्यें प्रसिद्ध व्हावीं असा त्याचा हेतु दिसत नाहीं.

ह्यांपैकीं पहिलीं १२६ एका मित्राला ज्याच्या नांवाचीं आद्याक्षरें W. H. आहेत त्याला संबोधून लिहिलीं आहेत व बाकीचीं २८ वर निर्दिष्ट केलेल्या अनीतीच्या संबंधाच्या स्त्रीला संबोधून लिहिलीं आहेत हीं सर्वच पद्यें कोणा स्त्रीला संबोधून लिहिलीं असावीं असा तर्क बरेच दिवस होता परंतु Mr. W. H.

ज्यास उद्देशून पहिलीं १२६ पद्यें लि-हिलीं तो Henry Writho'esley Earl of Southampton च आहे असें गेल्या शतकांत निश्चित करण्यांत आलें. तीं ज्यास संबोधून लिहिलीं आहेत त्याच्या नांवाची पूर्ण परि-स्फुटता होऊं नये ह्मणून आद्याक्षरांचा विपर्यास केला आहे, बाकी ज्यास त्यांचीं काव्यें नजर केलीं आहेत तो अर्ल आफ सौथाम्पटन हाच होय. ह्या सरदाराचें त्यावेळीं दरबारांत चांगलें वजन असून तो विद्वानांचा चाहता होता. शेक्सपीअरची आणि यांची मैत्री फार दाट होती. ह्मणून त्यांनीं ह्या काव्यांत आपल्या मनांतल्या सर्व गोष्टी उघडपणें करून सांगितल्या आहेत.

---

वऱ्हाडसमाचार

मिति आषाढ वद्य ४ शके १८२५

---

## निरोप

रावबहादूर बंधूजी जनार्दन चौबळ एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर वर्ग १ ला, कोर्ट उमरा-वती यांनीं गेल्या मंगळवारीं सरकारी चाक-रीचा शेवटचा निरोप घेतला. त्यांच्या आम-दानींत न्यायाधीश, वकील मंडळी व पक्ष-कार लोक यांच्या मधील संबंध मोठ्या प्रेम-भावाचा, सरळपणाचा व गोडी गुलाबीचा असा राहिला. यांस सर्व मंडळी फार चाह-तात आणि त्याच निमित्तानें सर्व मंडळींनीं भर कोर्टांत त्यांचा धन्यवाद केला व त्या वेळच्या प्रेमळ उद्गारांमध्यें भावी वियोगा-च्या गोष्टी अंतर्मुख झाल्या होत्या. त्यांच्या सन्मानार्थ उमरावतीच्या विश्रांती गृहांत मेजवानीही देण्यांत आली होती. रावबहादूर बंधूजी साहेब मूळचे ठाण्याचे रहिवाशी हे कायस्थ प्रभू आहेत. यांच्या वयाला गेल्या मंगळवारीं ५८ वें वर्ष लागलें यांचा विद्या-भ्यास अव्वल इंग्रजीच्या मानानें बरा झाले-ला होता. हे आपल्या वयाच्या १९ वर्षी मुंबई हायकोर्टाच्या अपिलेट बाजूला प्रथम चाकरीला लागले तेथें ते पंधरा वर्षें होते. क्लार्क वर्ग ३ च्या पर्यंत त्यांची बढती झाली. पुढें त्यांनें वळण हैदराबादेस रेसि-डेन्सी मध्यें जुळलें. १८८१ च्या नोवेंबर महिन्यांत ते ई. ए. सी. वर्ग ५ चे होऊन हैदराबादेस आले. तेथें त्यांच्याकडे सरकारी भाषांतर कर्त्यांचें ही काम होतें. तेथेंच त्यांस ४ वर्गाची बढती मिळाली आणि सुमारें ९ वर्षे हैदराबादेस गेल्या नंतर त्यांची बदली १८९० सालीं बुलढा-ण्यास झाली. सुमारें पांचसहा महिन्यांनीं त्यांची बदली उमरावतीस झाली; आणि आज बारा साडेबारा वर्षे त्यांची नेमणूक एकाच सदर स्टेशनाला कायम होती. त्यां-च्या अंगच्या सौजन्यामुळें हा दीर्घ सहवास लोकांस फार सुखकर झाला आणि त्यांच्या बहुविध अधिकारामुळें त्यांच्याशीं पुष्कळ जणांचा संबंध पडत होता आणि ज्याला त्याला हे मन मिळाऊ अधिकारी अधिका-धिक आवडत असत. सरकारी अधिकार निराभिमानानें चालविण्याची हातोटी यांच्या कडून पुष्कळशा अधिकाऱ्यांनीं अवश्य शि-कावी अशी आह्मी शिफारस करितो.

रावबहादूर बंधूजी साहेब हे आपल्या कर्तृत्वानें सांप्रतच्या हुद्याला चढले आहेत. त्यांनीं ३८ वर्षें सरकारी चाकरी केली. इतक्या वर्षांच्या चाकरी नंतर नित्य परिच-यांतल्या अधिकार वैभवाची त्यांस पुष्कळदां आठवण होईल, त्यांची रोजची चाकरीची धांवपळ सुटल्यामुळें त्यांचा वेळ जाईनासा होईल आणि दुसऱ्या कांहीं गोष्टींची आवड असल्यामुळें त्यांस पुढें काय करावें हें सुचणार नाहीं अशा गोष्टी सरकारी चाकरी संबंधानें वारंवार घडतात; आणि त्यामुळें त्यांचा विश्रांतीचा काल सुखकर न होतां घटत घटत जात असतो. रावबहादुरां सारखीं पिकलेलीं पानें आह्मांस अवश्य पाहिजे आ-हेत. त्यांचा अनुभव लोककार्याला चांगला उपयोगीं पडेल, त्यांच्या अंगीं जो सेवाधर्म बाणला असतो त्याला अनुरूप असेंच कार्य त्यांच्याकडे पाहिजे. राव बहादुरांनीं एखादें सार्वजनिक कार्य हातीं घ्यावें अशी आमची फार फार इच्छा आहे आणि तसें कर ण्यापासून त्यांचें आयुष्य दुणावेल व त्यांस विश्रांतीचा आराम दीर्घकाल लाभेल. आह्मी तर असें सुचवितों कीं रावबहादूरां सारख्या गृहस्थांस आनररी माजिस्ट्रेटी किंवा एखाद्या लवाद कोर्टाचा अधिकार अवश्य द्यावा ह्मणजे त्यांच्या सद्गुणांचा परिमळ लोकांस फार सुपसन्न ठेवील.

राव बहादुरास सर्व संसारसुखें अनुकूल आहेत. यांचे ज्येष्ट चिरंजीव राजश्री हे बी. ए. एल, एल. बी असून तहशीलदारीवर आहेत. यांच्यापाशीं अर्थ-संचयही चांगला आहे. सर्व गोष्टी त्यांचा भावी काल सुखकर करोत आणि यांच्या हातून वानप्रस्थ आश्रमांतील लोकसेवा चां-गली घडवून आणोत एवढीच प्रबळ इच्छा आहे.

---

## भावी दरबार.

'प्रमोदसिंधु' कर्त्यांनीं एका अंतस्थ बातमीची परिस्फुटता केली आहे आणि बात-मीच्या खजिन्याला बिनचूक लागणारी किल्ली यांच्या हातीं लागली आहे असें ते ध्वनित करितात. त्यांच्या माहिती प्रमाणें वऱ्हाड प्रांताचा निकाल सरकारी रीतीनें लवकरच बाहेर येईल आणि त्यांत वऱ्हाड प्रांत नागपुराकडे जोडण्याचा संकल्प झा-लेला आहे. या प्रांताचे चार जिल्हे करून हा प्रांत वहिवाटीसाठीं मध्य प्रांताच्या चीफ कमिशनराकडे जाणार आहे या गोष्टीचा खल आह्मी अनेक वेळां केला आहे आणि आह्मांस आतां बातमीची ललकारी नको. सरकारी ठराव कायतो आमच्या दृष्टी पुढें पाहिजे आहे. नागपुरा कडे कारभार गेल्यामुळें होणाऱ्या सोयी गैरसोयी लोकांच्या ध्यानांत आहेतच तेव्हां मनाची प्रवृत्ती नागपुराच्या संबंधाला अनु-कूल अशी करण्याकडे सर्वांनीं तयारी करावी.

---

# The Berar Samachar

MONDAY JULY 13 1903

---

## SANITATION IN BERAR

The last report of the Sanitary Administration in Berar, shows that the year 1902, was on the whole, a healthy one for the Province. The excess of births over deaths during the year, was 65801 *i. e.* there were only 57 deaths to every 100 births. This shows that the people have been apparently rapidly recovering from the effects of the last famine. We say apparently because a large number of births *per se* is not a sure index of the prosperity of the people, as it often is consistent with the poverty of vitality in them. The year under report is noted for the immunity enjoyed by the Province, from its annual visitant—the cholera, which did not visit the province except the Village of Hingue Gowbal in the Buldana District. It is also a matter for satisfaction that the number of deaths due to fevers, is much below that recorded during the past 26 years barring the years 1883, 18-8 and 1898. This fact may be due as suggested by Mr. Hare following the old fashioned view, to the low level of moisture *i. e.* evidently underground water caused by successive short rainfalls during the past few years; but following the modern view on the subject, it may be attributed to a diminution in the number of breeding places for mosquitoes owing to scanty rainfall. But the work of cholera was taken up by Plague, which has after all gained a footing in our province, in spite of the repeated efforts of our authorities to keep it at a distance. We had expected to find in the Report a detailed account of the measures undertaken in the several districts to stamp it out. The chief peculiarity in connection with these plague measures, is that their working differs with every district, although all the districts belong to one and the same province. It has been the practice in one district, as our information goes, to order passengers who have arrived from an infected area, to report themselves to Hospital Assistant or Patel—where the services of the former are not available ) every day, for ten days, under the penalty of being run down under section 188 of the Indian Penal Code, for failure to carry out the order, another district on the other hand, is satisfied with a bare record of the addresses of the arrivals, the duty of inquiring after their health, being entrusted to laymen like Municipal or Police peons*!* A similar difference will be observed in the several districts in the working of other plague measures *i. e* as regards compulsory disin—fection, evacuation and others. The one measure which has become popular and which is easily resorted to by the public, is evacuation; people are unwilling to resort to others partly owing to the superstitious beliefs of generations which are ingrained in them and which have therefore become second nature with them, and partly owing to their want of confidence in those measures as regards their efficacy. It will be rather idle to expect the lay public to readily resort to these measures when every week brings to light a new theory of some renowned medical *savant* controverting that of his co-worker in the same field. It will be better for the Government therefore to follow the practical advice contained in twelve sensible articles which have recently appeared in the Pioneer, on the subject under the heading "Common Sense Plague Policy." The writer of these articles asks the Government to attend to two things only viz—advising the people to evacuate as soon as a case occurs in their house, and to prevent all possible contact with the people from infected area. He condemns others measures such as disinfection and establishment of Hospitals as absolutely useless. The Government will therefore do well to look to general sanitation, and to follow the above instructions.

The total expenditure incurred by the municipalities during the year, is anrther interesting feature of this Report. It amounted to Rs. 1,08,589 bearing a proportion of 40 *p. c.* to the estimated income, while the income derived from conservancy by these bodies, amounted to Rs. 37,050 only Mr. Hare has therefore rightly acknowledged that the Municipalities have contributed a fair share of their income in this respect. We hope that this fact will not be lost sight of in future, when Government intend to saddle fresh charges on the finances of the Municipalities, which being already taxed by the strain of plague expenditure can hardly admit of an appreciable expenditure on an extravagant scheme like the Mosquito Briga.

—:0:—

"Both the Hindu and the Mohamedan civilisations are only two species coming under the general name of Asiatic civilization. It has always been the chief racial characteristic of all Asiatic peoples to strive in all things after spiritual excellence. The history of the various peoples of Asia has this one mark of resemblance. Whether it was the Hindu struggling out of barbarism on the banks of his historic rivers, living a patriarchal life and waging cruel fights with the dark aboriginal tribes whom he was busy exterminating, whether it was the yellow Chinaman emerging out of the savage state, striving after lofty ideals of beauty with a passionate earnestness unknown probabaly to any other race of man whether it was the Jew worshipping among rocks and deserts the vengein Deity who commanded him to exterminate the idolatrous tribes by whom he was surrounded; or whether it was the wild Arab of the desert passionately striving to follow the one true God Whom his great Prophet had seen face to face; each in whatever he did, even in the true things spiritual excellence. Their ways may have been different, they may have employed different methods in trying to solve the problem which they had placed before themselves But the goal after which each one was striving was the same. The problem which each one was attempting to solve was the same. And so in spite of a superficial difference in their civilizations the goal for which each civilizations was striving was essentially the same. Everything temporal, wealth prosperity, warlike achievement, was subordinate to the allruling spiritual ideal. And the striving after that ideal was never something which could be contemplated as a thing apart from the actual life of the people. It was present in everything that they did, in every thought that they

thought. It formed in fact the inner life which shaped all their every day acts. And so the locus of the point of starting in the race of civilization for both Hindu and Mohamedan was the same and the goal of either was the same. The difference lay only in the method. And it was, therefore, that there was no concussion worth the name between Hindu and Mohamedan thought when the Mohamedan first came into this country. We say, therefore, that in spite of apparent differences, there is this great point of resemblance and, therefore, this great point of unity between the Hindu and the Mohamedan."

Bengalee.

## वऱ्हाडवृत्त

हवामान— या आठवड्यांत पुनर्वसु नक्षत्राचे दोन चार पाऊस फार चांगले झाले. पण हा पाऊस जितका सार्वत्रिक व्हावयाला पाहिजे तसा अद्याप झालेला नाहीं. रोगराई म्हणण्या सारखी कांहीं नाहीं.

रा. रा. परशराम चिंतामण जोगळेकर यांनीं आंग्लवैद्यक व आर्यवैद्यक या विषयावर काल सायंकाळीं व्याख्यान दिलें.

रा. रा. बळवंत विष्णु वैद्य डिपुटी एज्युकेशनल इनस्पेक्टर, जिल्हा आकोला हे दोन महिन्यांच्या रजेवर गेले होते ते परवा रजेवरून परत येऊन त्यांनीं आपले कामाचा चार्ज घेतला.

त्यांच्या गैरहाजिरींत रा. रा. गंगाधर रावजी सोहनी सब डेपुटी इनस्पेक्टर जिल्हे मजकूर यांस इनस्पेक्टर नेमण्यांत आलें होतें.

पूर्णेच्या पलिकडे उत्तर बाजूला जळगांव तालुक्यांत अद्याप पर्यंत पाऊस पुरेसा न झाल्या कारणानें पेरणीचीं कामें खोळंबलीं आहेत. कित्येकांनीं मावी पावसाच्या आशेवर आगाऊ पेरे केले होते परंतु ते आता फसल्या सारखे झाले आहेत, साल मजकुरीं पावसाचें चिन्ह बरोबर दिसत नाहीं.

हल्लीं पंढरपुराहून यात्रा परत येऊं लागली आहे. पंढरपुरास प्लेग उद्भवल्याची वार्ता एकूं येऊं लागल्यामुळें प्लेगा संबंधी एक नवीन काळजी उत्पन्न झाली आहे. या निमित्तानें स्टेशनावर डाक्टरची तपासणी सुरू झाली आहे.

मे० रुस्तुमजी फर्दूनजी डेपुटी कमिशनर हे तालुक्यांच्या खजिन्यांची व इतर कामाची तपासणी करण्यासाठीं तालुक्यांच्या सदर स्टेशनाला जात आहेत. त्यांचे मुक्काम तारिखवार येणें प्रमाणें:—

| | |
|---|---|
| बाळापूर | १२।१३।१४ जुलै |
| आकोला | ९ जुलै |
| खामगांव | १६ ते २० जुलै |
| आंगांव | २१ |
| आकोट | २२ ते २६ जुलै |

रा. रा. गोविंद भास्कर ओक सेक्रेटरी जिल्हा बोर्ड आकोला यांस येथें वाशिमाहून बदलुन आणिले तेव्हां त्यांस येथील जागेचा १०० रुपये पगार देण्यांत यावा असा विचार होता. परंतु कांहीं नियमामुळें तसा संपूर्ण पगार देता येईना. पुढें यांचे काम पाहून वरिष्ट अधिकारी खूष झाले आणि त्यांनीं यांस चालू साला पासून १०० रुपये पगार मिळावा असा स्थानिक सरकाराकडून ठराव करून आणविला हें कळविण्यास आनंद वाटतो.

कुमार श्री हरमानजी रावजी डेपुटी कमिशनर, जिल्हा बुलढाणें यांची स्वारी नांदुरा येथें तारीख ८ रोजीं आली होती; व त्यांनीं ९ तारखेला सकाळीं गांवकरी लोक व आसपासच्या खेड्यापाड्यांतील प्रमुख लोक यांची सभा भरविली व त्यांनीं प्लेगापासून रक्षण करून घेण्याकरितांच्या सर्व गोष्टींचा खुलासा केला. रा. रा. कृष्णराव पुरुषोत्तम भट, तहशिलदार हे साहेबा बरोबर फिरत असून प्लेगासंबंधानें लोकांस स्वतां उपदेश करून निरनिराळ्या उपायांची योजना मोठ्या काळजीनें करीत असतात.

मे० क्यांडी साहेब बहादूर डायरेक्टर शाळाखातें यांची स्वारी उन्हाळ्या निमित्त चिखलदऱ्यास होती पण ते आतां आकोल्यास येऊन दाखल झाले.

गेल्या सालीं एप्रिल महिन्यांत येथें फिमेल ट्रेनिंग क्लास मुलींच्या शाळेंत सुरू झाला. अखेर परीक्षे पर्यंत चार विद्यार्थीणी या वर्गांत शिकत होत्या. यापैकीं तिघींची वार्षिक परीक्षा होऊन दोघीजणी दोन वर्षांच्या अभ्यास क्रमापैकीं पाहिल्या वर्षाच्या अभ्यास क्रमांत पसार झाल्या; आणि त्यांस पुढील अभ्यास शिकण्याची परवानगी देण्यांत आली. या ट्रेनिंग क्लासाच्या प्रवेश परीक्षे साठीं निरनिराळ्या भागांतून आठ विद्यार्थीणी आल्या होत्या त्यापैकीं पांचजणी नव्या वर्गांत घेण्या लायक आहेत असें म्हणतात. यंदा आलेल्या विद्यार्थीणी प्रौढ वयाच्या समजूतदार असल्यामुळें या क्लासाला शोभा येणारी आहे आणि भावी शिक्षकांचा धंदा करण्याला अधिकाधीक लायक अशा निपजतील अशी उमेद आहे.

रा. रा. गंगाधर कचेश्वर पेनशनर क्लार्क हे एक दिवसाच्या सन्निपात ज्वरानें गेल्या गुरुवारीं मरण पावले. हें कळविण्यास दुःख वाटतें.

## आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | | १००४= |
| सोनें | २४।= | चांदी | ६९ |
| जवारी | ४९।५० | जवस | १०० |
| गहूं | ४।। ५। | | ९९ ते १०० |
| बाजरी | | | ५९ |
| मीठ | | | ४ रु. मण |
| चणे | | | ३॥= रु. मण |
| तूप | | | ७॥= रु. मण |
| तेल | | | ५।- रु. मण |
| रुई | | | ५०।५४ |

## नोटास

रा० रा० किसन वलद दावजी बारी राहणार बार्शीटाकळी यांस.

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही मजला तारीख २२।६।०३ च्या वऱ्हाडसमाचार पत्रांतून नोटीस दिली ती पावली. तुम्ही आपल्या बहिणीस म्हणजे माझे बायकोस दिपवाळी करितां घेऊन गेला होता. त्यानंतर १०–१२ दिवसानीं मी आपल्या बायकोस नेण्या करितां आलों असतां पाठवीत नाहीं म्हणून तुम्ही हटलें. त्याच्या नंतर निमकर्दे येथील मारोती बारी, उकर्डा बारी, व गडबड बारी व मी असें चौघेजण आलों असतांही तुम्ही पाठवीत नाहीं म्हणून म्हणाला असें असतां माझे बायकोस तुम्हीच पाठवीत नसून उलट खावटीचा पैसा मला मागतां तो मी देणार नाहीं. तुमचेच मनांत तिचा दुसरा गंधर्व लावून देण्याचे आहे म्हणून तुम्ही पाठवीत नाहीं हेंच खरें परंतु असें करणें बरोबर नाहीं. तर असें न करितां तुमचे बहिणीचे म्हणजे माझे बायकोचे आंगावर असलेले चांदीचे ५० तोळ्याचे डागीनें व बाळ्या सोन्याच्या ६ मास्याच्या यासह तुम्ही आपले बहिणीस माझे घरीं पोहोचतें करावें. अगर तुमचे मनांत तिचा दुसरा गंधर्व करणें झाल्यास [illegible] तुमचे बहिणीचे गंधर्व लागण्यावरून [illegible] दिलेले रोख नगदी रुपये १०० व [illegible] खर्च रुपये १०० व [illegible] हे सर्व माझे मला आणून देऊन माझे हातची पावती घ्यावी व मग खुशाल दुसरा घरठाव करून द्यावा. त्यास माझी मनाई नाहीं. या विरुद्ध तुम्ही केल्यास तुम्ही व जो गंधर्व करील तो असे दोघेही जबाबदार धरले जाल. या सर्व गोष्टीचा निवाडा नोटीस पावतांच १५ दिवसाचे आत न केल्यास मी रिसशीर कोर्टांत फिर्याद करून तुमची बहीण म्हणजे माझी बायको माझे कबज्यांत घेईन व तो पर्यंत जो खर्च लागेल तो व या नोटीसीचा खर्च, असे तुम्हापासुन भरून घेईन. कळावे तारीख ११।७।०३ इसवी.

सही.
तुकाराम वल्लद आनंदा बारी
राहणार बार्शीटाकळी निशाणी [illegible].

## नोटीस.

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं, मी आपल्या जिनगीची व्यवस्था करण्या करितां तारीख १।६।०१ रोजीं मृत्युपत्र करून ठेविले आहे. हल्लीं माझा मृत्युकाळ समीप आला असे मजला वाटूं लागले आहे वरून कळवितें कीं माझे जवळ जंगम जिनगी बिलकूल कांहीं एक नाहीं. मरणा नंतर माझे योग्य गती करितां मी आपली स्थावर जिनगी मौजे हिंगणें तालुके आकोले येथील सर्व्हे नंबर ४० एकर २१–३६ गुंठे आकार रुपये ४८ चे खाते माझ्या नावानीं असलेले तें मी धर्मार्थ बुद्धीनें मंगळवारा आकोले येथील राधाकिसन चे मंदिरात देवाचे पुजा वगैरे खर्चा करितां दान केलें आहे तर तेथील पुजारी जो राधाकिसन जगन्नाथ नांवें आहे तो वहिवाटदार राहून देवाचे नांवानीं खातें व्हावें. मी जी स्थावर मिळकत वर लिहिलेली मृत्युपत्रांत लिहून दिली आहे ती धर्मार्थ कामाकरितां दिली आहे तिजवर माझे वारसानें कोणतेही प्रकारें हक्क करूं नये कळावे, तारीख १०।७ १९०३ इसवी.

सही
मन्नाबाई मर्द हानुसिंग जात रजपुत
राहणार आकोले मंगळवारा
दस्तूर खुद.

पंजाब नादारी मुकद्दमा नंबर ५

१९०३

नादारी नियमा अन्वयें नादाराला नादार ठरविण्या विषयीं त्याचे सावकारास नोटीशीचा नमुना.

विद्यमान—सि. एच, प्राईस साहेब बाहादुर नादारी कोर्टाचे जड्ज्य, आकोले यांचे कोर्टांत.

खालीं लिहिलेले सावकार व सर्वत्र लोक यांस नोटीस देण्यांत येते कीं भगुतासिंग वा. गणपतसिंग रजपुत राहणार जळगांव तालुके आकोले हा नादार आहे. असा आज तारीख ४ माहे जुलई सन १९०३ इसवी रोजीं ठराव झाला आहे आणि तारीख २९ माहे आगष्ट सन १९०३ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकारांस तक्रार करण्याची इच्छा असेल त्यांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्याजबदल ज्या साक्षीदारास समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमुद करावीं. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या दोन तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्याकरितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यांस नादारावर दावे नोंदाविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरें असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल अफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ करावी आणि ती यादी टपाला मार्फत कोर्टास पाठवावी म्हणजे दावा रजिस्टरांत दाखल होईल.

अर्जदाराचे सावकारांचीं नांवें

१ गुलाबचंद सदाराम मारवाडी वहिवाटदार कन्हयालाल सिवनीराम मारवाडी दुकान जळगांव ता. मजकूर. रु. ३५०

२ नरसिंगदास सावतराम मारवाडी मेत वारस बायको चुनाबाई दुकान जळगांव ता. मजकूर. रु. २००

३ गुलाबचंद सदाराम मारवाडी वहिवाटदार जेसिराम रामनाथ दुकान जळगांव ता. मजकूर. रु. ७९

४ वामन रामकृष्ण भट रा. जळगांव ता. मजकूर. रु. २००

५ गंगाधर गणेश ब्राह्मण राहणार जळगांव ता. मजकूर. रु. ११०

६ पांडुरंग दिनानाथ आ. पा. आई चंद्रभागा बाई जवजे दिनानाथ–जळगांव ता. मजकूर. रु. ३०

७ धोंडु गोविंदा सोनार जळगांव रु. ८०

८ रा. ब. मुकुंद बाळकृष्ण बुटी दुकान जळगांव १००

९ बालमुकुंद कन्हयालाल बैरागी राहणार जळगांव. ११

११६०

C. H. Price
नादारी कोर्टाचे जड्ज्य,
जिल्हा आकोला.

## वर्तमानसार

कलकत्याकडील कांहीं कंपनीवाले एकत्र होऊन, साऱ्या हिंदुस्थानभर विजेची ट्रामगाडी व रोषनाई करण्याचा विचार करीत आहेत.

कमी पगारांच्या नोकरांना बढती व्हावयाची ती, त्यांच्या जुनेपणावर न देतां हुषारीवर द्यावी अशा संबंधाचा हिंदुस्थान सरकार विचार करीत आहे.

नाशिक येथील वेश्यांची वस्ती शहरच्या भरवस्तींतून काढून टाकण्या बद्दल मुंबई सरकारानें ठराव प्रसिद्ध केला असून, त्याची अंमल बजावणीही चालली आहे. इतर शहरांसही ही गोष्ट लागू व्हावी.

कलकत्ता येथें एक अमेरिकन् बाई आली असून तिचा हेतु, एक सात वर्षांपर्यंतची चणचणीत व सुस्वरूप अशी हिंदु मुलगी दत्तक घेण्याचा आहे. या मुलीस ती बाई उत्तम शिक्षण देणार असून तिचा हिंदुधर्म कायम राहील! ज्याची इच्छा असेल त्यांनीं कलकत्याच्या इंडियन् मिररपत्राच्या संपादकाकडे अर्ज करावा.

येत्या सप्टेंबर महिन्या पासून हिंदुस्थानांत बरेच धुमकेतु उगवलेले दिसतील.

विजापुरास पतंगाचा खेळ खेळतेवेळीं कांहीं उपद्व्यापी मंडळींनीं एका लहान मुलास त्यास बांधून तो हवेंत उडविला. वाऱ्यासरशीं तो पतंग त्या मुलासह वर गेला व लागलीच मुलगा खालीं जमिनीवर धाडकन पडला व प्राणास मुकला!

खानदेशांत शेतसारा व तगाईच्या रकमा यांची बाकी ज्यांचेकडे थकली आहे, त्या शेतकऱ्यांचीं शेतें जप्त करण्याच्या नोटिसा, कांहीं तालुक्यांत बराबर निघत आहेत व शेत जप्त झाल्यावर शेतकीच्या नवीन अक्टाप्रमाणें तो देण्यांत येत आहेत!

देवगड तालुक्याची वाढलेली जमाबंदी सरकारानें कमी केली, त्यांत लोकांला सुमारें एक लाख रुपये परत मिळणार.

प्लेगवर काढा—पिंपळाचीं पानें ९, बेलाची त्रिदळें १९ आणि तुळशीचीं जून पानें ४९ एक पक्का शेर पाण्यांत घालून काढा करावा; अष्टमांश उरल्यावर गाळून कांचेच्या भांड्यांत ठेवावा, व आजाराच्या शक्तिमाना प्रमाणें संबंध्या १ पळीपासून चमचापर्यंत दर तासांनीं द्यावा. ४८ तासांनीं थोडथोडा घाम येऊं लागून ज्वर उतरतो. नवा भरत नाहीं. पुढें ७२ तासांनीं अजाऱ्यास पुष्कळ आराम पडतो. हा काढा सुरू झाल्यानंतर यांत मुळींच वाढत नाहीं.

गांठीवर पोटीस—फण्या निवडुंगाचा फडी आणून थोडी भाजावी, म्हणजे वरचे कांटे जाळावे. नंतर वरची हिरवी, साल तासून टाकावी. बाकीचा गीर ठेचून थोडें पाणी घालून शिजवावा, व मंदोष्ण स्थितींत गांठीवर बांधावा, प्रत्येक ३ तासांनीं हें नवें पोटीस करून बांधावें. ४८ तासांनीं गांठ बरीच कमी होते, आणि ज्वराही कमी होतो नंतर ७२ तासात गांठ अगदीं बसते, व ज्वर साफ निघतो. क्वचित् गांठ थोडी राहिल्यास ती साफ नाहींशी होईपर्यंत हा उपचार चालू ठेवावा,

कोल्हापूर महाराजांच्या ताब्यांत असलेल्या सर्व मांडलिकांवर महाराजांना पूर्ण अख्त्यारी सरकारानें दिली आहे आजपर्यंत हा अधिकार सन १८६३ च्या तहनाम्या प्रमाणें पोलिटिकल एजंट प्रांत करवीर हे चालवीत होते तो सर्व सरकारानें यापुढें महाराजांना दिला आहे. फार उत्तम.

सन १९२४ मध्यें यगुखिस्त हवेंत दिसणार असून पाची लोकांचा नाश करणार आहे व हें जग १९२९ मध्यें बुडणार असा मजकूर इंग्लंडांतील [illegible] येथें निघणाऱ्या ख्रिश्चन हेरल्ड [illegible] प्रसिद्ध झाला आहे.

यो[illegible] [illegible] पारोळे पेठ्यांतील एका गांवच्या पोलीस पाटलानें गांवावर दरवडा आला असतां स्वतः जिवावर उदार होऊन दरवडे खोरांचा हल्ला परतविला. या मर्दुमकी बद्दल त्याला सरकारांतून ४० रुपयाची बंदुक इनाम देण्याचें ठरलें आहे. शिवाय सदर पाटलास प्रांताच्या असि० कलेक्टर साहेबांनीं खासगींतून १९ रु. चें पागोटें इनाम दिलें.

इंग्लंडांतील एका वर्तमानपत्रानें असें प्रसिद्ध केलें आहे कीं, जेव्हां १ इंच पाऊस पडला असें म्हणतात तेव्हां प्रत्येक एकर जमिनीवर १०२ टन पाणी पडलें आहे असें समजावें.

कल्याण येथें वि० अमीन साहेब फाळके यांनीं तांदूळ स्वच्छ करण्याची एक गिरणी स्थापन केली आहे.

जेजुरी येथील खंडोबाची मूर्ति कोणी नीच मनुष्यानें देव प्रसन्न झाला नाहीं म्हणून फोडली. खटला सुरू आहे.

सर्व महासागरांत पासिफिक महासागर अति खोल आहे. त्यांतील पाण्याची खोली कांहीं ठिकाणीं आठ मैलांहून अधिक आहे.

निजलेल्या मनुष्याचा आंगठा ताठ असल्यास तो बुद्धिमान् व आंत वळलेला असल्यास तो निर्बुद्ध असें एका सामुद्रिक शास्त्रज्ञाचें मत आहे,

चार लक्ष रुपये खर्च करून निजाम सरकारांनीं नव्या टांकसाळीसाठीं यंत्रें आणविलीं आहेत.

टोमाटो म्हणून जें विलायती फळ आहे त्या झाडाचें कलम बटाट्याच्या झाडावर केल्यास त्या कलमास टोमाटोचीं फळें येऊन खालीं बटाटे लागतात!

रशियाच्या गादीवर बसण्यास कोणी पुरुष हक्कदार नसल्यास मुलीस गादी मिळण्यासंबंधानें एक नवीन कायदा रशियाचा झार लवकरच प्रसिद्ध करणार आहे.

झूरिच येथील पोलीस अधिकाऱ्यांनीं कुत्रें खरेदी करून त्यांस अपराधी मनुष्य पकडण्यास शिकवून, त्यांचा उपयोग गुन्हेगार पकडण्याच्या कामीं करण्याचा क्रम चालू केला आहे. या कुत्र्यांस सहा महिने पर्यंत शिक्षण द्यावें लागतें.

कलकत्याच्या ग्रांड हाटेलच्या लाहोर येथील व्यापारी पेटीवर हुंडी देऊन फसविणाऱ्या कॉप्टन साहेबास २ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.

ता० १ रोजीं पुणें येथील २० व्या नेटिव पायदळ पलटणींतील शिपाई किशोरसिंग यानें पहाटे ४॥ चे सुमारास जमादार बिजयसिंग याचे खोलीकडे जाऊन तो पिली म ओढीत असतां दोन गोळ्या त्याचे छोनयावर झाडून त्यास ठार करून पळून गेला. जमादार पुढें मरण पावला. पळून गेलेल्या शिपायानें वाटेंत आपला खाकी पोषाख बंदुक वगैरे टाकून दिलेली सांपडली.

ता० ३० रोजीं संध्याकाळीं मोरवे श्री पंतसचिव यांनीं गवरनर साहेबांस येथील गार्डन रीच वरिल्या बंगल्यांत थाटाची पान सुपारी केली. त्यावेळीं श्रीमंत, त्याचे चि० व भाऊ यांस कॉरोनेशन पदके देण्याचा बादशहाचा हुकूम झाल्याचें कळवून लार्ड नार्थकोट साहेबांनीं एक सोन्याचे व दोन रुप्याचीं पदकें त्यांस अर्पण केलीं. लेडी नार्थकोट यांनीं श्रीमंताच्या पत्नीची मुलाखत घेतली.

निरंतरच्या करारानें दिलेल्या जमिनीच्या मक्त्याचा वसूल कुळाकडे एखादे वर्षी थकला म्हणून तेवढ्यावरून त्याचा कूळपणाचा हक्क नष्ट होत नाहीं. त्या कुळाकडे येणें राहिलेले पैसे वसूल करण्याचा मात्र जमिनवाल्याचा हक्क आहे, असें कृष्णाजी महादेव गोरे विरुद्ध रामा गोविंदशेट तेली यांमधील कज्यात मुंबई हायकोर्टानें ठरविलें आहे.

सरकारी नोकरांच्या जमिनी—सरकारी रिपोर्टाचीं कामें वाढूं नयेत म्हणून शाळाखातें, रेव्हे, इ० कांहीं खात्यांतील नोकरांच्या जमीनजुमल्याची नोंद ठेवण्याची बंद केलें तर बरें होईल, अशी सूचना हिंदुस्थानसरकारानें स्थानिक सरकारास केली होती परंतु ती मुंबईसरकारच्या मतास आली नाहीं एवढेंच नव्हे, तर प्रत्येक खात्यांतील कायम व हंगामी नोकर लोकांचा जमिनीचे संबंधानें जो जुना व्यवहार असेल व यापुढें ते जो जमिनीचा नवीन व्यवहार करतील त्याबद्दल माहिती देणारी नोंद दरसाल एका ठरावानें कर्मविरयाचे समजतें. नोकरांचें पगार काय आणि ते दरसाल किती रक्कम देऊन किती जमिनी घेतात, हीं माहिती सरकारास हें पत्रक देणार आहे. हें सरकारी नोकरांनीं लक्षांत ठेवावें.

---

## नोटिस

घेशमी—– तानाई मर्द राघोजी कुणबी राहणार निंबी पोस्ट आकोला यांस:–

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं ज्या घरांत राहते ते घर मी अंबाई मर्द उत्तमजी राहणार निंबी इचे पासून ता०।१०।६।०३ इसवी रोजी खरेदी घेऊन नोंदून वगैरे घेतलें. तें घर मी तुला खालीं करून दे म्हणत असतां तूं खालीं करून देत नाहींस करितां मुद्दाम या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं नोटीस पावतांच ८ दिवसांत घर खालीं करून द्यावें न दिल्यास कोर्टांत फिर्याद करून घर ताब्यांत येई पर्यंत जो खर्च लागेल तो व या नोटीशीचा खर्च व घराची नुकसानी जी होईल ती एकंदर भरून घेण्यांत येईल व घर खरेदी केल्यापासून दरमहा १ रुपया भाडे आकारलें जाईल कळावें ता० ६ जुलै सन १९०३ इ०

सही

आत्माराम वल्लद सिताराम माळोकार

कुणबी राहाणार निंबी ता०

आकोला निशाणी खुद्द

हातचा वखर.

---

## नोटीस

रा० रा० राघजी वल्लद देवजी माळी राहणार अळंद पोस्ट बारशीटाकळी यांस:–

खालीं सही करणार ईजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही माझे कमाचे नवरे असून तुम्ही लग्न होऊन पांच वर्ष पर्यंत घरीं राहिला पुढें १०।११ वर्षांपासून तुम्ही घर सोडून कोठे गेला याचा पत्ता नाहीं. तुम्ही येऊन संसार करूं लागाल म्हणून मी तुमची आतां पर्यंत वाट पाहिली परंतु तुमचा कोठेंच ठिकाणा नाहीं. माझे तर संसाराचे दिवस जात आहेत. करितां मुद्दाम या नोटीशीनें कळविण्यात येतें कीं ज्या ठिकाणीं तुम्ही असाल त्या ठिकाणीं मला घेऊन जावे कीं नांदण्यास तयार आहे व ख्रावटी बदल झालेले सावकाराचे कर्ज रुपये ३०० देऊन टाकावें. असें नोटीस पावतांच १९ दिवसांत न केल्यास ही नोटीस फारकत समजून दुसरा घरठाव करीन मग तुमचा नवरेपणाचा हक्क मजवर राहणार नाहीं. व कळावें, ता० ६।७।०३ इ०

सही

राधाबाई मर्द राघजी बोंबटकार राहणार

हादगांव ता० मुर्तिजापूर

निशाणी खुद्द

हातची बांगडी.

---


## नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आम्ही येथें विक्री करितां नाग, नरसे, जिवत्या आणि पिठोरी किंवा पाटोळा व त्यांत बुध बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच मुरेख व पहिल्यापेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापिलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदहू चित्रांचें कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल. व टपाल खर्च निराळा पडेल.

वाळकृष्ण अनोबा दलाल

कंपाझिटर.

वऱ्हाडसमाचार आफिस आकोला

आकोल्यातील लोकांस................१ रु.
बाहेरगांवीं टपालहाशिलांसह......... २ रु
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंक................ ...............
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस...........॥ १ ०६
दुसरे खेपेस.... .... ....॥ १

Town ... ... ... ... I Rs.
Mofussil ... ... ... 2 ( with postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetition Per line ...2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 20 JULY 1903 NO 28

वर्ष ३७ आकोला सोमवार तारीख २० माहे जुलै सन १९०३ इ० अंक २८

### नोटीस

रा० रा० रामराव सदाशिव साधु राहणार इलिचपूर यास.

खाली सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं ऋणको रामश्री गोपाळ बळीराम तेलंग राहणार रिधपूर तालुका मोर्शी व रा. रा. विठोबा सटवाजी मयत वारस पुत्र झाबू राहणार धनेगांव तालुके दर्यापूर यांजकडेस कर्जाची मागणी केली असतांना ऋणकोनीं जबाब दिला कीं आम्ही सर्व रकम रा० रा० रामराव सदाशिव साधु यांस चुकती करून दिली आहे. आणि या कर्जासंबंधाचा दप्तरी जमाखर्च सांपडत नाहीं किंवा तुम्हाकडून ही कर्ज वसूल केल्या बद्दलची माहिती देण्यांत आली नाहीं. तरी विनंती कीं ही नोटीस पोचल्या तारखेपासून आठ दिवसांचे आंत वरील दोन्ही बाबी संबंधानें काय तो लेखी जबाब द्यावा म्हणजे त्या प्रमाणें फिर्याद अर्जीद करण्यास ठीक पडेल. तुमची चुक असल्यास या नोटिशीचा खर्च तुम्हावर पडेल कळावें तारीख १६ माहे जुलै सन १९०३ इ.

सही
नागो त्र्यंबक तर्फे मुकत्यार पांडुरंग लक्ष्मण जोशी जवळे पोस्ट-शेगांव ता० खामगाव
दस्तूर खुद्द.

### नोटीस

शेख मंगु वा। शेखचंद्रा मुसलमान मारवाडि तेली राहणार आकोला ताजनापेठ झोपडी बजार खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आम्ही तुम्हास खुली जागा भाड्यानें दिली आहे त्याचा करार असा आहे कीं सालीना तुम्हापासून २० रुपये भाडे घ्यावें तुमचा करार फक्त एका वर्षा पुरतांच होता. आम्ही तुम्हास या नंतर जागा खाली करून द्या म्हणत असतां तुम्ही खाली करून दिली नाहीं त्यास सुमारें ४ महिने काळ लोटला; त्या बद्दल पोस्टांतून नोटीस दिली होती त्याचा ही जबाब तुम्ही दिला नाहीं. आम्ही मुंबईस गेलों असतां तुम्ही आमच्या पश्चात पत्रें वगैरे छायेकरितां घातले आहेत. त्यास आमचे मत नव्हते. असो तर ह्या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं पुढें तुम्हास आम्ही जागा भाड्यानें देऊं इच्छीत नाहीं तर ही नोटीस पावतांच ८ आठ दिवसांत आमचे ४ महिन्याचें भाडें आणून देऊन आमची जागा खाली करून द्यावी व तुमचा इमला तुम्ही घेऊन जावा. आम्हास त्या इमल्याची गरूरी नाहीं असे मुदतीच्या आंत न केल्यास कोर्ट मार्फत जागा खाली करून घेऊं व या नोटिसीच्या खर्चा सुद्धां व कोर्ट खर्चा सुद्धां खर्च भरून घेतला जाईल कळावें. ता. १५।७।०३ इ.

सही
शेख काल्लु वा। शेख इमाम मुसलमान तेली राहणार ताजनापेठ आकोला झोपडी बाजार नि० खुद्द हातची.

### जाहिरात

विक्रीस तयार-लँकेशायरचे पोलादी दोन वापरलेले बॉयलर ( इंजनें ) चांगल्या स्थितींत असून लांबी ३० फुट व रुंदी ७॥ फुट आहे. हे बायलर मेसर्स फासेट प्रेस्टन आणि कंपनी यांनीं तयार केलेले आहेत व यांत ६० पौंड वजनाचा दाब बसण्याची शक्ती आहे. गुदस्त सालीं मिळालेल्या सरटी फिकीटांत याची शक्ती ५५ पौंडाची आहे असे दर्शविलें गेलें आहे. विशेष माहिती साठीं " रॅली ब्रदर्स एजन्सी " शेगांव या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

Ralli Brothers Agency
Shegaon.

### NOTICE

—:0:—

*FOR SALE*

2 Second hand steel Lancashire boilers in good condition 30 × 7·6 constructed by by Messrs Fawcet Preston & Co. for a working pressure of 60 lb. per square foot Working pressure altered in Boiler Certificate granted last year to 55 lb. per square foot. For particulars apply to.

Ralli Brothers Agency
Shegaon.

### जाहिरात

#### ( तिखाडी तेल काढण्या बद्दल )

तिखाडी तेल काढण्या बदल

या नोटिशीनें सर्वत्रांस जाहीर करण्यांत येतें कीं येत्या तीन वर्षा करितां म्हणजे लिलावाचे तारखे पासून ते तारीख ३१ माहे मार्च सन १९०६ इसवी पावेतों वणी जिल्ह्यातील स्टेट फॉरेस्ट मधील तिखाडी गवताचें तेल काढण्याचा मक्ता तारीख ८ माहे आगष्ट सन १९०३ इसवी रोजीं डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिस यवतमाळ येथें दिवसा १२ वाजतां लिलाव करण्यांत येईल या मक्त्याचे अटी व स्टेट फॉरेस्टचे विस्तीर्ण वगैरे बद्दलची माहिती पाहिजे असल्यास यवतमाळ येथील डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसमध्यें दररोज ११ वाजल्या पासून ४ वाजे पर्यंत पहाण्यास मिळत जाईल कळावें.

यवतमाळ ता. १४।७।०३ इसवी.
S. SRINIVASALU
डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर जिल्हे वणी.

### शेक्सपिअर व त्याची नाट्यकला.

( रा. रा. लक्ष्मण चिंतामण काळेले बी. ए. यानीं लिहिलेला निबंध. )

नंबर २

आतां आपण नाटक रचनेकडे वळूं. त्यानें एकंदरींत ३७ नाटकें लिहिलीं त्यांत आनंदपर्यवसायी १८, दुःख पर्यवसायी ९ व ऐतिहासिक १० आहेत. प्रत्येकाचें ५ अंक आहेत. त्याच्या चरित्रलेखकांनीं व त्याच्या ग्रंथावर टीका लिहिणारांनीं त्याच्या नाटकांची शब्दरचना, छंद, पात्र स्वभाव विवेचन वगैरे अनेक अंतस्थ पुराव्यावरून सर्व नाटकांचा कालनिर्णय केला आहे. आणि लेखन कालाचे तीन भाग केले आहेत. पहिला भाग १५८८-१५९२ पर्यंत, दुसरा १५९३-१६०० आणि तिसरा १६०१-१६१२ ह्या तीन भागांचें मुख्य धोरण त्याच्या मताचा व नाट्यकलेचा विकास हें आहे.

पहिल्या भागामध्यें ७ नाटकें आहेत तीः—

1 Titus Andronicus
2 Pericles वीरबाहू
3—5 Henry VI ( भाग ३ )
6 Comedy of Errors भ्रांतिकृत चमत्कार
7 Taming of the Shrew त्राटिका

या वेळीं तो केवळ विद्यार्थी दशेंत असून अनुभव मिळवीत होता असें दिसतें. ह्या नाटकामध्यें हास्यरस आणि गांभीर्य, प्रेममाधुर्य व इतर मनोविकारांचें प्राबल्य हीं एकमेकांच्या आश्रयानें वास करीत आहेत; परंतु यांचा संकर झालासा दिसत नाहीं. ह्या वेळच्या नाटकांमध्यें प्रत्येक रसाचा आविर्भाव करण्या करितां भिन्न भिन्न पात्रांची योजना केली आहे. ह्यांतील भाषा व विषय हीं दोन्हींहि शेक्सपीअरच्या पूर्वकालीन समाजाच्या आवडीचीं आहेत. नायकनायिकेच्या तोंडीं ग्राम्य भाषेचे प्रयोग आहेत. ह्या नाटकांतून अनेक ठिकाणीं ज्या प्रकरणाच्या आधारें हीं नाटकें लिहिलीं आहेत, त्यातलीं भाषणें संबंधच्या संबंध फारशीं बदल न करितां तशींच घेतलीं आहेत; या वरून हीं नाटकें म्हणजे केवळ रंगावृत्ति असावीं असें वाटतें तथेंच ह्या नाटकांतून शेक्सपीअर आपली विद्वत्ता दाखविण्याची खटपट करीत आहे असें दिसत आहे. एकंदरींत ह्या नाटकामध्यें त्यानें अनुभव मिळविला, व जन समाजाला शिक्षण कसें देतां येईल हें ताडलें.

दुसऱ्या भागामध्यें म्हणजे १५९३ पासून १६०० पर्यंत एकंदर १६ नाटकें लिहिलीं. त्याचें खालीं दिल्या प्रमाणें पोटभेद केले आहेतः-

( अ ) प्रणय प्रकरणें किंवा शृंगार रसप्रधान नाटकें:-६ त्यांचीं नांवें.

1 Two Gentlemen of Vernoa— कांतीपूरचे दोन गृहस्थ.
2 Love's Labours Lost—
3 All's well that ends well— वल्लभानुनय. ( प्रेमगुंफा is Simply a paraphrase of वल्लभा )
4 Midsummer night's Dream— मधुयामिनी स्वप्न ( केरळकोकिळ )
5 Romeo and Juliet— शशिकला आणि रत्नपाल.
6 Merchant of Venice— खो न्याय चातुर्य.

(ब) ऐतिहासिक प्रकरणें ६

7 Richard III ( W )
8 Richard II— नानलकृत राजा जयसिंह
9/10 Henry IV ( part 2 )
11 Henry V.
12 King John.

( क ) आनंद पर्यवसायी नाटकें ४.

13 The Mary walies of Windsor,
14 As you like it.
15 Much Ado about Nothing.
16 Twelth Night or What you will.

( ड ) स्फुट पद्यें: हीं ह्या भागांतच गणितात ह्यांच्याबद्दल सविस्तर वर्णन मागें आलेंच आहे.

ह्या वेळीं कवीची ग्राहकशक्ति विशाल झालेली असून मनुष्य जन्माची इति कर्तव्यता त्यास समजली होती असें दिसतें. ह्यावेळची आनंद पर्यवसायी नाटकें फार सुंदर आहेत. ह्यावेळीं त्याला स्वतःच्या बुद्धिमत्तेची पूर्ण परीक्षा झाली व त्याचें इहलोकच्या संसाराशी पूर्ण ऐक्य झालें दिसतें. मागच्या काळांत त्याच्या अंगीं उघड रीतीनें दिसणारी बालिशता— " Young manishness " आतां लुप्त झाली तरी पण मनोविकारांचे फार खोल आणि भयंकर भाग म्हणजे अहेतुक दुष्टपणा वगैरे मनोविकाराला त्यानें अद्याप हात घातलेला दिसत नाहीं. ह्या वेळेचा हास्यरस स्पष्ट आणि आल्हादजनक आहे. ह्या वेळीं तो विद्यार्थी दशेंतून निघून नाट्यकलेचा अधिष्ठाता झालासा दिसतो. त्याचें मन विकसित व हर्षभरित झालें असून उदास झालेलें दिसतें. त्या काळांतील नाटकांत दुःख पर्यवसायी नाटकें थोडीं आहेत. ह्या काळांतील नाटकामध्यें विषय वैचित्र्य पुष्कळ आहे. इंग्लिश नाट्यकलेचा Comedy हा भाग त्यानें चांगला उर्जित दशेस आणिला.

वऱ्हाडसमाचार

मिति आषाढ वद्य ४ शके १८२५

## कुंठित गती

आमच्या राष्ट्राची गती कुंठल्या सारखी-च आहे. परराष्ट्रीय अंमलाखालीं हा देश सुधरावा तसा सुधरत नाहीं इतकेंच नाहीं तर या देशाची सांपत्तिक स्थिती अगदीं वाईट होत आहे. गरिबी हात धुऊन आमच्या देशाच्या पाठीमागें लागली आहे आणि या गरिबींतही एखादी उन्नतीची भरारी मारतां येईल असें ह्मणावें तर त्या बाजूनें देखील आमच्या लोकांचा अगदीं दंगाणा झाला आहे. राष्ट्रीय जीवनकला ह्मणजे या राष्ट्राची पवित्र सांपत्तिक होय. ही ती कला आमच्या राष्ट्रांत नष्टप्राय झाली आहे. आमच्या संपत्तीचे जिव्हाळे अगदीं शुष्क झाले आहेत. या संबंधानें अरुण नांवाच्या एका इंग्रजी मासिकांत कैलासवासी महादेव गोविंद रानडे यांचे विचार ग्रथित केले आहेत त्यांचा सारांश असा कीं पन्नास वर्षां पूर्वी आमच्या राष्ट्राचा कपडालत्ता स्वदेशी होत होता पण आतां आमचें राष्ट्र विलायती कपड्यांनीं सुशोभित दिसत आहे. हाच प्रकार रेशीम, लोकर व इतर वीणकरीच्या चिजवस्तू संबंधानें घडलेला आहे. तेलें व चमडा हीं देखील विलायतेहून येतात. आमच्या संसारांत लागणार सामान्य पण ठळक ठळक पदार्थ कितीतरी विलायतेहून आणावे लागतात. याची खरी कल्पना खालील आंकड्यावरून होण्या सारखी आहे.

| पदार्थ | किंमत (लक्षाच्या संख्येंत) |
|---|---|
| छत्री | ४१ |
| मुलांचे खेळ | १९ |
| स्टेशनरी सामान | २२ |
| कागद | ४१ |
| साबण | १० |
| आगपेटी | २० |
| कांच बिलोर | ६६ |
| घड्याळ | १० |
| गाडी | ७ |
| मेणबत्ती | ८ |
| किरकोळ सामान | १० |
| हत्यारें दारू गोळा | १९ |
| पुस्तकें | २१ १/२ |
| चमडा व चर्मी सामान | १६ |
| रंग | ३? |
| तेल ( मातीचें व इतर ) | २० |
| रेलवेचें सामान | २९० |
| यंत्रें वगैरे | २४० |
| लोखंड, पोलाद व इतर धातु | ९०० |

अलिकडे मद्य, मीठ, धान्य, डाळ इत्यादि पदार्थ देखील बाहेरच्या राष्ट्रांतून येऊं लागले आहेत. येणें प्रमाणें आमची राष्ट्रसत्ताच दुसऱ्यांच्या हातीं नाहीं तर आह्मी व्यापार धंद्यांच्या व यांत्रिक कारखान्यांच्या कामांतही अगदीं परस्वाधीन गुलाम बनलों आहों.

आमची परस्वाधीनता दुसऱ्या बाजूनेंही लक्ष्यांत घेण्या सारखी आहे:—

पहिली बाब आगबोटींची होय. सर्व व्यापार युरोपिअन लोकांच्या हातीं आहे. आमच्या देशाच्या बंदरांचा देखील व्यापार बहुतेक इंग्लिश लोकांच्या हातीं आहे. नेटिवांच्या हातीं फक्त शेंकडा १ १/२ टनांचा व्यापार आहे.

२ री गोष्ट पेढींची. हा धंदा सर्वैव दुसऱ्या राष्ट्रांच्याच हातीं आहे.

३ री गोष्ट रेल्वे संबंधानें. या व्यापाराचा मक्ताच परकीयांकडे आहे.

ज्यांच्या हातीं राजसत्ता आहे त्यांच्याच हातीं हीं व्यापाराचीं सूत्रें आहेत ही गोष्ट कांहीं विचित्र नाहीं. आह्मी विसरतां कामा नये कीं आह्माला राजकीय हक्क पाहिजे असतील तर आपण राज्यकर्त्यांच्या बरोबरीला व्यापार व उद्योगधंदा या मध्यें येण्या साठीं अहर्निश प्रयत्न केला पाहिजे. या प्रयत्नांतच भावी राष्ट्रवैभवाची गुरुकिल्ली आहे.

राष्ट्राची सांपत्तिक स्थिती सुधारण्याला तीन गोष्टी आह्मी आपल्याशा केल्या पाहिजेत. कच्चा माल शेतींतून उत्पन्न करण्या पलिकडे आमच्या लोकांची गती नाहीं. तर आमच्या पैकीं मोठासा जनसमूह या कच्च्या मालाचे नानाविध पदार्थ तयार करण्याकडे लागला पाहिजे आणि कांहींशा लोकांनीं देशीच माल सर्वत्र पसरून त्याचाच खप केला पाहिजे. आणि राष्ट्र संपदेचे हे तिन्ही झरे आपल्या हातीं लागण्यासाठीं आपण हें ध्यानांत धरलें पाहिजे कीं हस्तकौशल्य कांहीं कामाचें नाहीं. यांत्रिक हत्ती आपल्या पाशीं आपण उभा केला पाहिजे ह्मणजे परराष्ट्रांच्या स्पर्धेला न जुमानतां गजान्त लक्ष्मी आपल्या राष्ट्रांत पुनः चिरकाल नांदू लागेल. असें जों पर्यंत होणार नाहीं तों पर्यंत आपलें राष्ट्रीय कलाकौशल्य, बुद्धिमत्ता व कार्यशक्ती यांचाही मक्ता आपण दुसऱ्यास देत चाललों आहे असें दिसून येईल. आपण प्रथम संघशक्ती उत्पन्न केली पाहिजे. भांडवलाची उभारणी होऊनही उपयोग नाहीं. आपलें राष्ट्र यांत्रिक ज्ञान व कौशल्य हीं संपादन करीपर्यंत आपण इंग्रजी राष्ट्राला गुरु करून निर्भिडपणानें शिष्यत्व पतकरलें पाहिजे.

## रे० क्लेअर यांचें व्याख्यान

शनिवारीं सायंकाळीं मि. कँडी डायरेक्टर आफ पब्लीक इनस्ट्रक्शन यांचें अध्यक्षते खालीं रे. क्लेअर यांचें "ज्यू लोकांचा इतिहास" या विषयावर भाषण झालें. विषयाचें प्रतिपादन इंग्लंडच्या इतिहासा बाहेरील फारसें नव्हतें असें तरी चालेल. ज्यू लोकांची पूर्वीची स्थिती, त्यांच्या बद्दल कांहीं दिवस झालेले युरोपांतील लोकमत, इत्यादि विषयाची ओळख श्रोत्यांस करून दिल्यावर इंग्लंडच्या वैभवाकडे व्याख्यात वळले. जगांतील अत्युच्च ख्रिस्ती धर्माची महती गातांना मिशनरी लोक कित्येक वेळां इतर धर्माची निंदा करण्याचा प्रसंग आणीत असतात तशा पैकीं कांहीं प्रकार रे. क्लेअर यांच्या भाषणांत आला नाहीं हें हिंदु धर्माचें सद्भाग्य होय. इंग्लंडला आज जें एवढें वैभव प्राप्त झालें आहे व त्याच्या पूर्वी ज्या ज्या राष्ट्रांनीं आपली सुधारणा शिखरा पोंहोंचविली त्या सर्व राष्ट्रांच्या भाग्योदयाचा पाया बायबल आहे व त्यांतील आज्ञा शिरसावंद्य केल्याशिवाय कोणत्याही राष्ट्रास उत्कर्ष प्राप्त झाला नाहीं. हिंदु लोकांस आज जी ही स्थिती अनुभवण्याचा प्रसंग आला ती केवळ ते येशू ख्रिस्ताच्या आज्ञा पाळीत नाहींत ह्मणून आला आहे. इत्यादि प्रतिपादन झाल्या नंतर अध्यक्ष साहेबांच्या परवानगीनें राजश्री आण्णा साहेब महाजनी यांनीं दोन शब्द—ते शब्द ह्मणजे बिनमोल उपदेशामृतच—श्रोत्यांस सांगितले. ख्रिस्तीधर्माच्या अगोदर कित्येक शतकें बुद्धाचा जन्म झाला आहे हिंदुधर्माचा उगम तर त्याच्याही पूर्वीपासूनचा आहे ह्मटला तरी चालेल मग त्यांतील अत्युत्तम उपदेशरत्नापुढें "दहा आज्ञांची" विशेष ती काय प्रौढी आहे ? इंग्लंडासारखीं राष्ट्रें ख्रिस्ताच्या पवित्र दहा आज्ञा शिरसावंद्य खरोखर मानतील तर जगावर त्यांचे मोठे उपकार होतील. हिंदुधर्माचा थांग अजून कोणास लागलेला नाहीं व इतर सर्व धर्मांचा पत्ता लागलेला आहे. तेव्हां हिंदुधर्मांपेक्षां इतर धर्मांत विशेषों काय असणार ? इत्यादि बोलून वक्त्याचे आभार मानतांना रे. क्लेअर यांनीं बायबलच्या दहा आज्ञा पाळण्या विषयीं अगोदर सुधारलेल्या राष्ट्रांतील सुधारलेल्या लोकांस उपदेश करावा अशी इच्छा प्रगट केली.

पुण्यांतील डा० पेंटिकास्ट व कै० न्या० रानडे यांची यावेळीं आठवण निदान मला तरी झाली असें मी ह्मणतों. राजश्री आण्णासाहेब हे वऱ्हाडांतील "रानडेच" आहेत. सत्यपक्षाचे समर्थन करण्यासाठीं लोकांच्या इतराजींची पर्वा न करणें हा काय लहान सद्गुण आहे?

"श्रोता"

## The Berar Samachar

MONDAY JULY 20 1903

We are extremely sorry that we are again obliged to return to the question of huts on the Shivni Road. We had hoped that matters would not be carried very far; but the stage which the question has recently attained, compels us though reluctantly to refer to the question again. Since we wrote last on this subject, we learnt that the authorities have submitted a proposal to the Government for taking the site occupied by the huts on the Sioni Road under the Land Acquisition Act, for the the improvement of the Civil Station. We learn that an attempt was also made simultaneously with this, to induce the owners of those huts to remove them; but it appears that the attempt has failed because the above proposal has been submitted. It is no doubt not incumbent on the Government to make the owners aware of the object which moves the former to take up the land under the Land Acquisition Act; but we humbly submit that the public purpose contemplated by the Act, should not be the flimsy one suggested above, but ought to be of a paramount importance such as the opening of a Railway Line &c. the utility of which is acknowledged on all hands. But if the public purpose be held to include the one suggested above the Land Acquisition Act would be a dangerous weapon in the hands of a Government as it would enable it to defend the undoing of any previous conduct on the plausible ground of a public purpose. If the Land Acquisition Act be allowed to work in this narrow spirit, the confidence felt by the people at present as regards the security of their property under the *pax Britanica* is likely to be shaken for they may then apprehend that the property which a person has been enjoying for generations together, may on any day be compulsorily taken away from him, for a public purpose to be determined at the sweet will of a Government officer. We are therefore constrained to say that this must not be the meaning of the expression 'public purpose' which occurs in the Act. Being desirous therefore of seeing the fair name of the British Government for justice and fair play unsullied as usual, we humbly hope and pray that the above expression will be interpreted liberally so that the feeling of confidence in the public mind about the security of one's property would be placed on a surer basis than before.

—:0:—

But even taking for argument's sake that the public purpose can be held to include the purpose suggested above viz—the improvement of the Civil Station, we are at a loss to guess the meaning of this latter expression. The expression is very vague in itself. If the Civil Station forms a part of the Akola Municipality, the improvement of the Civil Station means practically the improvement of the Akola Municipality. But was the atter body ever consulted on the point, before the proposal was submitted? We also fail to see in what way the Civil Station is going to be improved, by undertaking the contemptlated step. Do the Government intend to utilize thesite for Bunglows to be built for their Europeam servants? Or do they intend to have no sites occupied by the the Natives within the vicinity of the Civil Station? It the Government intend to do the former we shall have hardly any reason to find fault with the present measure, as it would once for all put a stop to the ill feeling recently caused in both the communities. The Native owners whose Banglows are occupied at present by the Europeans, will have them to themselves. But if the Government have the second object in view we dare say that the Government will first have to take recourse to the above Act, for evicting the Native officers, factory owners, Parsi gentlemen and the Native Christians, from the Bunglows already occupied by them. We fail to guess the object which moved the authorities to make the above proposal, especially

when we see that this object, whatever it be, was not foreseen only a few months ago when the permission to build on those sites was given to the present occupants. This fact coupled with the sensation caused afterwards by the order to remove the huts, which was afterwards withdrawn soon after the owners had served the Government with a notice to file suits against the latter for damages, naturally leads one to suspect the present proposal as a fresh attempt to defeat the owners concerned. The step proposed at present, has followed so closely upon the events which preceeded it, that one cannot but see some connection between the two. It is therefore natural that both the Native and the European communities should have become touchy over this question. We therefore humbly suggest that the Hon. the Resident will at least rise equal to the present occasion and look at the past history of this question, not in the one—sided way which the local authorities are likely to do but in a dispassionate mood before he decides the question. Or if he thinks the matter too local to be decided from Hyderabad, he will at least favour both the communities by entrusting the decision of this question to an independant arbitrator who may decide the question after hearing both the sides, on the spot. We have not made this prayer on behalf of one or two individuals who are interested in the land but we have made it with a hope that the granting of it would tend to shorten the gulf between the two communities, which has unfor—tunately widened of late owing to the circumstances already mentioned.

---

On Saturday last Reverend Blair Bishop of Nagpur delivered an interesting and eloquent address on the history of the Jews in view of the present political devolopment. He began with a history of the people from the time of Moses and traced it through the period of the Roman empire down to the present times. He argued that the old prophecies about these people are being verified in the modern times and that it is an interesting reading to have the old bible side by side with the daily newspapers. In his missionary action he traced all present laws to the laws of Moses, and remarked that there would have been no civilization but for the mosaic laws. The lecturer spoke of the Jews as the back—bone of the empire in so far as they have been financing all schemes of national importance. Mr. Vishnu Moreshwar Mahajani in thanking the lecturer remarked that our civilization was older than that of the Jews and our law—codes were enacted 500 years before Moses was born. He was thankful to the lecturer for asking the audience to take kindly to the study of history connecting the political situation of the Jews with the prophecies in the Bible but regretted that the Christian nations honor the ten commandments more in the breach than in their observance. He expressed a hope that the western nations will be more Christian in the true spirit of Christ and will thus be the real object of con-gratulations from the followers of other religions in the world.

---

Malkapur 13/7/03

On 11th current there was a grand prize distribution ceremony under the presidentship of our popular Deputy Commissioner Kumar Shri Harbhamji Ravaji. From the report of the Head Master it seemed that the school is steadily progressing and shows a fair record of results in the several examinations. Plague had come in the way of progress but it is remarkable that the school maintained its efficiency. The prize—books do not show an æsthetic and moral taste in their selection and the funds at disposal are not enough for the work. Then followed an excellent programme in which two students recited a dialogue about the चतुःशृंगीची यात्रा', another student re—peated the stirring soliloquy of राणा भीमदेव in his despoundency, a third student gave out an English Song and some followed with new songs sung to the music of the harmonium. After the distribution of the prizes, Kumar Sahib advised the students to take encouragement from such occasions and to build hopes of a great future that lies before them. He urged them in an impressive manner to stick to their national dress with a proper sense of pride therein. The first lessons of patriotism begin in these little things and cultivate a real taste for it. He wished very much that along with the physical and intellectual education religious and moral training will be imparted on a larger and a more liberal scale; and hoped that the teachers will be alive to their new responsibilities of deciding what the future generations will be.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान– पुनर्वसु नक्षत्रानें बहार करून दिली. गेल्या तीन चार दिवस पाऊस फार नामी झाला व तो सार्वत्रिक झाला. पेरण्या चांगल्या साधल्या रोगराई कांहीं नाहीं.

मे. क्राफर्ड साहेब सप्टेंबर महिन्यांत परत येऊन पुनः कमिशनरी तर रुजू होणार आहेत असें ह्मणतात.

मेहेकर

पाऊस अद्याप पावेतों ठीक पडला. असाच वेळेवर पडल्यास दिवस आनंदाचे जातील.

येथील श्री बालाजीच्या देवळाचा कळस तयार करण्यासाठीं लोक चिंतेत होते. परंतु त्यांच्याच कृपाप्रसादानें नजिकच उत्तम विटांची खाण सांपडली आहे. देवळा-स ज्या ज्या गोष्टींची जरूर होती त्या सर्व गोष्टींची अशी श्री बालाजीनींच तयार केल्यावर लोकांना खटपटी शिवाय जास्त काय करण्याचें उरलें? येथील आफिसर लोक चांगले असल्यामुळें त्यांस आणखी विशेष मदतच होत आहे.

येथें पाण्याचें पूर्वीपासूनच हाल आहेत. सरकार कांहीं योग्य उपाय योजीत नाहींत. मेहेकरवाल्यांचे हाल कधीं दूर होतील ते होवोत.

मलकापूर–– पाऊस साधारण आहे. पंढरपुराला जाण्याला यात्रेकऱ्यापासून रेल्वे कंपनीस भरपूर उत्पन्न असतांनाही त्यांना मालाच्या डब्यांतून मेंढरा प्रमाणें जावें लागतें हें त्या भाविकांचें दुर्दैव होय. देवदर्शन पुढें कंपनीनें केलेले हाल कमी वाटूं देणे हें एक त्यांचे सोशिक पणाचें उदाहरणच आहे. रेल्वे कंपनी त्यांना त्रास झाला नसावा असें ह्मणेल तर तो त्रास यात्रे करूं लोकाशिवाय कंपनीस कळणार कसा?

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००।-। |
| सोनें २४॥ | चांदी ६७'। |
| जवारी ४०।४९ | जवस ९२॥ |
| गहू ४। ४॥ | ८९ ते ९९ |
| बाजरी | ९७ |
| मीठ | ३॥।= रु. मण |
| चणे | ३ रु. मण |
| तूप | ८॥ रु. मण |
| तेल | ४॥। रु. मण |
| रुई | ९० |

---

नोटीस

चंद्रभागा मर्द विठू नाईकवाडी राहणार मूर्तिजापूर यांसः—

या जाहीर लेखानें कळविण्यांत येतें कीं वऱ्हाडसमाचार पत्रांतून तारीख ९।७।०३ रोजीं नोटीस दिलीस ती वाचली. तुझी नोटीस अगदीं खोटी आहे. कोणा तरी लुच्चा मनुष्यानें तुला तशी नोटीस देण्यास लाविलें आहे असें दिसतें. माझ्या हुकूमा बाहेर तूं इतकीं वर्षे माहेरी आहेस. माझ्या कडून तुला आणण्यासाठीं मुद्दाम कांहीं संभावित गृहस्थ दोन चार वेळां पाठविले होते. परंतु तूं जनरितीप्रमाणें आली नाहीं-स. ही नोटीस पोंचल्या पासून आठ दिव-सांच्या आंत घरी येऊन आपला संसार करूं लागावें. असें करण्यास चुकलीस तर कोर्ट मार्फत तुझा ताबा घेतला जाईल; आणि तुला माझ्या घरी न येऊं देण्यासाठीं जे लोक साथीदार आहेत त्यांच्यावर फौज-दारींत मी फिर्याद करणार आहे. सावका-राचें कर्ज मी देणार नाहीं. व सावकाराचें कर्ज काढण्याचें कारणही नव्हतें. फारकती मिळविण्यासाठीं ही लबाडी मांडलीस आहे-स पण तुझा व तुझ्या साथीदारांचा हा बेत सिद्धीस जाणार नाहीं. ही नोटीस पोंचतांच ताबडतोब घरीं निघून यावें. कळावें. तारीख १८।७।०३ इ०

सही

विठू वल्लद धनसींग नायकवाडी

राहणार कुंटासे

निशाणी खुद्द

---

## नोटीस

एडीबाई कसबन जात मुसलमान वस्ती जलालपुरा खामगांव . इसः–

खाली सही करणार शिवरतनदास शिव-बकस साहु दुकान खामगांव यांजकडून.

नोटीस देण्यांत येते कीं, तु माझें खाम-गांव येथील जलालपुऱ्यांतील मच्योरवाले घरापैकीं एका खोलींत दरमहा रुपया १ प्रमाणें भाडे देण्याचें कबूल करून भाड्यानें राहण्यास घेतलें आहे. त्यास आज चार वर्षे झाले आहेत, हल्लीं सदहू घराची आह्मास गरज असल्यामुळें आह्मी तुजला सदहू घर खाली करण्यास सांगितलें असतां तूं खाली करून दिलें नाहीं करितां तुजला या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं, ही नोटीस पावले तारखे पासून एक महिन्याचे आंत आमचें घर खालीं करून द्यावें न दिल्यास आह्मी तुझेवर कोर्ट मार्फत फिर्याद करून घर खालीं करून घेऊं. या नोटिशीचा खर्च व फिर्यादीस लागणारा खर्च तुजला द्यावा लागेल. कळावें, तारीख १८।७।०३ इसवी.

सही.

शिवरतनदास सिवबकस तर्फे

कूलमुखत्यार हरी माधव

देशपांडे दस्तुर खुद्द.

---

NOTICE

The following rules (R. O. No. 21 Dated 17th April 1903) are published for general information and guidance.

I No leper shall on or after the 1st, May 1903, within the areas specified in R. O. Notification No. 19 dated 17th April 1903.

(a) Personally prepare for sale or sell any article of food or drink or any drugs or clothing intended for human use, or

(b) bathe, wash clothes, or take water from any public well or tank debarred by Municipal or local by—law from use by lepers; or

(c) drive conduct, or ride in any public carriage playing for hire other than a railway carriage.

II. Disobedience of these orders is punishable under the Lepers Act 1898.

III. A person employing a leper in any trade prohibited by the order contained in the above notification is liable to punishment under the Lepers Act.

Dated Akola 17—7—03 } *V. M. Mahajani*
Vice—Chairman
Municipal Committee
*Akola.*

---

## जाहिरात

खालील नियम सर्वांचे माहिती करितां व वहिवाटी करितां प्रसिद्ध केले आहेत.

तारीख १ मे १९०३ रोजीं अगर त्या-पुढें कोणाही महारोग्यानें रेसिडेन्सी आर्डर नोटीफिकेशन नोटीस नंबर १९ (एप्रील १७ सन १९०३ ची) हींत नमूद केलेल्या आकोला म्यु० क० च्या हद्दींत

(अ) मनुष्याचे उपयोगासाठीं कोण-ताही खाण्याचा अथवा पिण्याचा पदार्थ, औषध, अथवा कोणताही पदार्थ अगर कपडा, स्वतः विक्रीसाठीं तयार करूं नये अगर विकूं नये.

(ब) कोणत्याही सार्वजनिक तळ्यांत अगर विहीरींत जेथें म्युनिसीपल अगर लोकल कानू अन्वयें महारोग्यास वापरण्याचा प्रति-बंध आहे अशा ठिकाणीं स्नान करूं नये, कपडे धुऊं नये अगर पाणी काढूं नये.

(क) आगगाडी खेरीज दुसरे कोणत्या-ही भाड्याच्या सार्वजनिक वाहनांत बसून जाऊं नये, अगर असें वाहन हांकूं नये अगर चालवूं नये.

जो कोणी हा हुकूम मोडील अगर वरील नोटिसांमध्यें मना केलेल्या व्यापारांत महा-रोग्यास नौकर ठेवील तो १८९८ चे लेपर आक्टान्वयें शिक्षेस पात्र होईल.

*Akola* 17/7/03 } V. M. Mahajani
Vice—Chairman
*Akola.*

## नोटीस

बेशमी— पुतळी मर्द गंगाराम लोहार राहणार टाकरखेड ता० मलकापूर ईस:—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तूं मला वऱ्हाडसमाचार पत्रांतून ता० ६।७।०३ च्या अंकांत नोटीस दिली ती पावली. मी सध्या बरा असून पर्वीपेक्षां माझा रोग कमी आहे. तूं माझे घरीं नांदण्यास येव, हरकत करूं नये. मी तुला वागविण्यास तयार आहे. तूं नोटिशींत लिहिलें कीं खावटी बद्दल आज पर्यंत झालेले २०० रुपये द्यांव, ते मी देण्यास तयार आहे परंतु माझ्या संसाराची आतांपर्यंत नासाडी झाली त्याबद्दल नुकसानी तुला भरून द्यावी लागेल ती तूं कबूल असल्यास रुदई रुपये मी देण्यास तयार आहे. मी वागविण्यास तयार असतां तुला दुसरा घरटाव करणें योग्य नाहीं. तूं माझे घरीं येऊन सुखानें नांदावें याउपर तूं दुसरा घरठाव केल्यास तूं व जो गंधर्व लावील तो असे दोघेही जबाबदार धरले जाऊन फौजदारींत फिर्याद करीन. मी न ठेविता तूं आपले आईबापाचे घरीं राहिलीस सबब खावटी बद्दल पैसा मजकडून मिळणार नाहीं ही नोटीस पावल्याबरोबर आठ दिवसांत तू माझे घरीं न आल्यास कोर्ट मार्फत तुला कबजांत घेईन. कळावें. ता० १६।७।०३ इ०

सही
गंगाराम मारोती लोहार राहणार
चिखलगांव निशाणी
खूद हातची.

---

## वर्तमानसार

### पुण्याचे ग्रामण्य.

रा० ब० कोल्हटकरांनीं ग्रामण्याच्या बगुल बोवास न भितां आपल्या पोनमैत्र मुलीचा विवाह उरकून टाकला, आणि आतां पुण्याची मंडळी शिव्या वडीस ऊत आणून एकमेकांत वैमनस्य वाढवीत आहेत. सुधारका पेक्षां पुराणप्रियांच्या आंगीं स्वाभिमान आहे हें खरें परंतु त्याबद्दल वेळच्या वेळींच सावध न होतां मागून उगीच पत्रांचें कालमचें कालम अडविण्यांत काय अर्थ आहे! कित्येक पुनर्विवाहा पेक्षां हें कार्य विशेष चांगलें झालें असें सुधारका प्रमाणें कित्येक पुराणप्रियास वाटत आहे. मग उगीच त्यांत कंठशोष करण्यांत अर्थ तो कोणता? अक्षतीस, भोजनास, जाणाऱ्या लोकांची याद जरी प्रसिद्ध झाली आणि पुराणप्रियांना जरी त्यांनीं बहिष्काराचा बाऊ घातला, तरी रुष्याचा मनु अशा भेडावण्यास भिणारा नाहीं असें आह्मांस वाटतें पुण्यांतील, लोकांस काय वाटत असेल तें वाटो. मागून उगीच कंठशोष करण्यात अर्थ तो कोणता?

### स्वधर्मज्ञानप्रसार.

इंग्रज सरकारचें राज्य या देशांत झाल्यापासून ख्रिस्ती धर्माचा शिरकाव हळूं हळूं होऊं लागला ह्मणण्यास हरकत नाहीं. हिंदुधर्माचा ऱ्हास जरी ख्रिस्ती धर्माच्या वाढत्या प्रमाणावरच होऊं लागला नाहीं; हिंदुधर्मास त्राता नाहींसा झाल्यामुळे त्याला हळूं हळूं ओहटी लागण्याची वेळ येऊन ठेपल्या सारखीच झाली आहे. ख्रिस्ती धर्मास राजाश्रय असल्यामुळें त्याला अधिक जोर असावा हें साहजीकच आहे. हिंदुधर्म वाईट हिंदुलोक दगडाची पूजा करितात इत्यादि कुतर्काच्या लाटांचा समुदाय अमेरिके सारख्या सुधारलेल्या देशातील लोकांच्या कानावर आदळल्यामुळें त्यांना हिंदुलोकांची कींव येऊन त्यांनीं इकडे अवाढव्य खर्च सोसून मिशनरीचे कंपू जागोजाग स्थापन केले आहेत व हे कंपू कोणास उपदेश करून कोणास दुष्काळांत अन्न दिल्यामुळें उपकाऱ्या तर्कीनें कबूल करून घेऊन आपल्या धर्मांत आणण्याची जारीनें खटपट करीत आहेत, व या कामीं त्यांचा अतोनात पैसा ही खर्च होत आहे. त्यांनीं सोपीं सोपीं व अगदीं स्वस्त अशी लहानसान पुस्तकें छापून काढून कित्येक वेळां तीं फुकट ही वाटण्याचा प्रयत्न केला आहे. अशा स्थितींत हिंदु धर्मांचें महत्व लोकांस समजावून देण्याची फार अवश्यकता होती व ती अवश्यकता रा. धनुर्धारी हे दूर करीत आहेत हें चांगलें आहे. बुकाची किंमतही पैसाच ठेविली आहे त्यामुळें त्याचा खप ही बराच होईल. दुसऱ्या धर्मीची नालस्ती करणें हें हिंदुधर्माचें ब्रीद नाहीं, परंतु हिंदुधर्माची महती गाणे यांस कोणाचीही आडकाठी नाहीं अशा बुकातून कल्पित गोष्टी देण्या ऐवजी भारत भागवतांतील देवादिकांच्या गोष्टी कथा वर्णन करणें विशेष मजेदार होईल. प्रयत्न स्तुत्य होय.

टाळ्या वाजविण्यास मनाई:— रशिया मधील नाटकगृहांत टाळ्या वाजविण्याची मनाई आहे.

पावसाबरोबर सर्प— डाका प्रांतांत विक्रमपूर येथें पाऊस पडूं लागतांच रस्तोरस्तीं सहस्त्रावधी सर्प दिसूं लागतात. तेथें प्रतिवर्षी शेंकडों माणसें सर्पदंशा पासून मृत्यु पावतात.

पासिफिक महासागरांतील पर्वत— या महासागरांत पंचवीस लक्ष चौरस मैलांचे एक खंड गडप झालें आहे. तो समुद्र नऊ हजार मैल लांब आणि दोन हजार सातशें मैल रुंद आहे. इतक्या सर्व भागांत गोठ आहे.

कोल्हापूरचे प्रिन्सिपाल मि. क्युनी साहेब शुद्धीवर आले व त्यांनीं विद्यार्थ्यांस जोडे घालण्याची परवानगी दिली, असें कोल्हापूरचें पत्र ह्मणतें ह्मणून आनंद वाटतो.

पशु वध—बंगलोरास रोज ४०० गुरें मांसाहारार्थ खपतात. हा भयंकर पशुवध हिंदुस्थानची शेतकी लयास नेईल.

लंडनमध्यें हिंदुस्थानचे लोक घरकामाकरितां ठेवावेत अशी खटपट सुरू झाली आहे! कां?

अमेरिकेंतील मेक्सिको येथील एका जंगलांत शेंकडों मनोरे व किल्ले असलेले एक शहर सांपडलें आहे असें कळतें.

जस्टिस तय्यबजी यांच्या चिरंजीवांनीं, कॅप्टन क्रोको यांच्याकडून ९०० रुपये जे घेतले ते त्यांनीं मुंबईतील 'अंजुमन इस्लाम' या संस्थेकडे दिले.

अमेरिकेंतल्या स्त्रियांना उन्हाळ्यांत डोक्यावरील केसांनें त्रास होतो सबब त्या ते पाठीवर मोकळे सोडणार आहेत, कांहीं जणींचे मत उन्हाळ्यांत केंस कमीच करावेत असा आहे. वा छान सुधारणा!

उत्तर हिंदुस्थानांतील इटावा येथें ब्राह्मण व सोनार या दोन जातींच्या लोकांत तंटा होऊन कांहीं ब्राह्मणांस ठार मारल्याबद्दल १४ सोनारास पकडून त्यांजवर आलाहाबाद कोर्टांत खटला चालू आहे.

गेल्या आषाढीच्या यात्रेस पंढरपूर येथें दोन लाखांपर्यंत यात्रा जमली होती ती नेहमीपेक्षां अधिक होती. मधील दोन यात्रा प्लेगामुळें बंद होत्या, ह्मणून या खेपेस ही एवढी यात्रा भरली असावी असें अनुमान आहे.

जेजुरीच्या खंडोबाची मूर्ति एक वेषधारी बैरागी छिन्न करीत असतांना पकडला व त्याला ६।७ महिन्यांची शिक्षा झाली हा बैरागी ख्रिश्चन होता असें ह्मणतात. मूर्तीची नासिका छिन्न झाली होती, ती नीट करून पुन: तिची यथाविधी अर्चा करण्यांत आली.

अबिसिनिया प्रांतांत एक प्रकारचें स्त्रीराज्यच आहे ह्मणावयास हरकत नाहीं. तेथील स्त्रियांची सर्व घरावर सत्ता ; नवऱ्याला त्यांच्या मर्जीप्रमाणें वागावें लागते तो जर तसा वागला नाहीं तर ती त्याला घराबाहेर हाकलून देते! बायकोला वाटेल तेव्हां ती नवऱ्याला सोडूं शकते, पण त्याला मात्र तसें करितां येत नाहीं. आमचे सुधारक याचा विचार करतील काय?

भयंकर भविष्य!— विलायतेतील एका ज्योतिषानें असें भविष्य केलें आहे कीं मागील अनुभवावरून पाहतां, चालूं सालापासून ४ वर्षे पर्यंत हिंदुस्थानांत दुष्काळ पडणार ईश्वर करो आणि असलें भविष्य खरें न होवो! खरें झाल्यास हिंदुस्थानच्या लोकांची पुरीं वर्षे भरलीं असें ह्मणावें लागेल!

दुष्काळानें ३० हजार गुलाम— चीन देशांत हल्लीं भयंकर दुष्काळ पडला आहे. त्यांत पोटाची आग विझविण्या करितां ३० हजार चिनी लोकांनीं आपणास बाजारांत गुलाम ह्मणून विकून घेतलें! काय शोचनीय स्थिति ही!

हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर पाऊस वाढत्या प्रमाणावर आहे व उत्तर हिंदुस्थानांत नैऋत्येकडून फार जोराचा वारा वहात आहे.

स्वामी उपाध्याय नांवाचे एक स्वामी विलायतेंत आहेत. केंब्रिज युनिव्हर्सिटीमध्यें हिंदु तत्वज्ञानावर तीन वर्षे व्याख्यानें देण्याकरितां एक व्यवस्था ते पाहाण्याकरितां ते इकडे येत आहेत. जे हिंदु नाहींत ते हिंदु तत्वज्ञान शिकण्याची इच्छा करीत आहेत आणि हिंदु आहेत ते तें विसरण्याचा प्रयत्न करीत आहेत.

कोलारच्या खाणींतील चोरीस गेलेलें सोनें वितळवीत असतां बंगलोराकडे दोघां सोनारास पोलिसानें एकाएकीं पकडलें. त्यांच्यावर खटला होऊन त्यांस २ वर्षे सक्तमजुरी व १,००० रुपये दंड किंवा आणखी ६ महिने कैद अशी शिक्षा झाली!

सातारा जिल्ह्यांतील मच्छिंद्रगड येथील कुळकर्ण्यानें सरकारी पैशांची अफरातफर केल्याचें शाबीत झाल्यावरून त्यास डि० हे० कलेक्टर यांनीं ३ महिन्यांची शिक्षा दिली.

कलकत्यास मोठ्या आकाराची, स्वस्त किमतीची व जंगी वर्गणीदारांची ९ वर्तमानपत्रें आहेत. यापैकीं 'वसुमती' नावाचें एक वर्तमानपत्र आहे त्याच्या दर आठवड्यास ४०००० वर प्रती खपतात. दुसरे पत्र 'हितवादी' याचाही प्रसार वरील इतकाच आहे. तिसरा नंबर 'बंगवासी' पत्राचा आहे याच्या प्रती ३०००० वर खपतात.

मध्यप्रांतांत कळमेश्वर येथें नुकतीच एक वेदशाळा स्थापन करण्यांत आली आहे. येथें ब्राह्मणाची वस्ती फारशी मोठी नाहीं तरी वे० शा० सं० दाजी नारायण पाठक व कृष्णराव पाठक या दोन गृहस्थांनीं फुकट शिकविण्याचे कबूल केल्यामुळें तेथील विठ्ठल रुक्माईचे देवळांत ही वेदशाळा निघाली आहे.

पुरलेली ठेव—कळमेश्वर येथील एक ह्मातारी तेलीण कांहीं दिवसापूर्वीं निवर्तली तिच्या एका नातलगाला तिच्या जवळ कांहीं नगदी रुपये पुरलेले आहेत हें माहीत होतें परंतु ही गोष्ट जेव्हां तिच्या वारसाला समजली तेव्हां त्यांनीं सरकाराकडे रिपोर्ट केला. खानेतलासी केली असतां २३३० रुपये निघाले, ही रक्कम सध्यां सरकारात जप्त आहे.

नागपूर—गेल्या बुधवारीं आदितवारींत सेन्याचादीच्या ओळींत रस्त्यावरील नालींत एक मोठा सर्प निघाला होता. पुष्कळ लोकांनीं तो पाहिला आणि कित्येक मारा मारण्याला तयार झाले होते परंतु जैन मारवाड्यांनीं मारण्याची मनाई केल्यामुळें तो मारला गेला नाहीं.

मिरत येथील सार्जंट स्टोन नांवाच्या तोफखान्यांतील गोऱ्या अधिकाऱ्याच्या लाथेनें एक नेटिव्ह गाडीवाला मरण पावला; त्याची मॅजि. पुढें चौकशी होऊन त्यास से. कमिट केलें आहे.

येत्या कांग्रेसचे अध्यक्षस्थान स्वीकारण्या करितां आसामचे माजी चीफ कमिशनर सर हेनरी कॉटन यांस बोलावण्यांत आले होते, पण त्यांनीं हें आमंत्रण नाकारिलें आहे. ह्मणून लंडन येथील प्रसिद्ध डेलीन्यूज पत्राचे संपादक मि० हरबर्ट पोल यांस अध्यक्षस्थानीं विराजमान होण्याविषयीं मद्रासच्या मंडळींनीं विनंति केली आहे.

खोट्या नोटा— तीन लक्ष रुपयांच्या नोटा केल्याबद्दल भगतसिंह वगैरे मंडळीवर लाहोरास खटला चालू आहे असें समजतें.

अंड्रयू कार्नेगी ह्याचें सध्यां दरसालचें उत्पन्न अडीच कोटी रुपयांचें आहे.

पाळणा हालवण्याचें यंत्र निराळें आहे. त्यास किल्ली दिली ह्मणजे पाळणा हालून सुस्वर वादनही होतें.

एका प्रकारच्या घंटेच्या नादास सिंह वाघ भीत असतात. त्या घंट्या हिमालयावरच्या गाईच्या गळयांत बांधू लागले आहेत.

स्वीडनात आगगाड्यांतल्या तिसऱ्या वर्गाच्या उपयोगा करितां यथार्थ पुस्तकालयें स्थापिलीं आहेत, तशींच दवाखानेही होत आहेत. हिंदुस्थानांत तशीं व्हावीं.

व्हेट्री स्ट्रेचा ह्या ग्रंथकारानीं आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत ह्मटलें आहे कीं, हिंदुतर्फे मुत्तुस्वामी आणि मुसलमानांतर्फे सय्यद महमूद ह्या न्यायमूर्तींनीं दिलेले फैसल अत्यंत मुद्देसूद असून त्यांवरून यांची अगाध विद्वता चांगली स्पष्ट होत आहे.

महाराज सातवे एडवर्ड ह्यांचे नांवें एक मोठें लढाऊ जाहाज बांधीत आहेत, तेवढें जहाज सगळ्या पृथ्वींत दुसरें कोठें नाहीं. त्यास खर्च कमींत कमी २,१०,००,००० रुपये लागेल म्हणतात.

सगळयांत मोठा मळा मिसोरी प्रांतात लेबानन येथें आहे तो २३०० एकर आहे. ह्यांत झाडें १३८००० आहेत. ह्यांतलीं फळें बाजारास नेण्यास आगगाडीच्या वाघणीच्या वाघणी लागतात.

लंडन शहर आणि त्यास लागून असलेलीं उपनगरें ह्यांची एकंदर लोक संख्या ६५,८१,३७२ आहे. कांहीं कांहीं भागात स्त्रियांची संख्या पुरुषांच्या द्विगुणें आहे. घरगुती काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या २,३४,३९८ असून गडी मात्र १६,४२५ आहेत.

जर्मनींत एका तीस वर्षाच्या जन्मांधास डाक्तर लोकांच्या शस्त्र क्रियेनें दृष्टि प्राप्त झाली आहे. हे ज्ञान वृद्धीचें फळ होय.

सहा वर्षांचा एक मुलगा माद्रिडाहून बर्लिनास आला आहे. तो पेटी वगैरे वाद्यें वाजविण्यांत जन्मतःच निपुण आहे. त्यावर जर्मन बादशाहांची मर्जी आहे.

विशेष अर्थाचा शब्द किंवा विशेष अर्थाचें वाक्य लिहिण्यास इंग्रजीमध्यें इटालिक्सचा उपयोग करितात, तसें कांहीं मराठींत असावें ह्मणून निर्णयसागर छापखान्याचे मालक रा० रा० जावजी दादाजी यांनीं " मराठी इटालिक्स टैप " तयार करविले आहेत

इंग्लंडांत हामटन कोर्ट ह्या राजवाड्याच्या भोंवतालच्या बागांत एक द्राक्षवेल १३४ वर्षांचा जुना आहे. त्याचा घेर चार इंच आहे. एका एका वर्षास सातसातशें द्राक्षें येतात. गतवर्षीं त्याला असे १२०० घड आले होते.

मुंबई शहरास पाण्याचा पुरवठा विहार तुळशी आणि तान्सा या तलावांतून होतो या तलावांतून रोजच्या रोज सुमारें ३५०००००० ग्यालन पाणी शहरांत येतें.

जपानांत ठैवान नांवाच्या प्रदेशांत कापुराच्या झाडाचें मोठें अरण्य सांपडलें आहे, त्यांत दर वर्षास ६ हजार टन कापूर निघेल असें एका जपानी पत्रानें प्रसिद्ध केलें आहे.

---

NOTICE

Under rule 12 of the Municipal Election rules, it is hereby published for general information that the election to fill up the vacancies caused by the death of Mr. V. A. Kane and the resignation of Mr. Ganoba Raghoba elected Members for ward No. 1 will take place from 7 A. M. to 5 P. M. on the 6th August 1903 at the Patel's Chowri.

Nomination papers will be received by the Polling Officer Mr. C. H. Price Extra Assistant Commissioner before the 30th. of July 1903.

Dated Akola 10th July 1903

V. M. Mahajani
Vice-Chairman
M. Committee
Akola.

---

## जाहिरात

म्युनिसिपाल निवडणुकीचें नियमांतील नियम १२ अन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं अकोले म्युनिसिपाल कमेटीतील भाग १ तर्फे निवडलेल्या मेंबर पैकीं मि. विनायक अपाजी काणे मयत झाल्यामुळें आणि मि. गणोबा राघोबा यांनीं जागेचा राजिनामा दिल्या मुळें खालीं झालेल्या जागा भरण्याकरितां ता. ६ माहे आगष्ट सन १९०३ इ० रोजी सकाळचे ७ वाजे पासून ते सायंकाळचे ५ वाजे पर्यंत पाटील चावडींत निवडणूक होणार आहे. मे. सी. एच. प्राईस साहेब एक्ट्रा असि० कमिशनर हे पोलिंग आफिसर आहेत व ते तारीख ३०।७।०३ इ० चे आंत उमेदवाराचे नांवचे अर्ज घेतील ता. १०।७।०३ इ०

V. M. Mahajani
Vice—Chairman
Municipal Comittee Akola..

---

## नोटीस

बेशमी रामसखी मर्द मिचराज तर्फे मुखत्यार पुत्र जगन्नाथ मिचराज राहणार ताजनापेठ आकोला. यांस.

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं तुमची वऱ्हाडसमाचार पत्रांत प्रसिध्द झालेली जाहिर नोटीस पोचली. तुह्मी लिहिलेला सर्व मजकूर खोटा आहे रामसखीबाई कडुन मला रुपये घेण्याचें कांहींच कारण पडलें नाहीं अर्थात तुह्माला १८५ रुपये परत दिले असें लिहितां तेंही अगदीं खोटें आहे. तुह्मी अशाही धाकदपटशा घातला आहे कीं, मजवर दिवाणीत व फौजदारींत फिर्याद करण्यांत येईल. सरकारी कोर्टे खुली आहेत आणि तुह्मी वाटेल तेव्हां दिवाणी फौजदारी अवश्य चालवावी. तुह्मास तसें करूं नये ह्मणून कोणी म्हटलें नव्हतें, तुम्ही अशी जाहिरसमज देऊन चार लोकांमध्यें माझी बेअब्रू मात्र विनाकारण केली आहे. फक्त तुम्ही जाहिर रितीची नोटिस केली म्हणून तुम्हावर बेअब्रूबद्दल दिवाणी व फौजदारी मला करावी लागणार आहे. या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख १३ जुलै १९०३ इसवी.

सही ( मारवाडींत )
शंकरलाल वा. पन्नालाल खत्री
राहणार ताजनापेठ आकोला
दस्तुर खुद्द.

---


## नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्री करितां नाग, नरसे, जिवत्या आणि पिठोरी किंवा पाटोडा व त्यांत बुध बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्यापेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापिलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदर्हू चित्रांचें कागद पाठवून देऊं. चित्राचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल. व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनोबा दलाल
कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला

---

## खरेदी करा !

### रास्कोपची थेट व खरी


### पेटेंट वॉचेस

### नकली मालास भुलून

### पैसे खर्चू नका.

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वाचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून अंगरखांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोयतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला अचूक वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्रॅक्टर, ओव्हरसियर, फॉरेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वाच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची स्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं याहून ज्यास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तीच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व त्या बद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९लाईन ओपनफेस ....................४०
१९ ,, हंटिंग....................५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

### मेटलचें तीन वर्ष ग्यारंटींचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह............१०
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलें ................१२
१९ ,, हाफ हंटिंगचें..............२०
१९ ,, हंटिंगचें ....................२०
१४ ,, रिस्ट वॉच ..................२

### इनामलमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपनफेस............२०
१९ ,, हंटिंग........................२०
१४ ,, रिस्टवॉच.....................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ ,, हंटिंग........................३५
१८ व १९ ,, ओपनफेस ...........३०
१९ ,, सेकंद कांट्यासह............३२
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग ...................... ४५

लेडिज वॉचीस १४, १८, क्यारेटगोल्ड रुपये ६५–१०० पर्यंत.

**सी. हिनीगर आणि कंपनी.**
ओरिजनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

---

ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपर्युक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधी मुरलेले विकार, मूत्रपं, कोष, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खरनर्णिज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी. वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळालेल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रियां, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दर:—

| | | | |
|---|---|---|---|
| ३९ गों० | १ रु० | ७९ गो० | २ रु० |
| ११५ गो० | ३ रु० | १६९ गो० | ४ रु० |
| २७१ गो० | ६ रु० | ९५० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंतस्थ रसायनें धातूचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाच मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—अलिकडे २।३। वर्षें आंजरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्त्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

---

## ORIENTAL GOVERNMENT SECURITY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED

Established 1874.

Head Office,—BOMBAY.

*Chief Agency for C.P. Berar & Khandesh*

Head—quarters—Nagpur, C. P.

—:0:—

FUNDS EXCEED TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security.*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh*

---

*K. N. ESMAYAL & Co.*

शक्तीवर्धक कामोत्तेजक गोळ्या ४२ ची सीसी कीं. रु.१॥.

तापावर एग्युनीक्षर कीं. ॥=

वातावर नारायण तेल कीं रु. १

गजकर्णाचे अप्रतिम सोनेरी मलम किं. ४ आणे.

पानथरीवर अमोलीकगोळ्या ६० किंमत रु० १

पत्ता--खोजानुरा इस्मायल आणि कंपनी.
वर्धा. सी. पी.

## जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार, मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यांसह. पाडव्यापर्यंतच किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्यांचें शारीरभाष्य मराठी भाषांतर व विवेचन यांसह. मार्चपासून मासिक पु. द्वारें निघेल. गीताभाष्यापेक्षा तिप्पट. ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व ५८६ पहिल्या २०० ग्राहकांस बालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे ३ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ सं. भा. सह बक्षिस.

का० वा० लेले वाई

## मुंबई बँकची सेव्हिंग्स बँक

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ डिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास किंवा त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपया प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक
आकोला ४।७।०३ } J. Kinniburgh
एजंट

---

अति स्वस्त! ज्ञानविलास अति स्वस्त!!

हें अत्यंत चटकदार व लोक प्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळून, शिवाय प्रत्येक वर्षारंभी उपयुक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. वरा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही० पी० नें मागवा.

पत्ता-संपादक, ज्ञानविलास
खणदाळ पो गडहिंग्लज.
इ० कोल्हापुर.

---

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दंताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दातो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ।॥।




देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हो।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम॥

दांतावर मळें जमणे, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें, हलूं लागणें, कमजोर होणें, मेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतांनीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यांतून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अॅण्ड कंम्पनी मथुरा

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेरावफडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

आंद्रयू कार्नेजी ह्यांचें सध्यां दरसालचें उत्पन्न अडीच कोटी रुपयांचें आहे.

पाळणा हालवण्याचें यंत्र निघालें आहे. त्यास किल्ली दिली म्हणजे पाळणा हालून सुस्वर वादनही होतें.

एका प्रकारच्या घंटेच्या नादास सिंह वाघ भीत असतात. त्या घंट्या हिमालयावरच्या गाईंच्या गळ्यांत बांधू लागले आहेत.

स्वीडनांत आगगाड्यांतल्या तिसऱ्या वर्गाच्या उपयोगा करितां धर्मार्थ पुस्तकालयें स्थापिलीं आहेत, तशींच डेन्मार्कांतही होत आहेत. हिंदुस्थानांत तशीं व्हावीं.

व्हेट्ली स्ट्रेचप ह्या ग्रंथकारानीं आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे कीं, हिंदुतले मुसलमानी आणि मुसलमानांतले सय्यद महमूद ह्या न्यायमूर्तींनीं दिलेले फैसले अत्यंत मुद्देसूत असून यांवरून यांची अगाध विद्वता चांगली स्पष्ट होत आहे.

महाराज सातवे एडवर्ड ह्यांचे नांवें एक मोठें लढाऊ जाहाज बांधीत आहेत, तेवढें जहाज सगळ्या पृथ्वींत दुसरें कोठें नाहीं. यास खर्च कमींत कमी २,१०,००,००० रुपये लागेल म्हणतात.

सगळ्यांत मोठा मळा मिसौरी प्रांतांत लेबानन येथें आहे तो २३०० एकर आहे. ह्यांत झाडें १३८००० आहेत. यांतलीं फळें बाजारास नेण्यास आगगाडीच्या वाघणीच्या वाघणी लागतात.

लंडन शहर आणि त्यास लागून असलेलीं उपनगरें ह्यांची एकंदर लोक संख्या ६५,८१,३७२ आहे. कांहीं कांहीं भागांत स्त्रियांची संख्या पुरुषांच्या दिढीनें आहे. घरगुती काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या २,३४,३९८ असून गडी मात्र १५,४२९ आहेत.

जर्मनींत एका तीस वर्षांच्या जन्मांधास डाक्तर लोकांच्या शस्त्र क्रियेनें दृष्टि प्राप्त झाली आहे. हे ज्ञान वृद्धीचें फळ होय.

सहा वर्षांचा एक मुलगा माद्रिडाहून बर्लिनास आला आहे. तो पेटी वगैरे वाद्यें वाजविण्यांत जन्मतःच निपुण आहे. त्यावर जर्मन बादशाहाची मर्जी आहे.

विशेष अर्थाचा शब्द किंवा विशेष अर्थाचें वाक्य लिहिण्यास इंग्रजीमध्यें इटालिक्सचा उपयोग करितात, तसें कांहीं मराठींत असावें म्हणून निर्णयसागर छापखान्याचे मालक रा० रा० जावजी दादाजी यांनीं "मराठी इटालिक्स टैप" तयार करविले आहेत

इंग्लंडांत हामडन कोर्ट ह्या राजवाड्याच्या भोंवतालच्या बागांत एक द्राक्षवेल १३४ वर्षांचा जुना आहे. याचा घेर चार इंच आहे. एका एका घडास सातसातशें द्राक्षें येतात. गतवर्षीं याला असे १२०० घड आले होते.

मुंबई शहरास पाण्याचा पुरवठा विहार तुळशी आणि तान्सा या तलावांतून होतो या तलावांतून रोजच्या रोज सुमारें ३५०००००० ग्यालन पाणी शहरांत येतें.

जपानांत ठैवान नांवाच्या प्रदेशांत कापुराच्या झाडांचें मोठें अरण्य सांपडलें आहे, त्यांत दर वर्षास ६ हजार टन कापूर निघेल असें एका जपानी पत्रानें प्रसिद्ध केलें आहे.

---

NOTICE

Under rule 12 of the Municipal Election rules, it is hereby published for general information that the election to fill up the vacancies caused by the death of Mr. V. A. Kane and the resignation of Mr. Ganoba Raghoba elected Members for ward No. 1 will take place from 7 A. M. to 5 P. M. on the 6th. August 1903 at the Patel's Chowri.

Nomination papers will be received by the Polling Officer Mr. C. H. Price Extra Assistant Commissioner before the 30th. of July 1903.

Dated Akola 10th July 1903 } V. M. Mahajani Vice-Chairman M. Committee Akola.

---

## जाहिरात

म्युनिसिपाल निवडणुकीचें नियमांतील नियम १२ अन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं अकोले म्युनिसिपाल कमेटीतील भाग १ तर्फे निवडलेल्या मेंबर पैकीं मि. विनायक अपाजी काणे मयत झाल्यामुळें आणि मि. गणोबा राघोबा यांनीं जागेचा राजिनामा दिल्या मुळें खालीं झालेल्या जागा भरण्याकरितां ता. ६ माहे आगष्ट सन १९०३ इ० रोजी सकाळचे ७ वाजे पासून ते सायंकाळचे ५ वाजे पर्यंत पाटील चावडींत निवडणूक होणार आहे. मे. सी. एच. प्राईस साहेब एक्ट्रा असि० कमिशनर हे पोलिंग आफिसर आहेत व ते तारीख ३०।७।०३ इ० चे आंत उमेदवाराचे नांवचे अर्ज घेतील ता. १०।७।०३ इ०

V. M. Mahajani
Vice—Chairman
Municipal Comittee Akola..

---

## नोटीस

वेशमी रामसखी मर्द भिवराज तर्फे मुखत्यार पुत्र जगन्नाथ भिवराज राहणार ताजनापेठ आकोला. यांस.

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं तुमची वऱ्हाडसमाचार पत्रांत प्रसिध्द झालेली जाहिर नोटीस पोचली. तुम्ही लिहिलेला सर्व मजकूर खोटा आहे रामसखीबाई कडून मला रुपये घेण्याचें कांहींच कारण पडलें नाहीं अर्थात तुम्हाला १२५ रुपये परत दिले असें लिहितां तेंही अगदीं खोटें आहे. तुम्ही असाही धाकदपटशा घातला आहे कीं, मजवर दिवाणींत व फौजदारींत फिर्याद करण्यांत येईल. सरकारी कोर्टें खुलीं आहेत आणि तुम्ही वाटेल तेव्हां दिवाणी फौजदारी अवश्य चालवावी. तुम्हास तसें करूं नये म्हणून कोणी म्हटलें नव्हतें, तुम्ही अशी जाहिरसमज देऊन चार लोकांमध्यें माझी बेअब्रू मात्र विनाकारण केली आहे. फक्त तुम्ही जाहिर रितीची नोटीस केली म्हणून तुम्हावर बेअब्रूबद्दल दिवाणी व फौजदारी मला करावी लागणार आहे. या नोटिशीचा खर्च तुम्हास द्यावा लागेल. कळावें तारीख १३ जुलै १९०३ इसवी.

सही ( मारवाडींत )
शंकरलाल वा. पन्नालाल खत्री
राहणार ताजनापेठ आकोला
दस्तुर खुद्द.

---


## नाग. नरसे, पिठोरी व जिवत्या.

आम्ही येथें विक्री करितां नाग, नरसे, जिवत्या आणि पिठोरी किंवा पाटोडा व त्यांत बुध बृहस्पती हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्यापेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापिली आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदर्हू चित्राचें कागद पाठवून देऊं. चित्राचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पमाणें पडेल. व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनोबा दलाल
कंपाझिटर.

वऱ्हाडसमाचार आफिस आकोला

---


## खरेदी करा !

## रासकोपची थेट व खरी पेटेंट वॉचेस

## नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका.

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें चिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वाचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला अचूक वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉंट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वाच घेणें विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **स्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण यांच्या गुणांची प्रचीति तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व या बद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

**सूचनाः**—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठें मध्यम १६ रु. १७ रु. लहान

रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९लाईन ओपनफेस ........................४०
१९ ,, हंटिंग..............................५०

गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

मेटलचें तीन वर्ष ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेंकंद कांट्यासह............२०
१९ ,, मध्यभागीं सेंकंद कांटा असलें ..................२२
१९ ,, हाफ हंटिंगचें................२०
१९ ,, हंटिंगचें ....................२०
१४ ,, रिस्ट वॉच..................२

इनगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओंपन फेस............२०
१९ ,, हंटिंग.........................२०
१४ ,, रिस्टवॉच......................२०

सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ...........३०
१४ ,, हंटिंग..........................३५
१८ व १९ ,, ओपनफेस ..........३०
१९ ,, सेकंद कांट्यासह............३२
१९ ,, मध्यभागीं सेंकंद कांटा असलेलें ..................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग .................... ४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेटगोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

सी. हिनीगर आणि कंपनी.

ओरिजनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे
सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

---

ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक. मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपर्युक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खरजीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मूळव्याधी. वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनें; पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत वाटेल त्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दरः—

| | | | |
|---|---|---|---|
| ३९ गो० | १ रु० | ७९ गो० | २ रु० |
| ११९ गो० | ३ रु० | १६९ गो० | ४ रु० |
| २७९ गो० | ६ रु० | ५५० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंतस्थ रसायनें धातूंची भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाच मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना——अलिकडे २।३ वर्षे आजरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचींच औषधें खालील बिनचूक सही पत्त्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

---

## ORIENTAL GOVERNMENT SECURITY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED

Established 1874.

Head Office,—BOMBAY.

*Chief Agency for C.P. Berar & Khandesh*

Head—quarters—Nagpur, C. P.

—:0:—

FUNDS EXCEED TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

———

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount due under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security.*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Frospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh*

---

*K. N. ESMAYAL & Co.*

शक्तीवर्धक कामोत्तेजक गोळ्या ४२ ची सीसी कीं. रु.१॥.

तापावर एग्युनीक्शर कीं. ॥=

वातावर नारायण तेल कीं रु. १

गजकर्णाचे अपतिम सोनेरी मलम किं. ४ आणे.

पानथरीवर अमोलीकगोळ्या ६० किंमत रु० १

पत्ता--खोजानुरा इस्मायल आणि कंपनी.
वर्धा. सी. पी.

---

## जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार, मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यांसह. पाडव्यापर्यंतच किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्यांचें शारीरभाष्य मराठी भाषांतर व विवेचन यांसह. मार्चपासून मासिक पु. द्वारें निघेल. गीताभाष्यापेक्षा तिप्पट. ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व ५॥६ पहिल्या २०० ग्राहकांस बालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे २ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ सं. भा. सह बक्षिस.

का० वा० लेले वाई

---

## मुंबई बँकची सव्हिंग्स बँक

ह्या बँकेंत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्यांपैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यांपिकीं मयताचे मागें राहील त्यास किंवा त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपया प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. Kinniburgh
आकोला ४।७।०३ } एजंट

---

अति स्वस्त! ज्ञानविलास अति स्वस्त!!

हें अत्यंत चटकदार व लोक प्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळून, शिवाय प्रत्येक वर्षारंभी उपयुक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. वरा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही० पी० नें मागवा.

पत्ता—संपादक, ज्ञानविलास
खणदाळ पो गडइंग्लज.
इ० कोल्हापूर.

---

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दातांच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दातांच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अकसीर का दातों मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥




देखना चाहिये क्या मुश्क कदर करती हो।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ॥-

दांतावर माळें जमणें, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें, हलूं लागणें, कमजोर होणें, मेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यांतून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला.

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अॅण्ड कंम्पनी मथुरा

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेरावफडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

आकोल्यातील लोकांस................१ ६.
बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ ८
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
फिरके ळ . . . . .
नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ८६
दुसरे खेपेस.... .......८।

REGISTERED N. No. 4

Mofussil ... ... ... 2 ( wi
All Subscriptions to be
advance.
Single copy ..............
Adver
below 10 lines ..
Per line over 10 ......B as
Repetition Per line ...2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVII AKOLA MONDAY 27 JULY 1903 NO 29

वष ३७ आकोला सोमवार तारीख २७ माहे जुलै सन १९०३ इ० अंक २९

## नाटीस

केशव वल्लद धर्नासिंग पाटील लेहे मौंज वडाळी परगणे अडगांव तालुके आकोट जिल्हे आकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं शेख गवजु वल्लद महमद पना मुसलमान मौजे वडाळी याजवर मौजे वडाळी येथील अंबर ईनें शेतांतील हिस्सा कबजात मिळण्या करितां तेव्हांरे कोर्टांत दावा करण्या करितां तुह्मी व मी मिळून गवजुनें दिलेलें खरेदी खत घेऊन तेव्हांऱ्यास सन १८९८ सालीं गेलों होतों परंतु दावा न करितां तेंच आह्मारे वापस आलो व खरेदी खत तुमचें जवळ राहिलें तें आह्मास आजपर्यंत तुह्मी दिलें नाहीं करितां या नोटीशीने कळविण्यांत येतें कीं हल्लीं आह्मास याजवर दावा करणें जरूर आहे तर आमचें खरेदीखत तुह्मास नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचें आंत द्यावें. कळावें. तारीख ११ माहे जुलै सन १९०३ इसवी.

सही

राघजी वल्लद दयोजी पाटील
मौजे वडाळी
दस्तुर खुद्द.

---

## नोटीस

नोटीस बेशमी—— बाळकृष्ण रामचंद्र तिमसे राहाणार बोरगांव मंजू तर्फे मु० कृष्णराव मडंग राहाणार आकोलें यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमची ता० २।७।९०३ इसवींची शुद्धवऱ्हाडीची नोटीस मिळाली ती अगदीं खोटी आहे बोरगांव मंजु येथील सर्व्हे नंबर ३३१ हें शेत मी अज्ञान असतां माझे बापानें तुह्मांस कांहीं वर्षा करितां पट्यानीं दिलें होतें तुमचीं वर्षें पुरे झाल्यास माझें शेत माझ्या ताब्यांत द्यावें न दिल्यास मी रीति प्रमाणें दावा करून कोट खर्च व या नोटिशीचे खर्चा सुद्धां भरून घेईन. कळावें. तारीख ११ माहे जुलै सन १९०३ इ०

सही

लटु वल्लद गंगाराम माळी गोळी
राहाणार बोरगांव मंजु
ता० आकोलें निशाणी
खुद केली असे.

---

## नोटीस

नोटीस बेशमी—— बाबरखान पिरदलखा मुकाम निमकर्दा यांस खालीं सही करणार याज कडून नोटीस करण्यांत येत आहे कीं तुह्मांस सालखत १ वर्षाचें लिहून दिलें त्याचा तोंडी ठराव असा झाला कीं एक वर्षाचे ६० रुपयाची २ खंडी ज्वारी द्यावी व दुसरें वर्षाचे ६० नगदी द्यावे त्यापैकीं ९ मण ज्वारी तुह्मी दिली व मी पुढें ८ महिनें नोकरी केली व पुर्जाचे अगोदर चार महिनें भरले होते येणें प्रमाणें मी १२ महिनें भरून तुह्मांस ज्वारी मागत असतां पुढें काळ पडला ह्मणून तुह्मी ज्वारी दिली नाहीं मग मी पुढें गिट्टीचे कामावर गेलों पुनः येथून येऊन तुह्मास रुपये मागीत असतां तुह्मी ह्मणाले कीं माझे कामावर या ह्मणजे देतो पुनः मी कामावर येऊन चार महिने नोकरी केली मग पुढें तुह्मी देशास गेले तर तुमचे बायकोस मागें रुपये देण्यास सांगितलें परंतु तिनेंही दिलें नाहीं. तुमचे मागें तुमचा बैल विकण्यास तुमचें बायकोनें पाठविला असतां तो बैल मी पारस मुकामीं ३३ रुपयास विकला त्यांतून फक्त मी ३ रुपये खर्चले येणें प्रमाणें तुह्मा कडून मला ९ मण ज्वारीचे ७॥ रुपये व बैला पैकीं खर्चलेलें ३ रुपये एकूण तुह्माकडून मला १०॥ रुपये पावलें त्यांत माझी नोकरी १६ महिनें झाली तर दरमहा ५ रुपये प्रमाणें माझे ८० रुपये झाले व तुह्मा कडून १०॥ रुपये पावलेले वजा जाऊन बाकी माझे ६९॥ रुपये राहिले ते देण्याची २० दिवसांचे आंत तजवीज करावी नाहीं तर कोर्टाचे कानू प्रमाणें तजवीज करण्यांत येईल. कळावें तारीख २१।७।१९०३ इ०

सही

दुला वल्लद झाडू महार
मुकाम पारस.

---

## नोटीस

नोटीस बेशमी— महेबुबी मर्द हुसेनखा मुखमार गुलाबखा तुराबखा मुकाम हातरूण यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आह्मी तुमची विहिर उक्ती ६२१ रुपयास घेतली त्यापैकीं ५५० रुपये ती पुरी करून आह्मांस पावले बाकी ७५ रुपये राहिले व १ खंडी चुना २० रुपये २ टन लांकूड १५ रुपये काटवण खिरड्या चाकें मिळून २९ रुपये कडाशाचा बैल ४८ रुपये २ नागराचीं खोडें ३ रुपये येणें प्रमाणें तुह्माकडेस १९० रुपये राहिले त्यातून ९ रुपये बिगर पावतीचे पावले बाकी १८१ रुपये राहिले विहिरींत पाणी २२ फूट असून तुह्मी करारा प्रमाणें २ महिन्यापासून सांगितलें असतां मोट धरीत नाहीं तर आतां २० दिवसांचे आंत कराराप्रमाणें मोट लावून घ्यावी पुढें आह्मी सबब ऐकणार नाहीं व रुपये देण्याचे २० दिवसांचे आंत करावें नाहीं तर कोर्टाचे कानू प्रमाणें तजवीज करण्यांत येईल कळावें. तारीख २ माहे जुलै सन १९०३ इसवी.

सही

दुला वल्लद झाडू महार
मुकाम पारस.

---

## नोटीस

नोटीस बेशमी शिवाजी वल्लद सतवाजी जात कोष्टी राहणार मौजे तरोडें परगणें उमरखेड तालुके पुसद जिल्हे वाशीम यास.—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं अजमासे पांच वर्षें होऊन गेलीं माझे पालन कर्ते भाऊ आणि मातोश्री यांनीं जातीचे चाली प्रमाणें तुमच्याशीं माझा गंधर्व विवाह करून दिला. त्याप्रमाणें विवाह झाल्यापासून तुह्मी फक्त सात आठ महिने आपले घरीं नेऊन मजला स्त्रीप्रमाणें वागविलें. मानंतर तुह्मी तंटा उपस्थित करून व माझ्याशीं वैरभावानें वागून मजला मारहाण करून माझे भावाचे घरीं मौजे दगड धानोरें येथें नेऊन घातलें. मानंतर बरेच दिवसांनीं माझे भावानें मजला आपलें घरीं नांदविण्याकरितां घेऊन जाण्याविषयीं तुमची प्रार्थना केली परंतु तुह्मी आपले स्वछंदानें वागून मजला आपले घरीं नेण्याचा इनकार करिता मी तुमचे घरीं असतां तुमचे मर्जीप्रमाणें वागून व तुमचे आज्ञेबाहेर नसतां तुह्मी स्वछंदीपणानें वागून मजला नांदवीत नाहीं. हल्लीं मी आपले भावाचे घरीं राहून सावकारी कर्ज काढून दुष्काळाचे पूर्वीपासून अन्नवस्त्राचा खर्च चालवीत आहे. मजला सालीना माझ्या गरीबीप्रमाणें अन्नवस्त्रास पन्नास रुपये खर्च होतो. आजपर्यंत अडीचशें रुपये कर्ज मजवर झाले आहे तर आतां या नोटीशीनें तुह्मास कळविलें जाते कीं ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत तुह्मी सावकाराचे कर्जाची फेड व्याजासुद्धां करून देऊन मजला तुह्मी आपले घरीं नांदविण्यास घेऊन जावें. मी तुमचे घरीं नांदण्यास राजी आहे. याप्रमाणें मुदतीचे आंत तुमचे कडून घडून न आल्यास सावकार मार्फत तुमचे वर दिवाणींत दावा करून नोटिशीचे खर्चासुद्धां खर्चाबद्दलचा पैसा वसूल करण्याची तजवीज केली जाईल आणि तुमचा माझेवर गंधर्व विवाहाचे संबंधानें बायकोपणाचा हक्क नाहींसा होऊन मी दुसरा घरोबा करीन मग तुमची माझेवर मुळीच सत्ता चालणार नाहीं ही नोटीस दिली असे. तारीख १७ माहे जुलै सन १९०३ इसवी. दस्तुर किसनराव सखाराम पाटील उमेदवार पुसद.

सही

सहीचीं निशाणी बांगडी साळू
मर्द शिवाजी कोष्टी राहणार
हल्लीं दगड धानोर तालुके
पुसद जिल्हे वाशीम.

---

## नोटीस

र० नंबर ११ क्लास १० वेकीं
मिसल नंबर ३/१९०३

मु० नं. १५७/१८९३ द० र० नंबर १००७/१९०२

बि० किंग सा० सिव्हिल जड्ज सा० जिल्हा वाशीम.

वादी

प्रताप रघुनाथ मारवाडी हिरालाल बजरंग मारवाडी दुकान कोंडोली ता० मंगरूळपीर.

प्रतिवादी

माहादापा वा। बाजीराव आपा वाणी राहणार कसबे गिरोली तालुके मंगरूळपीर.

नोटीस देण्यांत येते कीं अर्जदार प्रतिवादी महादापा वा। बाजीराव राहणार कसबे गिरोली असा जो वरील मुकदम्यांत सि० प्रो० कलम ३३७ प्रमाणे वारंटा वरून धरून कोर्टापुढें आणल्या वरून अर्जदार यानें सि० प्रो० कलम ३४४ प्रमाणें मी नादार असें ह्मणोन कोर्टास अर्ज केला आहे करितां नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं अर्जदार यांस नादार का ठरविलें जाऊं नये ह्मणोन या संबंधानें चौकशीची ता. १९ सप्टेंबर सन १९०३ मुकरर केली आहे. ज्या सावकाराची तकरार असेल त्यांनीं येथें आमचें कोर्टांत १० वाजतां हजर रहावें पुढें तकरार ऐकिली जाणार नाहीं. ता० २० ७।१९०३ इ०

S. H. King.

अर्जदार यांनीं दिलेली सावकारांची नांवें रकम

१ प्रताप रघुनाथ मा० हिरालाल बजरंग मारवाडी दुकान मौजे कोंडोली प्रगणें गिरोली तालुके मंगरूळपीर. ५७८॥=

१ शेख मोलु मुसलमान राहणार मौजे सोमठाणा प्रगणें गिरोली ता. मंगरूळपीर. ५०

S. H. King

---

वऱ्हाडसमाचार

मिते श्रवण शुद्ध ३ शके १८२५

## इजिप्शिअन कपाशीची लागवड.

नंबर १

हिंदुस्थानच्या प्रजेपैकीं शेंकडा ८० पेक्षां जास्त लोक शेतीवर आपली उपजीविका करणारे आहेत. तेव्हां शेतीची उर्जितावस्था कोणत्या उपायांनीं करणें शक्य आहे हें काम देशांतील पुढाऱ्यांचें होय, व ह्याच तऱ्हेचा प्रयत्न मुंबईतील प्रसिद्ध मि० टाटा ह्यांनीं चालविला आहे. ईजिप्शिअन कपाशीच्या लागवडी संबंधानें सूचना करण्याच्या हेतूनें त्यांनीं एक उपयुक्त लेख नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्याबद्दल आम्ही त्याचे आभार मानतो. हिंदुस्थानांत कपाशीची लागवड बरीच होत असते, परंतु ती कापूस लांब धाग्याचा नसल्यामुळें जाडें कापड तयार करण्यापलीकडे त्याचा उपयोग होऊं शकत नाहीं. हिंदुस्थानांतील कापसा पासून जें जाडें भरडें कापड तयार होतें त्याला आज पावेतों चीन देशाकडून बरीच मागणी येत असे परंतु आतां जपान प्रमाणें त्या देशांतही औद्योगिक चळवळ सुरूं झाली असल्यामुळें चीनचा बाजार आपल्या देशांतील कापडास लवकरच बंद होईल अशी भीति वाटूं लागली आहे ह्यामुळें अमेरिका व ईजिप्त ह्या देशांतून कापूस आणवून त्याच्या सहायानें उच्च तऱ्हेचें कापड देशी कारखान्यांतून तयार करण्याची खटपट इकडील कारखानदारांनीं काहीं दिवस केली. परंतु अलिकडे त्या कापसाचा भाव बराच वाढला असल्यामुळें त्यांच्या प्रयत्नाला चांगलेंसें यश येणार नाहीं अशी भीति वाटूं लागली आहे, व इंग्लंड प्रमाणेंच जर्मनी, ऑस्ट्रिया व बेलजम ह्या देशांचे ही आलें कापड हिंदुस्थानांत आणून विकण्याचा जारी प्रयत्न सुरूं असल्यामुळें देशी कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाला त्याबरोबर टिकाव धरवणार नाहीं. अशी स्थिती काहीं काळ पावेतों चालूं राहिल्यास हिंदुस्थानांत कापसाची लागवड केवळ नामशेष होऊन राहील व ह्यामुळें शेतकरी लोक, कापसाचे व्यापारी व देशी कारखानदार या सर्वांचें नुकसान होणार आहे. ह्मणून अशी स्थिती न येऊं देण्या विषयीं कारखानदारांनीं, सरकारनें व सुशिक्षित पुढाऱ्यांनीं मनापासून खटपट केली पाहिजे. ह्मणून मि० टाटा ह्यांनीं अशी सूचना केली आहे कीं ज्याचा धागा लांब असतो अशा ईजिप्शिअन कापसाची लागवड आपल्या देशात करण्याची खटपट केली पाहिजे. हल्लीं हिंदुस्थानांत ज्या कापसाची लागवड करण्यांत येते त्याचें उत्पन्न दर एकरी सरासरीच्या मानानें ३० पौंड मात्र होतें असें मि० टाटा ह्यांचें ह्मणणें आहे. व सदर्हू मालाची दर पौंडास साडे तीन आणे ह्या प्रमाणें किंमत धरली असतां दर एकरी रु. ६॥– मात्र दर वर्षी उत्पन्न होतें. भडोच जिल्ह्यांत ज्या कापसाची लागवड करण्यांत येते त्याचें उत्पन्न दर एकरी १०० पौंड ह्या मानानें होत असून त्याची किंमत रु. २१॥= येते. परंतु इजिप्शिअन कापसाचें उत्पन्न दर एकरी ६०० पौंड प्रमाणें त्या देशांत होतें; व त्याला किंमत ही जास्त ह्मणजे दर पौंडास ५॥ आणे प्रमाणे येते; ह्मणजे ह्या कापसाच्या लागवडी पासून येणारें वार्षिक उत्पन्न दर एकरास रु. २०६। प्रमाणें होतें. दोन प्रकारच्या कापसाच्या उत्पन्नांत एवढा फरक दिसून येत असल्यावर, इजिप्शिअन कापसाची लागवड करण्या विषयीं शेतकरी लोकांचें मन वळविण्या करितां फारशी खटपट करण्याची जरूरी नाहीं. ह्या कापसाच्या लागवडी पासून चांगलें उत्पन्न होतें असें त्यांच्या अनुभवास आणून दिल्या नंतर त्याची लागवड करण्यास ते विलंब लावणार नाहींत ही गोष्ट निर्विवाद आहे. ही लागवड करण्यांत आली आहे ही गोष्ट खरी परंतु आपल्या कडील इतर कापसाच्या जाती प्रमाणें त्याची लागवड पावसाळ्याच्या आरंभीं करण्याचा ह्या पूर्वी प्रयत्न केला होता. परंतु रब्बीच्या पिका प्रमाणें ह्याची लागवड पावसाळ्याच्या अखेरीस केली असतां यश येण्याचा बराच संभव आहे असें मि. टाटा ह्यांचें मत आहे. ईजिप्त देशात कापसाच्या लागवडीला नाइल नदीच्या कालव्याचें पाणी व गाळ ह्याची मदत होत असल्यामुळें पीक चांगले येतें. ह्याच तऱ्हेची स्थिति सिंध प्रांतात असल्यामुळें तिकडे ह्या कापसाचें उत्पन्न चांगलें येण्याचा संभव आहे. परंतु इतर प्रांतांतही पावसाळ्याच्या अखेरीस ह्मणजे आक्टोबर महिन्याचे सुमारास त्याची लागवड करून विकास मोटेनें पाणी दिलें असतां यश येईल असें मि. टाटा ह्यांचें मत आहे. ह्या कापसाची लागवड ईजिप्त देशांत कोणत्या तऱ्हेनें करण्यांत येते व आपल्या देशाचें हवामान पाहून त्यांत कोणत्या प्रकारचा फरक करणें इष्ट आहे ह्या संबंधानें मि. टाटा ह्यांनीं काहीं उपयुक्त सूचना केल्या आहेत; त्यांचा विचार पुढील खेपेस करण्याचें आश्वासन देऊन आजच्या खेपेस सदर्हू विषयाचा निरोप घेतों.

---

## पीकपाणी

गेल्या दहाबारा दिवसांत पर्जन्यानें सर्वत्र बहार करून दिली आहे. पुनर्वसु व पुष्य या दोन नक्षत्राचे पाऊस फार चांगले झाले व होत आहेत. सध्यां पावसा विषयीं काळजी दूर झाली इतकेंच नाहीं काहीं काहीं भागांत आतां काहीं दिवस पावेतों पाऊस उघडावयाला पाहिजे आहे. ईश्वर कृपेनें अमृतवृष्टी विपूल होऊन पृथ्वी धनधान्यानें समृद्ध होवो !

पंजाबांत पावसाची आतां समृद्धि झाली आहे. अमृतसर जिल्ह्यांतील सर्व ठिकाणीं पर्जन्य उत्तम झाला; व हल्लीं शेतीच्या कामाला चांगला प्रारंभ होत आहे. हिसार जिल्ह्यांत पाणी पुष्कळ झालें. कपाशी जोरावर आहे. व खरिपाचे पेरे बंद पडले होते ते आता पुरे आले. मुलतानाकडे पाऊस पुरेसा होऊन पीकें सुस्थितींत आहेत. दिल्ली जिल्ह्याही भावी पीकांची समृद्धि दर्शवीत आहे.

वायव्य प्रांतांत अजून असावी तितकी पावसाची विपूलता नाहीं. आग्रा जिल्ह्यांत पावसाला प्रारंभ होत आहे. कपाशीचा पेरा चालूं आहे. कानपूर जिल्हा पावसा साठीं आकाशाकडे डोळे फिरवीत आहे. लवकरच ही काळजी दूर होण्याचीं रंग मात्र दिसत होता आणि ह्या प्रमाणें पाऊस होत आहे.

रजपुतान्यांतील स्थिती नीटशी समाधानकारक नाहीं तथापि पर्जन्याचा रंग चांगला दिसूं लागून काल परवां पाऊस चांगला झाला.

वऱ्हाड प्रांत, खानदेश, भडोच, सोलापूर इत्यादि भागांत मुबलक पाऊस झाला असून पीकें चांगलीं जोमावर आहेत. कांहीं दिवस उघाडी पाहिजे.

अमदाबाद व काठेवाड या भागांत अजून पर्जन्याची मोठीच अवश्यकता आहे गेल्या दोन तीन दिवसांत बहुत करून गेल्या दोन तीन दिवसांच्या पावसानें अबादानी झाली असावी अशी पक्की समजूत आहे.

मद्रास इलाख्यांत पर्जन्य पडतच आहे पण अजून पुष्कळसा पाहिजे आहे.

---

## स्वधर्म-ज्ञान-प्रसार पुस्तक माला

हिंदुधर्माचे महत्व व त्यांतील उत्तमोत्तम गोष्टी हीं आबालवृद्धास आणि तशांत पाश्चिमात्य विद्येचे घुटके घेऊन मिशनरी पंथास लागलेल्या लोकांस कळावीं या हेतूनें वरील पुस्तक माला प्रसिद्ध होत आहे. आमचेकडे "गुरुभक्ती" "नागपंचमी" "भक्ति" आणि "व्रत" इत्यादि सहा विषयांवरील पुस्तकें आलीं आहेत; पुढें "बाटून व्यर्थ फसलों! सुताला आंचवलों! माणुसकीला मुकलों!" आणि "गणपती" हीं लवकरच येण्याचीं आहेत. "दुसऱ्या धर्माची निंदा करणें हें हिंदुधर्माचें ब्रीद नव्हे या हेतूनें लिहिलेलीं पुस्तकें खरोखरच चांगलीं आहेत: भाषा सरळ, सोपी, व साधी आहे. गोष्टी मात्र जराशा पौराणिक पद्धतीवर अधीकें असाख्यात असें आह्मांस वाटतें. भक्ती ह्मटलें कीं ज्यांनीं उत्तम भक्ती करून मोक्ष मिळविला त्यांचीच उदाहरणें देण्यांत यावींत ह्मणजे अशा रीतीनें पुस्तक मालेचा सुगंध अधीक मनोहर होईल. लेखक "धनुर्धारी" आहेत. तेव्हां वाचकांस त्यांच्या संबंधानें विशेष सांगण्याची अवश्यकता नाहीं. प्रसिद्ध करण्याचें काम मुंबईतील राजश्री ल. वे. माजरेकर आणि कंपनी यांनीं पत्करिलें आहे. पुस्तकें संग्राह्य आहेत. व किंमत फारच थोडी ह्मणजे एक पैसा आहे तेव्हां अशा पुस्तकांस पुष्कळ लोक उदार आश्रय देतील यांत कांहीं नवल नाहीं.

---

The Berar Samachar

MONDAY JULY 27 1903

## WANTED A TRIBUNAL

Our readers will probably be surprised to read the heading of this article, as they may feel no want for any in the face of the many Civil and Criminal Courts that have been already established all over the country, under the auspices of our benign Government, for the administration of Justice. But we do not advocate the establishment of any new tribunal for the decision of cases between subjects *inter se*; but we advocate the establishment of one for the decision of cases in pecuniary matters between the subjects on one side of and the rulers on the other *e. g.* between the local bodies like the Municipalities and District Boards on the one hand and the goverument on the other. According to the law which governs the working of these bodies at present, the final word in all pecuniary matters, rests with either the Commissioner or the Resident—who cannot be expected to forget the interests of the government whom they sero. It is therefore that decisions have been given on many occasions of late, against the local bodies. We advert to a few of them only, on the present occasion for the purpose of showing the necessity of an independent tribunal Our readers probably remember the injustice recently done by the government to the District Boards in the province, by tranferring an unusually heavy burden to the latter viz the expenditure of repairs for many of the roads in the province which were formerly under the management of the Public Works Department The Government have also ordered the District Boards of late to get all their works the cost of which exceeds Rs. 1000, done through the expensive agency of the P. W. D. and pay an exborbitant charge on the total amount at the rate of 16¼ *p. c.* to the latter for the supervision exercised by the Department in the execution of those works. In the case of the Municipalities also the government have shown a similar attitude in as much as they set at nought the various weighty representations that were submitted from time to time, by the Municipality here, in the matter of the tax on sites within Municipal Juriadiction, the exemption from the payment of contribution towards, Pension Fund for those posts which are either lying vacant or whose incumbents being, either Pensioners or superannuated persons, cannot avail themselves of the fund, the reduction of the audit charges ( which have however been recently reduced by half though not to the extent asked by the Municipality ) or the preparation of a Survey Map for the Akola town—the necessity for which was not felt by the Municipality here, as all the sites within its Jurisdiction had already been declared to belong to the government. Over and above each of the occasions noted above the Municipality here has another and a harder struggle, though fair on its merits, to fight at present viz one in the matter of the house tax on Government Buildings within the Jurisdiction of the Municipality. Our readers will probably be surprised to find at the first step that the government have allowed to remain the question undecided, although the house tax on all other buildings within the jurisdiction of the Municipality, is being levied for the past four years or so. But possibly the government machinery is slow in matters in which the government are the *paying* party ! ! The house tax in the case of ordinary town people has been calculated at the rate of 7 *p. c.* on a rental which is calculated at the rate varying from 9 to 12 *p. c.* ( *e. g.* in the case of factories and other buildings of commercial value ) on amount of capital spent on them. But the Commissioner proposes that the rental should be calculated at the

rate of 3½ p. c. on the capital in the cases of Police Lines, Barracks &c. which may be rented and at the rate of 2 p. c. in the case of Jails and other buildings which cannot be easily rented !! He has further suggested that the tax should be calculated at the rate of 4 p. c. only on the rental thus arrived at. The whole amount of the house tax on the public buildings in Akola, thus amounts to Rs. 575 or so as opposed to Rs. 2700 and odd—which would be the amount of the tax if the buildings had belonged to private individuals; and the Commissioner still further asks the Municipality to be satisfied with a round figure of Rs. 500 as the amount of the annual house—tax to be paid by the government ! The mere mention of this fact is enough to lay bare the fallacy which lies concealed in the above argument; and we are surprised to see that a responsible officer like the Commissioner should advance such special pleas on behalf of the government to the prejudice of the local bodies. We have been further informed that a new order is issued by which the charges of supervision effected by the Public Works Department will be further increased from 16 to 23 per cent. We do not know how the District Boards will welcome such an order even if they do so under a protest which is sure to be thrown off. It is therefore that we advocate the establishment of a new tribunal—which will be independent in its constitution, for deciding such disputed cases. Or such necessity will not be felt if the authorities at the helm—who represent the government will not forget the responsibility which lies on the government. If they recognise the responsibility that rightly falls on their shoulders, they will not do injustice to the local bodies and will also be perfectly justified in expecting the local bodies also to recognise the responsibility that lies on their heads in turn. The Local Self Government therefore will not work successfully until both the government and the public recognise their respective responsibilities and act fairly towards one another. In the present attitude of the Government, our local bodies have more or less become *sham* institutions of Local Self Government. They are so many offices for registering the edicts of the superior Government officers and have in fact lost all touch with the real principles of their constitution which were meant to introduce a new life into the minds of the aspiring Indian people. We hope, therefore, that an independant tribunal will remedy matters in a long way and will be useful to make the Local Self Government a *living* institution of the British empire.

## वऱ्हाडवृत्त

हवामान— पर्जन्यनें अत्यानंद करून सोडला. आतां कांहीं दिवस उघाडी पाहिजे. एकंदर पाऊस १३।१४ इंचावर झाला. रोगराई कांहींच नाहीं व सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे. पिकें चांगलीं जोमदार आहेत.

गेल्या गुरुवारा पासून चालूं असलेल्या संतत धारेनें व भीज पावसानें आकोटाचा रस्ता दोन दिवस पडल्यासारखा झाला, मे० रुस्तुमजी साहेब आकोटाला जाणार होते पण त्यांस आपला दवरा चालू आठवड्यापर्यंत लांबणीवर टाकावा लागला.

**खून**— अति संताप काय न करील ! अंबादास छत्रगुगे नांवाचा एक तरुण मनुष्य उमरावतीस राहतो. याची बायको नुकतीच शहाणी झाली आहे, बायकोला घरीं आणण्यासाठीं यानें पुष्कळ प्रयत्न केले पण माहेरच्या नातलगानीं त्याचा हिरमोड केला. ती पुढें उमरावतीसच आपल्य मावशीच्या घरीं राहण्यास आली, आपल्या घरीं नेण्यासाठीं अंबादासनें यत्न केला पण जेथें तेथें त्याचा पाणउतार होई ! तो अपमान दुर्धर वाटला. परस्परांत नळावर त्याची सत्ता त्याच्या बायकोवर चालली नाहीं, रागाच्या भरांत तो आवेशानें त्या मावशीच्या अंगावर चालून गेला आणि त्यानें तिचे तुकडे तुकडे करून दिवसा ढवळ्या खून केला या धांदलींत बायको छपरावरून उडी टाकून पळाली ! अंबादास खुनी खरा पण पत्नी संगमाविषयीं विव्हळ झालेला व संतापानें वेडावलेला बिचारा तो अपमान पोटांत घालू शकला नाहीं !

काल रोजीं रा. रा. शिवराम हरी गोखले एम. ए. प्रिन्सिपाल ट्रेनिंग कालेज, यांनीं शुक्राच्या ताऱ्या विषयीं फार सुरस व उपयुक्त माहिती सांगितली. ज्योतिर्विद्येच्या व्यासंगाकडे ह्याचें लक्ष्य विशेष आहे आणि आपल्या व्यासंगाचा फायदा ते लोकांसही सुबोध भाषेनें करून देण्याचा योग दरसाल आणितात ही आनंदाची गोष्ट होय.

बडनेऱ्याचे पोलीस इनस्पेक्टर मि. डी. जी. स्ट्रेसी यांची बढती ए० असि० कमिशनरचे जागीं झाल्या संबंधानें प्रमोदसिंधु कर्ते आपला मोद प्रदर्शवीत आहेत. मि० स्ट्रेसी भाग्यशाली खरे मि० प्रेअरो ए० अ० कमिशनर बुलढाणा हे आपल्या जागीं परत गेल्यामुळें ही नेमणूक करण्यांत आली.

रा. रा. त्रिम्बक गणेश परांजपे यांचे प्रकरण अलिशान रेसिडेंट साहेबांकडे धाडण्यांत आलें आहे निकाल आनंदकारक होऊन एक सद्गृहस्थ आपल्या पूर्वपदाला चढो इतकीच इच्छा आहे.

येथील सडका नीट करण्याच्या कामाला हा पाऊस फार चांगला उपयोगी पडला असता पण आमच्या म्युनसिपालिटीची व्यवस्था फार दिरंगाईची दिसते. पुढें तरी तजवीज लवकर होवो!

शेगांव २३।७।०३.

पावसानें सर्वांस संतुष्ट केलें. दुष्काळाची काळजी सध्यां तरी दूर झाली. येथील साधु महाराज हे मठकापुरास गेले होते ते नुकतेच परत आले. तुकाराम बोवास जिवंतपणीं नाहीं तर समाधि नंतरच अतिशय मान मिळूं लागला. तद्वत्च या साधु महाराजास नांवें ठेवणारेही कांहीं लोक आहेत हें आश्चर्य नाहीं.

मि० अबदूल अझीजबेग हॅास्पिटल असिस्टंट हे मूतखड्यांचे व डोळ्याचे रोगी बरे करण्याच्या कामांत फारच वाकबगार आहेत. या दोन्ही गोष्टी ते स्वतःच दुसऱ्याच्या थोड्याशा मदतीनें चांगल्या करूं शकतात. लांबलांबचे रोगी लोक ह्यांच्याकडे येत असतात. हे जातीचे मुसलमान असून स्वभावानें मनमिळाऊ व शांत असे आहेत. ह्यांच्या या चांगल्या कर्तृत्वाबद्दल यांची चांगली मान्यता होवो असें आह्मी इच्छितों.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १००। |
| सोनें २४।= | | चांदी ६८॥ |
| जवारी ४० | | जवस ९२ |
| गहू | | ८९ ते ९९ |
| बाजरी | | ५५ |
| मीठ | ३।॥= | रु. मण |
| चणे | ३ | रु. मण |
| तूप | ९ | रु. मण |
| तेल | ४॥। | रु. मण |
| रुई | | ५७ |

## नोटीस

नोटीस वेशमी— शंकर सदाशीव वृथामुंडी वस्ती आकोला तेलीपुऱ्यांत ता० व जिल्हा आकोला यांस:—

खालीं सही करणारा कडून कळविण्यांत येते कीं तुह्मी तारीख ६ माहे जुलै सन १९०२ इसवी रोजीं ८०३८।५ वर सही करून दिली ती रक्कम आठ दिवसांत आणून द्यावी न दिल्यास कायद्या प्रमाणे फिर्याद करून रुपये घेतले जातील कळावे. तारीख २१ माहे जुलै सन १९०३ इसवी.

सही

परशराम मारुती नाईक राहणार
बोरगांव मंजू ता० आकोला
तर्फे मुखत्यार गुणवंत
परशराम दस्तुर खुद्द.

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, ग्वाल्हेर संस्थानांत लोकसंख्या कमी असल्यामुळें शेतीलायक पुष्कळ जमीन पडीत राहिली आहे, यापैकीं पुष्कळशी जमीन काळीभोर आहे व तींत गहूं साधारण पर्जन्य पडल्यानें होण्यासारखा आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं जमीन पडुवा ह्मणजे दुमट व रांकड ह्मणजे पथरीली आहे व या जमिनीत इरिगेशनच्या योगानें गहूं होण्या सारखा आहे.

जे लोक बाहेरून येथें वसाहत करण्यास येतील व जमिनीची लागवड करितील त्यांना सवलती दिल्या जातील त्या येणें प्रमाणें:—

( १ ) जो इसम १०० बीघे जमिनीची लागवड करील त्याला मौरूसी हक्क दिला जाईल व त्यांजपासून इतर शेतकऱ्यापेक्षां रुपयांत एक आणा कमी महसूल जमिनीवर घेतला जाईल.

( २ ) जो इसम १०० बिघ्याहून जास्त जमिनीची लागवड करील त्याजला त्या जमिनीवर जमीदारी हक्क दिला जाईल ह्मणजे बंदोबस्ताचे वेळीं जो आकार ठरविला जाईल तो त्याजकडून घेतला जाईल.

( ३ ) जो कोणी इसम नवीन गांव वसवून १००० बीघे जमिनीची लागवड करील त्याला जमिदारी हक्क मिळून सरकार मार्फत एक पाणी पिण्यासाठीं विहीर जरूर असल्यास त्या गांवांत बांधून दिली जाईल,

( ४ ) अथवा जर कोणा इसमास एक किंवा अधिक गैर आबाद गांव घेणें असेल तर यांनीं दरखास्त दिल्यावर यांजला आणखीन कांहीं विशेष सवलती हुजूर दरबार मंजूरीनें दिल्या जातील.

( ५ ) जमिनीचा पट्टा घेणारे इसमानें तीन सालांत पट्ट्यांतील जमिनी पैकीं $\frac{1}{4}$ जमिनीची लागवड केली पाहिजे व सहा सालांत अर्ध्या जमिनीची लागवड केली पाहिजे व दहा सालांत त्या सर्व जमिनीची ह्मणजे गायराण व घरासाठीं राखून ठेविलेली जमीन खेरीज करून बाकी सर्व जमिनीची लागवड केली पाहिजे.

( ६ ) अशा लागवड केलेल्या जमिनीवर ६ वर्षे पावेतो कांहीं महसूल घेतला जाणार नाहीं नंतर पुढें तीन साल पावेतो अर्धा महसूल घेतला जाईल व त्यानंतर पुढल्या वर्षा पासून ह्मणजे दहाव्या वर्षापासून पूर्ण महसूल घेतला जाईल.

( ७ ) घरें बांधण्यासाठीं व शेती साठीं, नांगर वगैरे करण्यासाठीं जंगलांतून जें लांकूड घेतलें जाईल, तें फुकट दिलें जाईल. नवीन रैयतेसाठीं वर्षे ६ पावेतो सायरचा महसूल त्या लांकडावर माफ केला जाईल. पुढें अशा लांकडाच्या प्रत्येक गाडीवर ०॥ प्रमाणें सायरचा महसूल घेतला जाईल.

( ८ ) याहून आणखी कांहीं इतर माहिती विचारणें असल्यास तिजबद्दल सूभे साहेब जिल्हा किंवा सेक्रेटरी सदर बोर्ड आफ रेव्हन्यू यांचे कडे अर्ज करावा ह्मणजे मिळेल.

| | |
|---|---|
| लश्कर ग्वाल्हेर ता. १८ माहे जुलई सन १९०३ इसवी. | दामोदर हरी कुंठे सेक्रेटरी सदर बोर्ड आफ रे. ग्वाल्हेर स्टेट. |

## वर्तमानसार

टिळक प्रकरण— हायकोर्टानें मि० ब्रुईन पोलिस सुपरिन्टेंडेंट यांची साक्ष आरोपी तर्फे घेण्याविषयीं मि० क्रेंप्ट यांस फर्माविलें आहे. आज या खटल्यास पुन्हां पुण्यास सुरुवात होईल.

## पोपचा मृत्यु

पोप १३ वा लिओ हे एक महापुरुष होते. क्याथोलिक धर्माचे हे जगद्गुरु वयाच्या ९४ वे वर्षीं गेल्या मंगळवारीं मरण पावले. ग्लाडस्टन साहेब यांस इंग्लंडचे वृद्ध पितामह ह्मणत असत परंतु पोप हे जगाचे पितामह होते. हे पोप स्वतः मोठे विद्वान व धुरंधर मुत्सद्दी असून त्यांच्या इतका विलक्षण कार्यकर्ता पुरुष क्वचितच आढळेल. यांची राहणी अगदीं साधी होती. यांच्या अंगीं शक्ती मोठी असून नेहमी त्यांच्या चेहऱ्यावर उत्साह दिसून पडे. रोमच्या चर्चचे विषयात पोप असे हेच मोठे पोप होऊन गेले व रोमन क्याथोलिक लोकांस राजकीय हक्क मिळण्या साठीं त्यांनीं फार परिश्रम केले. त्यांच्या मरणामुळें एक मोठा मनुष्य नाहींसा झाला ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो. त्यांनीं आपली सर्व संपत्ति धर्मकार्या साठीं अर्पण केली आहे. त्यांच्या गादीवर आतां कोण रोमन जगद्गुरु होतो हें पाहावें.

लार्ड कर्झन यांच्या व्हाइसरायपणाची मुदत आणखी दोन वर्षें वाढविण्यांत आली आहे असें ताजी तार सांगते.

पोलिस कमिशननें आपले रिपोर्टांत जुडिशियल व मुलकी हीं दोन कामें निराळीं करूं नयेत, तसें करणें पोलिसच्या व माजिस्ट्रेटांच्या कामास अहितकारक होईल असें मत दिल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

पंजाबला नुकतीच एका पदवीदार मुसलमानानें पांच हजार मनुष्यांसह आर्यपंथाची दीक्षा घेतल्यामुळें पंजाबचे मुसलमान लोकांमध्यें मोठीच चळवळ उडाली असून सदहू मुसलमान गृहस्थ कुराणांतल्या दोन हजार चुका दाखविण्यास तयार असल्याचेंही प्रसिद्ध झालें आहे.

यंदाच्या राष्ट्रीय सभेचे वेळीं मद्रास येथें भरणारें औद्योगिक प्रदर्शनाला आपल्या सर्व अधिकाऱ्यांनीं सर्व प्रकारची मदत द्यावी असा ठराव काढून त्यांतच ह्याच्या कामीं पैशाची सरकारी मदत देण्याचा विचार त्याबद्दलचा अर्ज आल्यावर केला जाईल असेंही मद्रास सरकारानें ह्मणून ठेविलें आहे.

कावळे पाहिजेत— मलाया द्वीपकल्पांत कावळे मुळींच नाहींत. ते नसल्यामुळें स्वच्छता चांगलीशी राहत नाहीं, ह्मणून सध्यां सीलोनमधून कावळ्यांचीं पार्सलें रोज तिकडे चाललीं आहेत.

जंगी खाणावळ— अमेरिकेंत वाल्डार्फ अस्टोरिया येथें एक जंगी खाणावळ आहे, तशी पृथ्वीवर दुसरी कोठेंही नाहीं ह्मणतात या खाणावळींत निजावयाच्या खोल्या १३०५ असून स्नानाच्या जागा ८०० आहेत. प्रत्येक मजल्यावर एक कारकून घंटा वाजविणारा नोकर व हमाल असे असतात. हींतील जेवणाचा मुख्य दिवाणखाना २५०० माणसें एकदम बसतील एवढा आहे. दररोज या खाणावळींत ६ हजारांपर्यंत माणसें जेवून जातात !

गुंगी आणणारें गवत— मेक्सिकोमध्यें कांहीं ठिकाणीं गवत उगवतें. घोड्यांनीं खाल्लें तर तीं उभ्यानीं झोप घेऊं लागतात. गाई म्हैस्यांनीं खाल्लें तर त्या मूर्छित होऊन पडतात.

पुण्याकडे गेल्या आठवड्यांत फार पाऊस पडला. मुळा नदी फार भरली व कर्जतजवळच्या पळसदरी स्टेशनजवळ थोडासा आगगाडीचा रस्ता वाहून गेला होता, पण तो लवकरच दुरुस्त करण्यांत आला. गाडीस सुमारें १ तास उशीर झाला.

पोर्ट आर्थर येथें जी गुप्त सभा भरली होती त्यांत लढाई संबंधाची चर्चा झाली असें आतां कबूल करण्यांत आलें आहे, मात्र ह्या सभेचा मूळ हेतू तो नव्हता, जन० कुरोपाटकिन हा पोर्ट आर्थर येथें आल्यापासून रशियाच्या लढाईच्या तयारींत विशेष चळवळ झाली असें रूटर चिफू येथून कळवितो.

वकिलांस महत्वाचा अशा एका अर्जाचा गेल्या आठवड्यांत कलकत्ता हायकोर्टांत निकाल लागला. प्रेसि० स्मालकाज कोर्टांत निकाल झालेल्या एका खटल्यासंबंधानें हायकोर्टांत ओरिजिनल बाजूकडे एक अर्ज करावयाचा होता, तो अपीलेट बाजूच्या एका बाबू बेईदिया नाथ दत्त नांवाच्या वकिलानें केला. व मला असा अर्ज करण्याचा अधिकार आहे कारण स्मालकाज कोर्टावरील अपिलाचा अधिकार याच बाजूकडे आहे असें त्यांचें ह्मणणें होतें व त्यांनीं आपल्या ह्मणण्याच्या समर्थनार्थ एक तसा खटलाही काढून दाखविला. तरी तो अर्ज ओरिजिनल बाजूच्याच वकिलानें करावयास पाहिजे होता असें जजमेंट देतांना जज्जांनीं आपलें मत दिलें.

हिंदुस्थानांतील ब्रिटिश शिपायाकरितां दाया ठेवण्याकरितां लेडी कर्झन यांच्या अध्यक्षतेखालीं एक प्रयत्न करण्याचें सिमल्यास घाटत आहे; या कामास सरकारही मदत करील अशी आशा आहे असें सिमल्याची १६ वी तार सांगते. अशा संस्थेस सरकारची मदत मिळेल अशी नुस्ती आशाच कां आहे ? खात्री आहे ह्मणाना ? लेडी कर्झन या संस्थेच्या अध्यक्षीण बाई आणि त्यास मदत करणाऱ्या सरकारचे अध्यक्ष त्यांचेच पति लार्ड कर्झन. मग मदतीबद्दल शंका कां ? हिंदुस्थानच्या लोकांस उपयुक्त अशा एखाद्या संस्थेस कदाचित मदत नाहीं मिळणार, पण ज्यांच्या जिवावर हें हिंदुस्थान दाबांत ठेवावयाचें त्यांच्याकरतां मदत मिळालीच पाहिजे.

स्काटिश लोकांकीं, जे लोक दक्षिण आफ्रिकेंत लढाईत पडले त्यांचें एडिनबरो येथें स्मारक करण्यांत येणार आहे व त्याबद्दल रशियाच्या झारानें ५०० पौंड दिले आहेत, कारण हे त्या फौजेचे कर्नल होते, कर्नल होते म्हणजे ते लढाईवर गेले होते असें नव्हे तर फक्त तसा त्यास किताब होता.

एकोणिसाव्या शतकांत सर्व जगामध्यें एकंदर २० राजांचे खून झाले.

जपानांत सध्यां एकंदर १६ इंडियन विद्यार्थी असून त्यांपैकीं ८ विद्यार्थी नेपाळांतून आलेले आहेत. सध्यां तिकडे मद्रास इलाख्यांतील कोणी विद्यार्थी नाहीं.

लाहोर येथील एक सहा माणसांचें संबंध मुसलमानी कुटुंब 'शुद्धि' करून शीख धर्मांत घेण्यांत आलें. तसेंच २ पुरुष ३ स्त्रिया यांचें ख्रिस्ती कुटुंबही शुद्ध करून घेतलें.

पोलिसांत युरोपियन ऑफिसर वाढविण्याबद्दल पोलिस कमिशननें शिफारस केल्याची बातमी खरी नाहीं असें पायोनियरनें लिहिलें आहे.

बंगाली राबिनहुड—ज्याला प्रसिद्ध राबिन हुडची किंवा तंट्या भिल्लाची उपमा देतां येईल, असा हरिबाबू नांवाचा एक शूर डाकू बंगाल्यांतील मनभूम, सिंगभूम आणि बाकुरा जिल्ह्यांत कित्येक दिवस लोकांना त्रास देत होता, तो पोलिसाच्या हातीं अवघा ३ दिवसांत सांपडून मरण पावल्याचें वर्तमान पत्रिकेवरून समजतें. ह्या हरिबाबूनें तिकडे एवढा दरारा बसविला होता कीं, अमुक आटा व घी तयार ठेवण्याबद्दल तो मोठमोठ्या राजाला व जमीनदारांला पत्रें पाठवित असे; आणि ह्या प्रमाणें ते भीतीमुळें निमूटपणें सर्व तयारीही करून ठेवीत असत!! ह्या डाकूला पकडण्याचे पुष्कळ इलाज पोलिसानें केले परंतु केव्हां पोलिसाची फळी फोडूनच जावें, केव्हां भरधाव चाललेल्या आगगाडींतूनच उड्या टाकाव्या, आणि केव्हां तुरुंगाच्या भिंतीवरून पळून जावें, अशा रीतीनें ह्या बहादरानें कित्येक प्रसंग टाळले. हल्लीं तो पोलिसांच हातीं लागला तो तरी किती शिकस्तीनें ? ७०० पोलिस लोक ह्याच्या राहण्याच्या जागेजवळ जंगलांत रात्रीं दबा धरून बसले होते. ही बातमी हरिबाबूला उशिरां लागली, तथापि न डगमगतां तो धनुर्धारी होऊन आपल्या घराच्या धाब्यावर जाऊन रणठाण मांडून बसला आणि पोलिस चमूवर त्यानें सारखें शरसंधान सुरू केलें. त्या बाणांच्या माऱ्यापुढें एकही पोलिस ह्याच्या पुढें येऊं शकला नाहीं. त्याच्या बाणांचा भाता रिकामा झाला, तेव्हां त्यानें पोलिसावर धोंड्यांचा मारा सुरूं केला, आणि इलाज चालेना, तेव्हां पोलिस पुढें होऊन त्यानें गोळ्या घातल्या; त्यांतील एक गोळी वर्मी लागून तो शूर डाकू खालीं आला तेव्हां त्याला पोलिसानें पकडलें. त्यानंतर २ दिवसच तो जिवंत होता. तिसरे दिवशीं तुरुंगांत मरण पावला. असलीं हूड माणसें चौर्य कामांत न शिरतां इतर रीतीनें जर आपल्या आंगच्या गुणांचा विकास करितील तर देशाला मोठीच मदत होईल.

कांहीं जातीच्या माशाचें कातडें उत्तम प्रकारच्या कापडासारखें तयार करूं लागले आहेत. काड नांवाच्या माशाचे कातड्याचीं जाकिटें करूं लागले आहेत.

निजलेल्या मनुष्याचा आंगठा ताठ असल्यास तो बुद्धिमान् व आंत वळलेला असल्यास तो निर्बुद्ध असें एका सामुद्रिक शास्त्रज्ञान आहे.

प्रिन्स ऑफ वेल्स यांची स्वारी आपल्या पत्नीसह हिंदुस्थानांत येत्या हिवाळ्यांत न येतां १९०४ च्या हिवाळ्यांत येईल असें नक्की ठरल्याचें गेल्या मेलनें आलेल्या कांहीं खाजगी पत्रावरून समजतें. सिमला न्यूजनेंही हीच बातमी प्रसिद्ध केली आहे.

वि. सु. देसाई, वालावल हे कळवितात कीं मालवण तालुक्यांतील पराड गांवीं कुळकर्णी आडनांवाचे गौड ब्राह्मण जातीच्या एका गृहस्थाचे शेंडीतून सारखें पाणी पडतें. व एका कानांतून 'दत्त दत्त', आणि दुसऱ्यांतून 'रामराम' असा ध्वनि होतो! यामुळें दर्शनास दाटी होत आहे.

सूर्यावरील डाग आणि तारायंत्र अलिकडे सूर्याचे पृष्ठ भागावर मोठमोठें व पुष्कळ डाग दिसूं लागले आहेत. या डागांचा संबंध पृथ्वी वरील, पाऊस, हवा वगैरे शी असावा, असें पुष्कळ शास्त्रज्ञांचे अनुमान होतें. ता० ९ रोजीं या डागांचा पृथ्वीचे पोटांतील लोहचुंबका कर्षणावर एकाएकीं विलक्षण परिणाम होऊन त्या दिवशीं तिसरे प्रहरीं उत्तर हिंदुस्थानांतील तारायंत्रांतील कांहीं वेळ तारा पाठवितां येईनाशा झाल्या होत्या, असें चौबे ग्याझेट वरून समजतें.

भूकंप—एशिया मायनरमधील लेक व्हॅन नजीक झालेल्या भूकंपानें मनस्वी नुकसान होऊन ८६० मनुष्यें प्राणास मुकलीं आहेत.

बलात्कार—डमडम येथील सोजिरांनीं एक तरुण मुसलमान स्त्री रस्त्यावरून ओढून शौचकूपाच्यानजीकच्या, एका खोलींत नेली, व तेथें पुष्कळांनीं तिजवर ती बेशुद्ध पडेपर्यंत बलात्कार केला असें पत्रिकेवरून समजतें. ज्ञा. प्र.

---

## नोटीस

नोटीस बेशनी गणपती वा दानाजी पाटील राहणार मौजे उमरें ता. आकोट यांस खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं सुमारें पांच वर्षे झालीं असत तेव्हां मी तुह्मास मुलाचे लग्ना साठीं वगैरेस कर्ज मागितलें त्या वेळीं तुह्मी मजला असें सांगितलें कीं तूं आपले नवऱ्या पासून निमे सेती वगैरे जिनगी वांटून तूं आपले ताब्यांत घे ह्मणजे मी तुला कर्ज देऊन शेतीचे उत्पन्नावर फेड करून तुझी शेती तुजला परत देईन असें तुमचे सांगण्या प्रमाणें ज्या दिवशीं माझे नवऱ्या पासून मी वाटणी पत्र लिहून घेतलें त्याच दिवशीं तुमचे कर्ज घेऊन निमे जमीन गाहाण लिहून दिली पुढें थोडके दिवसांनीं हंगामी तीन रुपया (३) कपूरा तुह्मास दिला तरी तुह्मी पहिले गाहणावरून दुसरा एक कागद लिहून घेऊन नंतर एक महिन्यानीं तिसरा हा दस्तऐवज कांहींच कारण नसून लिहून घेऊन तोही नोंदून घेतला असे तीन कागद एका वर्षामध्येंच लिहून घेऊन तिसरा कागद नोंदतेवेळीं तुह्मी माझी अशी समजूत केली कीं तुझा मुलगा दांडगा आहे शेतीचा माल तुझे ताब्यांत राहिल्यास तो अफरातफर करून टाकील व व माझें कर्ज देण्याचें लांबेल. करितां तूं नोंदणार अमलदारा समोर कांहींच तक्रार न करितां कबूल जबाब दे. व माझे कर्ज तुझे शेतीचें उत्पन्नांतून सर्व फिटल्या नंतर जमीन तुजला परत देऊं व दस्तऐवज ही सर्व परत देऊं तुमचें लाघवी बोलण्याचे भरंवशावर तिसरा ही दस्तऐवज मी नोंदून दिला मी बायकोची जात असोन मजला कांहींच समजत नाहीं तुह्मी गावचे कारभारी पाटील व प्रमुख असलेवरून मी माझे बापा प्रमाणें समजून केवळ तुमचे विश्वासावर तुमचे सांगण्या प्रमाणें दस्तऐवज करून दिले नंतर दुष्काळेंच एक साल खालीं जाऊन तीन सालचे उत्पन्नाचा माल माझे जमिनीचा तुम्ही घेतला परंतु माझा हिशेब वगैरे कांहींच केला नसून जमीन परत माझे ताब्यांत देत नाहीं माझे मतानें माझे जमिनींत उत्पन्नाचे मानानें तुमचे सर्व रुपये व्याजासुद्धां फिटून माझेच रुपये तुमचेकडेस फाजील निघतात ते मजला देऊन तुमचे वाजवी देणें निघाल्यास मी देईन. आतां ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत हिशेब करून माझे नोंदलेले दस्तऐवज तीन व एक करारनामा मजला परत देऊन जमीन माझी मजला परत द्यावी या प्रमाणें न केल्यास रिती प्रमाणें दिवाणी अगर फौजदारी चालेल त्या कोर्टांत मजला फिर्याद करणें भाग पडेल परंतु विनंती ही आहे कीं कोणतेही फिर्यादीचा प्रसंग आणणें उचित नाहीं आपसात निकाल करावा हेंच चांगलें आहे. निकाल न केल्यास कोर्टाचा खर्च वगैरे एकंदर खर्च तुम्हास द्यावा लागेल. अगर फौजदारीचा इनसाफ मिळेल त्याप्रमाणें वर्तावें लागेल, याजबद्दल मजवर दूषण देऊं नये. कळावे ता० २०।७।०३ इ०

सही.

धर्मी मर्द रणजीतसींग रजपूत
राहणार उमरे ता० आकोट
निशाणी खुद्द हातची ०

## नोटीस

बेशमी– रामचंद्र पांडुरंग आणि गोविंद पांडुरंग बोंबडे उभयतां अज्ञान पालन करणार आई गोदूबाई राहणार अगरवेस, आकोला यांस:--

या जाहीर लेखानें तुम्हाला कळविण्यांत येते 'श्री खंडेश्वर पांडुरंग' या नांवाची जी दुकान चालू होती तिज संबंधानें एकदां पक्का निकाल करण्याविषयीं तुम्हास निरोप निरोपी व समक्ष अनेकवेळां ह्मटलें पण तुम्ही ही गोष्ट मनावर घेत नाहीं. तुमची अड चण जाणूनच आम्ही इतकीं वर्षें तुम्हाला निभवून घेतलें परंतु यापुढें तुम्हाकडे सदर्हू दुकानाची बाकी ठेविता येत नाहीं. तुम्हीं आपला हिशोब पाहून घ्यावा आणि आमची बाकी चुकती एकोत्रा व्याजासह पोचती करावी. या नोटिशीच्या तारखे पासून पंधरा दिवसांच्या आत असें करण्यास तुम्ही चुकाल तर तुमच्याकडे निघत असलेल्या रकमे बद्दल दावा करण्यात येईल आणि आमच्या रकमेच्या तारणार्थ जो स्थावर माल तुमचें राहतें घर वगैरे लिहून कैलासवासी पांडुरंग रामचंद्र बोंबडे यांनीं दिलें आहे त्याची कोर्ट मार्फत विक्री करून सर्व खर्चासुद्धां व या नोटिशीच्या खर्चा सुद्धा सव्याज सर्व रकम त्या विक्रीच्या रकमेतून वसूल करण्यांत येईल. कळावें. तारीख २० जुलई सन १९०३ इ०

सही

त्रिम्बक रामराव जहागीरदार अज्ञान पालन करणार आई सुंदराबाई जहागीरदार राहणार बाभूळगांव तालुका आकोला. तर्फे मुखत्यार गणेश दामोदर लेले दस्तुर खुद्द.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस या जाहिर लेखानें कळविण्यांत येतें कीं अगरवेशीच्या रस्त्यावर कै० पांडुरंग रामचंद्र बोंबडे यांनीं बांधलेलें घर आमच्या दुकानाच्या कर्जाच्या फेडी साठीं तारण गहाण आहे. हा तारणाचा दस्ताऐवज नोंदलेला आहे. आमच्या रकमेची फेड केल्या शिवाय तें घर कोणी विकत किंवा गहाण वगैरे घेऊं नये. जो कोणी सदर्हू इस्टेटी संबंधानें देवघेव करील तो विनाकारण डुबेल. अशी कोणाच्या नुकसानीची गोष्ट होऊं नये ह्मणून या जाहिरनाम्यानें सर्वत्रांस आगाऊ सूचना जागे करीत आहे. कळावें. तारीख २० जुलई सन १९०३ इ०

सही

त्रिम्बक रामराव जहागीरदार अज्ञान पालन करणार आई सुंदराबाई जहागीरदार राहणार बाभूळगांव ता० आकोला. तर्फे मुखत्यार गणेश दामोदर लेले दस्तुर खुद्द.

## नोटीस

बेशमी शंभु वल्लद इश्णाजी माकरे राहणार बेलुरा बुजरुख ता. बाळापूर यांस.

खाली सही करणार यांजकडून नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं मी तुम्हाला ८ मण जवारीचा सवाई सुद्धां १० मणाचा व १० रुपयाचा सवाई सुद्धा १२॥ रुपयांचा पुर्जा लिहून दिल्या अन्वयें खळ्याच्या वेळीं जवारी मोजून दिली व त्या नंतर महिनाभरांत १२॥ रुपयेही देऊन टाकले. तुम्ही दस्ताऐवज परत आज उद्यां देतों असें ह्मणतां ह्मणतां तो प्लेगाच्या धांदलींत हरवला असें ह्मणाला जवारीची व रुपयाची चुकती पावती मागितली तर ती देत नाहीं. आठ दिवसांत नोटीसीचा खर्च व पूर्जाची चुकती पावती आणून द्यावी. कळावें तारीख १९ जुलै १९०३ इ.

सही

तुकाराम वा। सिदाजी पाटील वस्ती बेलूरा निशाणी वखर.

## नोटीस

बेशमी शंभु वल्लद इश्णाजी माकरे राहणार बेलुरा बुजरुख तालुका बाळापूर यांस.

खालीं सही करणार यांजकडून जाहिर करण्यांत येते कीं तुम्हाला ६ मण जवारीचा सवाई सुद्धा ७॥ मणाचा पुर्जा लिहून दिल्या अन्वयें मी तुम्हास खळ्याच्या वेळेला खळ्यावरच जवारी मोजून दिली पण तुम्ही दस्ताऐवज आज उद्या देतों ह्मणतां ह्मणतां परत न देतां प्लेगाच्या धांदलींत तो हरवला असें ह्मणाला. जवारीची चुकती पावती मागितली तर तीही दिली नाहीं. या नोटिशीच्या खर्चाची रक्कम व पावती आठ दिवसांत आणून द्यावी कळावें ता० १९।७।०३ इ.

सही

जानू वा। भवानी पाटील वस्ती बेलुरा बुजरुख

## जाहिरात

### (तिखाडी तेल काढण्या बद्दल)

तिखाडी तेल काढण्या बद्दल

या नोटिशीनें सर्वत्रांस जाहीर करण्यांत येतें कीं येत्या तीन वर्षां करितां ह्मणजे लिलावाचे तारखे पासून ते तारीख ३१ माहे मार्च सन १९०६ इसवी पावेतों वणी जिल्ह्यातील स्टेट फॉरेस्ट मधील तिखाडी गवताचें तेल काढण्याचा मक्ता तारीख ८ माहे आगष्ट सन १९०३ इसवी रोजीं डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिस यवतमाळ येथें दिवसा १२ वाजतां लिलाव करण्यांत येईल या मक्त्याचे अटी व स्टेट फॉरेस्टचे विस्तीर्ण वगैरे बद्दलची माहिती पाहिजे असल्यास यवतमाळ येथील डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसमध्यें दररोज ११ वाजल्या पासून ४ वाजे पर्यंत पहाण्यास मिळत जाईल कळावें.

यवतमाळ ता. १४।७।०३ इसवी.

*S. SRINIVASALU*
डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर जिल्हे वणी.

## NOTICE

—:0:—

*FOR SALE*

2 Second hand steel Lancashire boilers in good condition 30 × 7·6 constructed by by Messrs Fawcet Preston & Co. for a working pressure of 60 lb. per square foot Working pressure altered in Boiler Certificate granted last year to 55 lb. per square foot. For particulars apply to.

Ralli Brothers Agency
Shegaon.

## विक्रीस तयार.

विक्रीस तयार–लँकेशायरचे पोलादी दोन वापरलेले बॉयलर (इंजनें) चांगल्या स्थितींत असून लांबी ३० फूट व व्यास ७॥ फूट आहे. हे बायलर मेसर्स फासेट प्रेस्टन आणि कंपनी यांनीं तयार केलेले आहेत व यांत प्रत्येकें इंचाला ६० पौंड वजनाचा दाब बसण्याची शक्ती आहे. गुदस्त सालीं मिळालेल्या सरटी फिकिटांत याची शक्ती ५५ पौंडाची आहे असें दर्शविलें गेलें आहे. विशेष माहितीसाठीं "रॅली ब्रदर्स एजन्सी" शेगांव या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

Ralli Brothers Agency
Shegaon.

## नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्री करितां नाग, नरसे, जिवत्य आणि पिठोरी किंवा पाटोळा व त्यांत बुध बृहस्पती ही चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्यापेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापिली आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदर्हू चित्राचें कागद पाठवून देऊं. चित्राचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल. व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनोबा दलाल
कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला.

## खरेदी करा !

### रास्कोपची थेट व खरी पेटंट वॉचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका.

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हें च वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वाचेस प्रमाणें यांत नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. यानकरितां ज्याला अचूक वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉन्ट्रक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वाच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **स्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तीच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व त्या बद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचना:—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

**राल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

| | |
|---|---|
| १९लाईन ओपनफेस | ४० |
| १९ ,, हंटिंग | ५० |

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

| | |
|---|---|
| १८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे | १५० |
| १९ ,, हंटिंग, नकशीचे | २५० |

**मेटलचें तीन वर्ष ग्यारंटीचें.**

| | |
|---|---|
| रास्कॉप पेटंट २१ लाईन एकाट्टा स्ट्रांग | १८ |
| १९ ,, सेकंद कांट्यासह | २० |
| १९ ,, मध्यभागी सेकंद काटा असलेलें | २२ |
| १९ ,, हाफ हंटिंगचें | २० |
| १९ ,, हंटिंगचें | २० |
| १४ ,, रिस्ट वॉच | २० |

**इनगन मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे**

| | |
|---|---|
| १९ लाईन ओपन फेस | २० |
| १९ ,, हंटिंग | २० |
| १४ ,, रिस्टवॉच | २० |

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

| | |
|---|---|
| १४ लाईन रिस्ट वॉच | ३० |
| १४ ,, हंटिंग | ३५ |
| १८ व १९ ,, ओपनफेस | ३० |
| १९ ,, सेकंद कांट्यासह | ३२ |
| १९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें | ३५ |
| १९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें | ३५ |
| १९ ,, हंटिंग | ४९ |

लेडीज वॉचेस १४, १८, क्यारट गोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

**सी. हिनीगर आणि कंपनी.**

ओरिजनल जिनीवन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
९ हार्नबी रोड, मुंबई.

## ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक. मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसं, कोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खरजीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मूळव्याधी. वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व अडाण्ण भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ८० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दर:—

३१ गो० १ रु० ७१ गो० २ रु०
११९ गो० ३ रु० १६१ गो० ४ रु०
२७३ गो० ६ रु० ५५० गो० १० रु०

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंतस्थ रसायनें धातूंची भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाच मोठा क्याटलॉग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—अलिकडे २।३ वर्षे आंजर्लें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून-ते ग्राहकांचे डोळयांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील विनचूक सह पत्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

---

**ORIENTAL GOVERNMENT SECURITY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED**

Established 1874.
Head Office,—BOMBAY.
*Chief Agency for C.P . Berar & Khandesh*
Head—quarters—Nagpur, C. P.
—:0:—
FUNDS EXCEED TWO CRORES AND TEN LAKHS
Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount du under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security.*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month, or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh*

---

*K. N. ESMAYAL & Co.*

शक्तिवर्धक कामोत्तेजक गोळ्या ४२ ची सीसी कीं. रु.१॥.
तापावर एग्युमीक्श्चर कीं. ॥=
वातावर नारायण तेल कीं रु. १
गजकर्णाचे अप्रतिम सोनेरी मलम किं. ४ आणे.
पानथरीवर अमोलीकगोळ्या ६० किंमत रु० १

पत्ता—खोजानुरा इस्मायल आणि कंपनी.
वर्धा. सी. पी.

---

## जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार, मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यांसह. पाडव्यापर्यंतच किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्यांचें शारीरभाष्य मराठी भाषांतर व विवेचन यांसह. मार्चपासून मासिक पु. द्वारें निघेल. गीताभाष्यापेक्षा तिप्पट. ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व ९८६ पहिल्या २०० ग्राहकांस बालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे ३ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ सं. भा. सह बक्षिस.

का० वा० लेले वाई

---

## मुंबई बँकची सव्हिंग्स बँक

ह्या बँकेत खाली दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास किंवा त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपया प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ४।७।०३ } J. Kinniburgh एजंट

---

अति स्वस्त! ज्ञानविलास अति स्वस्त!!

हें अत्यंत चटकदार व लोक प्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळून, शिवाय प्रत्येक वर्षारंभी उपयुक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. त्वरा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही० पी० नें मागवा.

पत्ता—संपादक, ज्ञानविलास
खणदाळ पो गडहिंग्लज,
इ० कोल्हापूर.

---

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दंताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दातो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम॥




देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हो।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ॥-

दांतावर जाळें जमणे, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें, हलूं लागणें, कमजोर होणें, मेगा पडणें, किडे पडणें, वांकडे तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला.

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कंम्पनी मथुरा


---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेरावफडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.